किंमत रु. ३०

पृष्ठे ४४

जीवन शिक्षण

एप्रिल २०२०

ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र

राज्यस्तरीय बालरक्षक मेळावा दि. १८ जानेवारी २०२० रोजी झील पॉलिटेक्निक, नऱ्हे, पुणे येथे संपन्न झाला. त्याप्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करताना श्री. दिनकर पाटील – संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र.

माहे मार्च २०२० 'जीवन शिक्षण' चा अंक मा. ना. श्रीमती वर्षा गायकवाड, मंत्री – शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र यांना देताना श्री. दिनकर पाटील – संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र,

जीवन शिक्षण

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

वर्ष ६५ **एप्रिल २०२०** **अंक १ ला**

❖ **प्रवर्तक :**
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन

❖ **प्रकाशक :**
संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

❖ **प्रकाशन सल्लागार समिती :**

दिनकर पाटील
संचालक तथा संपादक **अध्यक्ष**

विकास गरड, *विभाग प्रमुख तथा सहायक संपादक* **सदस्य**

डॉ. कमलादेवी आवटे, *प्राचार्य,* **सदस्य**
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, पुणे.

श्रीम. अश्विनी मुसळे-काळसर्पे
सहा. संचालक, लेखा **सदस्य**

दत्तात्रय थिटे, *वरिष्ठ अधिव्याख्याता,* **सदस्य**
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

श्रीम. वर्षाराणी भोपळे, *वरिष्ठ अधिव्याख्याता* **सदस्य**
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

❖ **निर्मिती सहायक : बाळकृष्ण वाटेकर**
वरिष्ठ अधिव्याख्याता, प्रसार माध्यम **सदस्य-सचिव**

❖ **मुखपृष्ठ व अंतरंग सजावट :**
नूतन क्षीरसागर, *आर्टिस्ट कम टेक्निशियन*

❖ **मुद्रक : रुना ग्राफिक्स,** सिंहगड रोड, पुणे ४१.

❖ **प्रती :**

❖ **मूल्य : रु. ३०/- वार्षिक वर्गणी रु. ३००/-**

अंतरंग

❖ संपादकीय	-	४
❖ वैश्विक कीर्तीचा महामानव...डॉ. आंबेडकर	डॉ. बबन जोगदंड	५
❖ परिवर्तनाचे अग्रदूत : क्रांतिसूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर	रावसाहेब शितोळे	७
❖ करून तर पहा...	राजीव तांबे	९
❖ २२ एप्रिल : जागतिक वसुंधरा दिवस	रंगनाथ नाईकडे	१०
❖ बोली भाषेकडून प्रमाण भाषेकडे नेणारी शाळा	उमेश खोसे	१३
❖ अवांतर वाचनाची आवड रुजविण्यासाठी राबविलेले उपक्रम	रूपेश जाधव	१५
❖ माणूसपणाची पेरणी	सुनील कारंजकर	१७
❖ रंजक उपक्रम	सुरेखा भामरे	१८
❖ माझी शाळा माझे उपक्रम	आर. आर. चायंदे	२०
❖ विद्यार्थी घडविताना	ताई पवार	२१
❖ समजून घेऊ या, तिची मासिक पाळी	ज्योती आंबेकर	२४
❖ अक्षरांचे गाणे	मंगल साळुंखे	२६
❖ 'गुरुजी मला वाचायला शिकायचंय'	शिवाजी गोतरणे	२७
❖ लाभले पंख सर्जनशीलतेचे	सुनील मोरे	२८
❖ आमच्या शाळेची परसबाग	सुधाकर डिग्रजकर	३०
❖ माझ्या नजरेतून CCRT प्रशिक्षण	रंजना भिसे	३१
❖ सकारात्मक दृष्टिकोनातून गणेशचे परिवर्तन	सविता पवार	३२
❖ किचन शेड ते शाळा सभागृह	दीपक मगर	३३
❖ आनंददायी भाषा शिक्षण कार्यक्रमाच्या निर्मितीचा आणि अंमलबजावणीचा मागोवा अभ्यास	सचिन लोखंडे	३५
❖ फक्त तुझ्यामुळे... (कोरोनास पत्र)	शुभांगिनी वासनिक	३८
❖ उपक्रमांतून शाळेचा आणि गावाचा कायापालट	जयराम देवढे	४०
❖ प्रिय संपादक	-	४२

पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, जीवन शिक्षण,
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.

दूरध्वनी : ०२०-२४४८८३८२ **फॅक्स नं. :** ०२०-२४४७७०९०. **ई-मेल :** jeevanshikshan@maa.ac.in

संपादकीय ....

मित्रांनो,

सन २०२० या वर्षाची सुरुवात झाली, 'जीवन शिक्षण' च्या जानेवारी २०२० च्या अंकामध्ये संपादकीय भाष्य करताना शिक्षण क्षेत्रासाठी येणारे नवीन वर्ष निश्चितच आव्हानात्मक असणार आहे, असे नमूद केले होतेच. आज खरोखरच हे नवीन वर्ष आव्हानात्मक आहे, याची सर्वांनाच आता जाणीव झाली आहे. करोना व्हायरसने आज संपूर्ण जगभर थैमान घातले आहे. त्यापासून आपला देश व राज्यही दूर नाही. भारतासह अनेक देशांमध्ये लॉक डाऊन जाहीर करण्यात आलेला आहे. अनेक लोक मृत्युमुखी पडत आहेत. जगभर सर्व व्यवहार ठप्प झालेले आहेत. त्यापासून शिक्षणही दूर राहिलेले नाही. शाळा महाविद्यालये बंद ठेवण्यात आलेली आहेत. परीक्षाही रद्द करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थांच्या शिक्षणाच्या अनुषंगाने एक अभूतपूर्व परिस्थिती निर्माण झाली आहे. अनिश्चिततेचे वातावरण तयार झाले आहे.

कोविड १९ ही समस्या आपल्यासमोर येऊन उभी राहिली आहे. तथापि या समस्येचे संधीत रूपांतर करून विद्यार्थ्यांना शिक्षण कसे देता येईल, या दृष्टीने अनेक प्रयत्न समोर येताना दिसत आहेत. वर्गखोल्यांमधील शिक्षणाबरोबरच गृहशिक्षण, स्वअध्ययन, दूरशिक्षण या दृष्टीने अधिक विचार करून त्याची अंमलबजावणी करण्यास सुरुवात झाली आहे. त्यासाठी इंटरनेट, दूरचित्रवाणी, रेडिओ इत्यादी साधनांची अपरिहार्यता लक्षात आली आहे. घरी बसून असलेल्या विद्यार्थ्यांना या मार्फत शिक्षण देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. आपल्या राज्यातही दिक्षा ॲप, इंटरनेट, वेबिनार, दूरदर्शन आणि रेडिओ इ. माध्यमांचा वापर करून विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू ठेवण्याचा प्रयत्न शासनाने सुरू केला आहे. याला शिक्षक आणि विद्यार्थ्यांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे परंतु सर्व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणेही एक मोठे आव्हानच आहे.

पुढील शैक्षणिक वर्ष कधी सुरू होणार याबाबत अनिश्चितता आहे. अशा परिस्थितीत पुढील शैक्षणिक वर्षाचे शिक्षण कसे सुरू ठेवता येईल याचाही विचार सुरू आहे परंतु शिक्षक आणि पालकांनी विद्यार्थ्यांच्या संपर्कात राहून त्यांचे शिक्षण सुरू ठेवण्यासाठी सहकार्य करणे आवश्यक आहे. त्यांना धीर देणे आवश्यक आहे. खरं तर ही सर्वांचीच कसोटी आहे परंतु निश्चितच या सर्व आव्हानांना सामोरे जाऊन सर्व काही चांगले होईल हा आशावाद आहे.

नवीन शिक्षण व्यवस्थेचा विचार अपरिहार्य आहे. त्यासाठी सज्ज राहू या...

घरी रहा! सुरक्षित रहा!

दिनकर पाटील
संपादक, जीवन शिक्षण

वैश्विक कीर्तीचा महामानव...डॉ. आंबेडकर

डॉ. बबन जोगदंड

यशदा, पुणे. ◆ भ्रमणध्वनी : ९८२३३३८२६६

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आयुष्यभर आपले लोकहिताचे, समाजहिताचे काम करीत गेले. त्यांनी अशी महान क्रांती केली की, जगाच्या इतिहासात अशी दुसरी मानव मुक्तीची क्रांती झालीच नाही. मानव मुक्तीची क्रांती करणाऱ्या वैश्विक कीर्तीच्या या महामानवाला त्यांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांच्या कारकिर्दीतल्या काही पैलूंवर प्रकाश टाकत त्यांना वाहिलेली आदरांजली....

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनात तडजोड केली असती तर कदाचित ते या देशाचे प्रधानमंत्रीही बनले असते. आपल्या विद्वत्तेमुळे खूप पैसा कमावून गर्भश्रीमंतही झाले असते; पण त्यांनी त्याला ठोकर मारून हजारो वर्षे गुलामगिरीचे आयुष्य जगणाऱ्या माणसांना त्यांची गुलामीची बंधने तोडून एक माणूस म्हणून माणसात आणण्याचे काम केले. म्हणूनच त्यांचा आज अवघ्या विश्वात बोलबोला आहे. १४ एप्रिलला त्यांची जयंती जगातील अनेक देश उत्साहाने साजरी करतात, त्यांच्या कार्यकर्तृत्वाबद्दल जाणून घेतात. त्यांच्या कार्याचा अभ्यास करतात. यामुळे ते केवळ भारत देशापुरते मर्यादित नसून, ते वैश्विक कीर्तीचे महामानव ठरतात.

त्यांची विद्वत्ता एवढी अफाट होती की, भलेभलेही त्यांच्या विद्वत्तेपुढे नतमस्तक होत असत. त्यांचा तब्बल ३२ विषयांचा व्यासंग होता. समाजशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, तत्त्वज्ञान, राजकारण, पत्रकारिता, कायदा, धर्मशास्त्र, नीतिशास्त्र, व्यापार, साहित्य, मानववंशशास्त्र, घटनाशास्त्र अशा किती तरी शास्त्रांत ते निपुण होते. ५०० पदवीधरांच्या तोडीचा त्यांचा अभ्यास होता. त्यांनी ५५ ग्रंथांचे लेखन, संपादन केले होते. म्हणूनच त्यांना विसाव्या शतकातील सर्वांत श्रेष्ठ विद्वान म्हणून ओळखले जाते.

गव्हर्नर रिचर्ड कॅसे यांनी म्हटले होते, की 'डॉ. आंबेडकर म्हणजे बुद्धिमत्तेचा आणि ज्ञानाचा मूळ झरा आहे.'

डॉ. आंबेडकर हे प्रचंड अभ्यास करायचे. ते स्वत:ला आजन्म विद्यार्थीच संबोधत असत. म्हणून त्यांनी पुस्तकांसाठी घर बांधले. त्यांच्या वैयक्तिक संग्रहालयात तीस हजारांहून अधिक ग्रंथ होते. त्यांची लिखाणाची शैली व त्यांचे अक्षर तर दृष्ट लागेल असेच होते. त्यांनी लिहिलेली पुस्तकेही जगभर वाचली जातात.'

डॉ. आंबेडकर जेव्हा इंग्लंडहून उच्च शिक्षण घेऊन भारतात परतले, तेव्हा त्यांना भारतात जिल्हा न्यायालयाच्या न्यायाधीशांचे पद देऊ करण्यात आले होते. त्यांनी त्यास नकार दिला. ते म्हणतात, 'जर मी ही नोकरी पत्करली असती, तर मला सुखवस्तूपणाची हमी मिळाली असती, पण माझ्या सहबांधवांच्या कल्याणाचे व उन्नतीचे प्रयत्न करण्याचे माझ्या आयुष्याचे ध्येय मला सफल करता आले नसते. या एकाच कारणामुळे मी हा पर्याय नाकारला.' नंतर १९४२ ला पुन्हा त्यांच्यासमोर उच्च न्यायालयाच्या न्यायाधीश पदाच्या नियुक्तीचा प्रस्ताव आला होता. त्यांनी जर ही नोकरी पत्करली असती, तर आर्थिक संपन्नता येऊन ते अगदी ऐषोआरामात जगले असते; परंतु त्यांनी हा प्रस्तावही धुडकावला. याबाबत ते म्हणाले होते, 'मला जेव्हा माझ्या आयुष्याचा अर्थ समजू लागला तेव्हापासून मी माझ्या जीवनाचे एक तत्त्व सतत अनुसरत आलो ते म्हणजे माझ्या समाजबांधवांची व देशाची सेवा करणे एवढंच!'

डॉ. आंबेडकर म्हणतात, 'मी जेवढी गरिबी अनुभवली तेवढी गरिबी कदाचित भारतातील अन्य एकाही नेत्याने अनुभवली नसेल. मी गरीब असूनही मी कधी गरिबीचे कारण सांगून माझा स्वाभिमान व माझे आंदोलन कमी पडू दिले नाही. एवढी गरिबी असूनही मी पैशांसाठी कधीच विकलो गेलो नाही.' त्यामुळेच तर बाबासाहेब प्रामाणिकपणे इथल्या विषमतावादी देशात वंचित, उपेक्षितांसाठी भरीव असे कार्य करू शकले. त्यांच्या कार्याला जगाच्या इतिहासात तोड नाही.

बाबासाहेबांनी आपल्या वंचित, उपेक्षित समाजाबरोबरच देशातील इतरांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठीचे प्रयत्न तसूभरही कुठे कमी केले नाहीत म्हणूनच आज या देशातील वंचित, बहुजन अभिमानाचे, उच्च प्रतीचे जीवन जगत आहेत. आपल्या विद्वत्तेच्या बळावर त्यांनी अस्पृश्य, महिला, शेतकरी, कामगार,

सरकारी नोकरदार यांच्यासाठी प्रचंड कार्य केले. अस्पृश्यतेचा ५००० वर्षांचा इतिहास त्यांनी अवघ्या ४० वर्षांत पुसून टाकून एक नवा इतिहास रेखाटला. सर्वांना मंदिर प्रवेश, सार्वजनिक पाणवठे खुले करून दिले. यासाठी त्यांना प्रचंड संघर्ष करावा लागला. नाशिक येथील काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह व महाड येथील चवदार तळ्याचा सत्याग्रह हे त्याचेच द्योतक आहे. त्यांनी अशी महान क्रांती केली की, जगाच्या इतिहासात अशी दुसरी मानव मुक्तीची क्रांती झाली नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर आपले लोकहिताचे, समाजहिताचे काम आयुष्यभर करीतच गेले. ते यासाठी अठरा-अठरा, बावीस-बावीस तास अभ्यास करायचे. त्यांच्या या प्रचंड अभ्यासामुळे, विद्वत्तेमुळेच त्यांच्याकडे भारताच्या राज्यघटनेची जबाबदारी आली आणि ती त्यांनी लीलया पेलून भारतीय समाजव्यवस्थेत एक नवा आयाम निर्माण केला. २ वर्षे ११ महिने १८ दिवस या राज्यघटनेवर त्यांनी कष्ट घेतले म्हणूनच भारताची राज्यघटना जगात श्रेष्ठ ठरली. जेव्हा ते राज्यघटना लिहीत होते तेव्हा अन्य काही शेजारील देशांतील विद्वान म्हणत, 'डॉ. आंबेडकर जी भारताची राज्यघटना लिहीत आहेत, ती जास्त काळ थोडीच टिकणार आहे कारण भारत हा मोठा देश आहे. येथे विविध धर्म, परंपरा, जाती, प्रथा आहेत व लोकसंख्या प्रचंड आहे. त्यामुळे जास्तीत जास्त ६ महिने ही राज्यघटना टिकेल, पण बाबासाहेब आंबेडकर एवढे ज्ञानी होते की, त्यांनी आपला सगळा जीव यामध्ये ओतून सर्वसमावेशक, सर्वहितकारक अशी राज्यघटना निर्माण केली जी आज सत्तरीत आहे आणि जे असे म्हणणारे होते, तेथील राज्यघटना मात्र अल्पजीवी ठरल्या म्हणूनच त्यांच्या या अलौकिक कार्याची दखल अनेक देशांनी घेतली.

श्रीलंकेचे नेते विजय राजपक्षे म्हणतात, 'भारताने स्वातंत्र्यासाठी लढा दिला, तर डॉ. आंबेडकरांनी सामाजिक न्यायासाठी लढा दिला. त्यांनी लिहिलेली राज्यघटना जगात आदर्श आहे.'

त्यांच्या वैश्विकतेबद्दल एका युरोपियन प्रवासी महिलेने १९३१ मध्ये म्हटले होते, की डॉ. आंबेडकर हा युवक भारतीय इतिहासाची नवी पाने लिहीत आहे. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर केवळ भारत देशाचे नेते नव्हते तर ते संपूर्ण जगाचे नेते होते.'

त्यांची जडणघडण जरी गरिबीत झाली असली तरी त्यांचे राहणीमान राजेशाही, उच्चभ्रूंसारखे होते. ते नेहमी परदेशी पोषाख वापरत असत.

प्रसिद्ध विचारवंत डॉ. यशवंत मनोहर म्हणतात, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी घालून दिलेली संस्कृती सहजच भारतीय होते आणि त्याहून अधिक ती वैश्विक संस्कृती होते कारण या संस्कृतीच्या प्रसरणशील अशा मूल्यांनी जात, धर्म आणि प्रदेश अशा सर्वच प्रकारच्या भिंती नष्ट केल्या आहेत.' म्हणून लंडनच्या म्युझियममध्ये कार्ल मार्क्ससोबत त्यांची प्रतिमा आहे. अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा बाबासाहेब यांच्या संदर्भात म्हणाले होते की, 'जर बाबासाहेब आमच्या देशात जन्माला आले असते, तर आम्ही त्यांना सूर्य म्हटले असते.' बाबासाहेबांची ख्याती परराष्ट्रातील उच्चभ्रू मंडळींनी वर्णली आहे. यावरून त्यांच्या अलौकिकत्वाची वैश्विक प्रचिती येते. युनोला सुद्धा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचे कौतुक आहे म्हणून दरवर्षी युनोमध्ये डॉ. आंबेडकरांची जयंती साजरी होते. जगातील अनेक राष्ट्रे डॉ. आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम सादर करतात, ही त्यांच्या वैश्विकपणाची पावतीच होय.

◈◈◈

वर्गणीदारांसाठी सूचना

'जीवन शिक्षण' मासिकाची वार्षिक वर्गणी रु. ३००/- (रुपये तीनशे फक्त) आहे. आपली वर्गणी **'संपादक, जीवन शिक्षण, पुणे ३०'** या नावे **'स्टेट बँक ऑफ इंडिया'**च्या कोणत्याही शाखेत बचत खाते क्र. **11153675105** मध्ये भरावी. बँकेत पैसे भरल्याच्या पावतीची झेरॉक्स प्रत, स्वत:चा पूर्ण पत्ता, (पिनकोड द्यावा.) मोबाईल नंबर व ई-मेल आयडीसह पोस्टाने अथवा ई-मेलने jeevanshikshan@maa.ac.in वर पाठवावी. 'जीवन शिक्षण'ची वार्षिक वर्गणी अथवा पुस्तके मागणीसाठीचे पैसे मनीऑर्डरनेही स्वीकारले जातील.

परिवर्तनाचे अग्रदूत : क्रांतिसूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर

रावसाहेब शितोळे

जि. प. प्राथ. शाळा उंबरे, ता. भोर, जि. पुणे. ◆ भ्रमणध्वनी : ९२८४५०३२९१

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजातील शेवटच्या घटकापासून तर समाजातील सर्वांत वरच्या घटकापर्यंत आपल्या कृतिकार्यक्रमांची व ध्येयधोरणांची व्याप्ती वाढवीत त्यांनी विचार संघर्ष उभा केला. येथील समाजव्यवस्थेमध्ये अभूतपूर्व परिवर्तन घडवून आणले. त्यांनी केलेल्या परिवर्तनाच्या कार्याने येथील पारंपरिक समाजजीवनाचा चेहरामोहराच बदलला. त्याविषयी...

१४ एप्रिल डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती. भारताच्या पवित्र भूमीवर अनेक वीरांचा, महापुरुषांचा जन्म झाला. ज्यांच्या हृदयात मानवतेचे ठोके ऐकू येतात, जे या पृथ्वीतलावर मानवतेसाठी आपला जन्म कारणी लावतात त्यांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव प्रामुख्याने घेतले जाते. एक असामान्य, अद्‌वितीय व्यक्तिमत्त्व, समतेचे उद्‌गाते, भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांना या लेखातून दिलेली ही मानवंदना.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी शिक्षणाविषयी अनेक ठिकाणी अनेक वेळा आपली मते मांडली आहेत. १२ मार्च १९२७ रोजी मुंबई प्रांतिक विधिमंडळात शिक्षणावरील चर्चेत भाग घेताना ते म्हणाले होते, 'ब्रिटिश सरकार शिक्षणावर फक्त ८७ पैसे खर्च करीत आहे. अबकारी उत्पन्न मात्र २.१७ रुपये आहे. जे मागे आहेत त्यांच्यासाठी शिक्षणावर अधिक खर्च करा, त्यांना विशेष सोयी, सवलती द्या'. प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे असाही आग्रह त्यांनी धरला होता. ते म्हणतात की, 'केवळ लोकांच्या खुशीवर हा प्रश्न सोपविल्यास प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार होण्यास कैक शतके लागतील म्हणून प्राथमिक शिक्षणाच्या बाबतीत सक्तीचा कायदा करावा लागेल.'

आज प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत आहे. त्यामुळे गोरगरीब, वंचित सर्व स्तरातील विद्यार्थ्यांना शिक्षणाचा लाभ मिळत आहे. डॉ. बाबासाहेब म्हणतात, 'शिक्षण आत्मजाणीव देते, शिक्षण नसेल तर सारा समाज अविद्येच्या अंधारात चाचपडत राहील.'

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे वडील रामजी सकपाळ यांना शिक्षणाविषयी खूपच तळमळ होती. ईस्ट इंडिया कंपनी सरकारच्या सैन्यातील दरोबस्त सैनिकाला सक्तीचे शिक्षण दिले जात असे व सैनिकांच्या मुलामुलींसाठी दिवसाच्या शाळा असून प्रौढ लोकांसाठी रात्रीच्या शाळा असत. प्रत्येक पलटणीसाठी स्वतंत्र शाळा असत. अशा एका शाळेमध्ये डॉ. आंबेडकरांचे वडील रामजी सकपाळ चौदा वर्षे हेडमास्तर होते. रामजी सकपाळ यांची शिकविण्याची पद्धत वाखाणण्यासारखी होती. त्यामुळे त्यांच्यात शिक्षणाविषयी आस्था व आवड निर्माण झालेली होती. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, 'घरातील बायका-मुलांना सुद्धा उत्तम लिहिता-वाचता येत होते. रामायणासारखे ग्रंथ वाचून त्यावर निरूपण करण्याची शक्तीही वडिलांच्या प्रोत्साहनाने माझ्या बहिणीमध्ये आलेली होती. ते स्वत: कबीरपंथी असल्याने त्यांना कितीतरी भजने व अभंग तोंडपाठ होते. माझ्या वडिलांच्या तळमळीप्रमाणे मी त्यावेळी अभ्यास केला असता तर मुंबई विश्वविद्यालयातील एकूण एक परीक्षांमध्ये मला दुसरा वर्ग मिळविणे काही अशक्य झाले नसते.'

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सामाजिक कार्याचा प्रारंभ त्यांच्या वृत्तपत्रीय वाङ्‌मय निर्मितीतून होतो ही एक महत्त्वपूर्ण स्वरूपाची बाब मानावी लागेल. तत्कालीन तळपातळीवरील शोषित, वंचित समाजाला जागृत करायचे असेल तर त्यांच्यामध्ये नवीन जाणिवा निर्माण करण्यासाठी त्यांना वृत्तपत्र सुरू करण्याची आवश्यकता वाटली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'मूकनायक' हे वृत्तपत्र काढले. या वृत्तपत्राच्या माध्यमातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशातील हजारो वर्षांपासून नि:शब्द असलेल्या व धर्म संस्कृतीच्या साखळदंडांनी बंदिस्त असलेल्या मूकनायकाला वाचा प्राप्त करून दिली.

'काय करू आता धरूनिया भीड। नि:शंक हे तोंड वाजविले।।
नव्हे जगी कोणी मुकियांचा जाण। सार्थक लाजोनी नव्हे हिता।।

या संत तुकाराम महाराजांच्या ओळींचा बिरुदावली म्हणून वापर करीत त्यांनी मूकनायक वृत्तपत्र आकारास आणले. 'मूकनायक' वृत्तपत्रास ३१ जानेवारी २०२० रोजी शंभर वर्षे पूर्ण झाली. अन्यायाविरुद्ध आवाज उठविण्यासाठी गोरगरीब, अशिक्षित, वंचित, कमकुवत घटकास त्यांनी नायक बनविले. ज्यातून आत्मसन्मानाचा लढा उभा राहिला.

वैचारिक स्वातंत्र्य लाभलेला माणूस बुद्धिवादाच्या पार्श्वभूमीवर विचार करू लागतो. त्यामुळे स्वतंत्रतेला खूप महत्त्व आहे. खरे म्हणजे माणसाला दु:ख देणाऱ्या घटना या निसर्गापेक्षा माणसांकडून अधिक घडतात. वर्णभेदाच्या पार्श्वभूमीवर, जातीच्या आधारावर आणि संपत्तीच्या आधारावर माणसांची अवहेलना झालेली लक्षात येते म्हणून माणसाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मिळवून दिला. आधुनिक भारताचे रूप साकारताना त्यांनी विविधांगी स्वरूपाची आंदोलने आणि विविध प्रकारच्या चळवळी केल्या. भारतीय समाजातील शेवटच्या घटकापासून तर या समाजातील सर्वांत वरच्या घटकापर्यंत आपल्या कृतिकार्यक्रमांची व ध्येयधोरणांची व्याप्ती वाढवीत त्यांनी विचार संघर्ष उभा केला. येथील समाजव्यवस्थेमध्ये अभूतपूर्व परिवर्तन घडवून आणले. त्यांनी केलेले हे परिवर्तनाचे कार्य येथील पारंपरिक समाजजीवनाचा चेहरामोहरा बदलणारे सिद्ध झाले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तत्कालीन मुंबई विधिमंडळात आणि संसदेमध्ये जी मोलाची कामगिरी केली त्याची दखल राजकीय इतिहासकारांनी घेतलेली आहे. आमदार, खासदार आणि मंत्री म्हणून त्यांनी समाजातील उपेक्षित घटकांसाठी केलेले कार्य वाखाणण्याजोगे आहे. डॉ. आंबेडकर यांची सामाजिक न्यायाची भूमिका पाहून मुंबईच्या गव्हर्नरांनी त्यांना १९२६ मध्ये मुंबई लेजिस्लेटिव्ह कौन्सिलवर घेतले. या पदावर ते १९३४ पर्यंत होते. या काळात त्यांनी जमीन महसूल, राज्याचे अबकारी धोरण, बजेट, शिक्षण या विषयांवर असेंब्लीत सविस्तर भाषणे दिली. याच काळात त्यांनी शेतकरी आणि कामगार वर्ग यांच्या कल्याणासाठी विविध कायद्याचे मसुदे प्रस्तावित केले. त्यातील बहुतांशी मंजूर झाले. लेजिस्लेटिव्ह कौन्सिलवर काम करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपला चांगलाच प्रभाव पाडला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कायद्याचे सूक्ष्म ज्ञान, विद्यापीठाच्या त्यांच्या उच्च पदव्या, त्यांची प्रशासनिक कार्यक्षमता आणि त्यांचे कौशल्य लक्षात घेऊन त्या वेळच्या व्हॉइसरायने १९४२ मध्ये त्यांना डिफेन्स कौन्सिलचे सभासद करून घेतले. त्यानंतर त्यांच्याकडे कामगार खाते देण्यात आले. जून १९४६ पर्यंत त्यांच्याकडेच ते होते. हा कालावधी अत्यल्प असला तरी कामगार कायद्याच्या दृष्टीने आणि कामगार कल्याण योजनांच्या दृष्टीने इतिहासात निर्णायक ठरला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाप-पुण्य, कर्मकांड, अंधश्रद्धा, ईश्वर, आत्मा, पुनर्जन्म या सर्वच गोष्टींना नकार दिला. या सर्व गोष्टी माणसाच्या मेंदूला बधिर करणाऱ्या आहेत असे त्यांनी स्पष्ट सांगितले. मानवी देह हा आप, तेज, वायू आणि पृथ्वी या चार भौतिक तत्त्वांपासून तयार होतो. डॉ. बाबासाहेबांनी आकाश हे तत्त्व नाकारले आहे. त्यांनी पाचवा घटक विज्ञानाला मानले आहे. माणसाच्या मानस विश्वाला त्यांनी 'नामस्कंध' म्हटले आहे. हे नामस्कंध म्हणजेच विज्ञान आहे. डॉ. आंबेडकरांनी विचार स्वातंत्र्याला महत्त्व दिले आहे. ते म्हणतात, 'जर माणसाने स्वतंत्रपणे विचार केला नाही तर त्याचे जीवन हे गुलामीचे ठरेल.' समता, बंधुता आणि न्याय या मानवी मूल्यांना त्यांनी महत्त्वाचे स्थान दिले आहे. मानवी जीवनाच्या भोवती जातीधर्माची चौकट डॉ. आंबेडकरांना मंजूर नव्हती म्हणूनच त्यांनी माणुसकीची शिकवण दिली. छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, थोर समाजसुधारक महात्मा जोतीबा फुले, सावित्रीबाई फुले, राजर्षि शाहू महाराज, संत कबीर, संत रविदास, संत तुकाराम आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला समतेचा संदेश वैश्विक बंधुतेच्या दृष्टीने महत्त्वाचा ठरतो.

भारतीय संविधानाचे शिल्पकार म्हणून संपूर्ण देश डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ओळखतो. आज ज्या स्वरूपात आपल्यासमोर राज्यघटना आहे तिला कलमबद्ध करण्याचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केले. १९४६ साली संविधान समितीची निर्मिती झाली. या संविधान सभेत ३८९ सभासद होते, ९३ वेगवेगळ्या संस्थानिकांचे प्रतिनिधी होते आणि २९६ ब्रिटिश भारताचे प्रतिनिधी होते. डॉ. राजेंद्र प्रसाद हे संविधान सभेचे अध्यक्ष होते तर डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे मसुदा समितीचे अध्यक्ष होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेच्या प्रास्ताविकेमध्ये सगळ्यांना बांधून ठेवणारी सूत्रे सांगितली आहेत. यामध्ये सामाजिक, आर्थिक, राजनैतिक न्याय, विचार अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा, उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जाची व संधीची समानता व राष्ट्राची एकता आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी बंधुता यांचा समावेश होतो. राष्ट्र याचा अर्थच असा होतो

की, देशात राहणारे सगळे लोक एकमेकांशी भावनिक दृष्ट्या घट्ट जोडलेले असले पाहिजेत. बंधुता अशी भावनिक एकता निर्माण करते. भारतीय राज्यकर्त्यांनी, भारतातील विचारवंतांनी, प्रसारमाध्यमांतील पत्रपंडितांनी, उद्योजकांनी, कलावंतांनी जर ही सूत्रे प्रामाणिकपणे आपल्या व्यवहारात आणली तर भारताला महान राष्ट्र होण्यापासून जगातील कोणतीही शक्ती रोखू शकणार नाही, एवढे सामर्थ्य या सूत्रात आहे.

जो धर्म माणसाचे कल्याण साधायला कारणीभूत होईल तोच खरा धर्म. बुद्ध धर्मात कोणताही भेदभाव नाही. सर्वत्र समसमानता या धर्मात आढळून येते. बुद्ध धर्मात देव, आत्मा यांचा विचार केलेला नसून माणसाने माणसाशी कशा प्रकारे वागले पाहिजे याचा विचार केलेला आढळतो. भगवान बुद्धांचा अंत होऊन २५०० वर्षे लोटली, पण अजूनही हा धर्म जोमाने फोफावतो आहे. गौतम बुद्धांच्या विचारांचा, तत्त्वांचा प्रभाव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर होता. त्यासाठी त्यांनी धर्मांतर करून १९५६ साली नागपूर येथे लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनात तीन सर्वश्रेष्ठ गुरू मानले. पहिले गौतमबुद्ध, दुसरे संत कबीर आणि तिसरे महात्मा जोतिबा फुले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संपूर्ण जीवन संघर्षात वडील रामजी सकपाळ, आत्या मीराबाई, आपल्या पतीच्या प्रत्येक सामाजिक कार्यात खंबीरपणे साथ देणाऱ्या माता रमाई, डॉ. आंबेडकरांचे बंधू या सर्वांची साथ खूप मोलाची होती. वंचितांचे, गुलामीत जीवन जगणाऱ्यांचे नायक, परिवर्तनाचे अग्रदूत, प्रचंड विद्याव्यासंगी, विचारवंत, बुद्धिवादी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे ६ डिसेंबर १९५६ रोजी महानिर्वाण झाले. या थोर युगपुरुषाला जयंतीनिमित्त कोटी-कोटी प्रणाम!

◈◈◈

करून तर पहा...

आऊट ऑफ ग्लास

राजीव तांबे

rajcopper@gmail.com ◆ भ्रमणध्वनी : ९३२२३९९८५९

आपण सहा पैकी काही ग्लासात पाणी ओतू या, काही रिकामे ठेवू या. मग त्यांचा एक क्रम लावू या. या खेळात ६ ग्लासांचा क्रम बदलायचा पण एकच ग्लास एकदाच उचलून, हे ऐकायला जरी कठीण वाटत असले तरी करायला सोपे आहे.

हा खेळ खेळण्यासाठी आपल्याला पुढील साहित्य हवे आहे.

- **साहित्य :** ६ ग्लास, २ लिटर पाणी.
- **तर मग करा सुरू :** ६ ग्लास एका रांगेत ठेवा. मग ग्लास क्रमांक ३, ४ आणि ५ मध्ये पाणी ओता. आता ग्लास क्रमांक १ रिकामा. ग्लास क्रमांक २ रिकामा. ग्लास क्रमांक ३ पाण्याने भरलेला. ग्लास क्रमांक ४ पाण्याने भरलेला. ग्लास क्रमांक ५ पाण्याने भरलेला. ग्लास क्रमांक ६ रिकामा. या क्रमाने ग्लास आहेत.
- **या खेळातील महत्त्वाचे नियम समजून घ्या. :** आता 'एक ग्लास पाण्याने भरलेला व एक रिकामा' अशा क्रमाने हे ग्लास एका रांगेत हवेत. पण त्यासाठी अट एकच आहे. तुम्ही एका वेळी एकाच ग्लासला स्पर्श करू शकता किंवा हलवू शकता आणि यासाठी आहे तुम्हाला केवळ एकच संधी.
- **सोपी युक्ती :** ग्लास क्रमांक ४ उचला. या ग्लासातील पाणी ग्लास क्रमांक १ मध्ये ओता. आता ग्लास क्रमांक ४ त्याच्या मूळ जागेवर ठेवा. आपल्याला हवा आहे तसा क्रम तयार झाला आहे. आपण याला Out of Glass Thinking म्हणू या.
- **ग.... गंमत :** प्राचीन काळी हुनान प्रांतातील लोक अमावस्येच्या रात्री मैदानात जमून हा खेळ ९, १८ किंवा २७ चिनीमातीची भांडी किंवा मातीच्या सुरया वापरून खेळताना मध, चहा आणि चँकशीन फळांचा रस या तीन द्रवांचा क्रम अशा प्रकारे लावत, की समोरच्या भिडूला खेळता खेळता कधी उजाडले हे समजतच नसे. तेव्हापासून, 'युद्धाच्या चाली आधी मनात कराव्या लागतात. मन जिंकलं तरच युद्ध जिंकता येतं' ही चिनी म्हण रूढ झाली.

२२ एप्रिल : जागतिक वसुंधरा दिवस

रंगनाथ नाईकडे

भा. व. से. वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, पुणे. ◆ भ्रमणध्वनी : ९८२११०७५७४

रंगगंधांनी नटलेली, झरे, नद्या, धबधबे, सागर यांतून वाहणाऱ्या जलामृताने सगळ्यांची तृषा भागविणारी, सगळ्यांचे सस्य शामल पिकांनी पोषण करणारी आणि उदरातील खनिजांनी संपन्न असणारी सृष्टी तिचं सगळं वैभव आपल्याला अनंत हस्ते देऊ करते. याबद्दल आपण कृतज्ञ असायला हवे. अति हव्यासापायी तिचं वैभव ओरबाडणे थांबवून तिला जपले पाहिजे, पर्यावरण राखले पाहिजे. जागतिक वसुंधरा दिनाच्या निमित्ताने हे विचार मंथन...

वर्षातील ३६५ दिवसांपैकी वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन व पर्यावरण रक्षण किंवा वने, वन्यजीव व पर्यावरण या अनुषंगाने अनेक दिवस विशेष दिन म्हणून साजरे करण्यात येतात. मला वाटते या विशेष दिनांना आधुनिक सण असे संबोधित केल्यास वावगे होणार नाही. दैनंदिन जीवनात आपण सण का साजरे करतो? सण हे आनंदाचे, समृद्धीचे प्रतीक आहे. अनेक नैसर्गिक शक्ती आपले जीवन सुसह्य करण्याकरिता मदत करीत असतात. या सर्वांप्रति या दिनांच्या माध्यमातून कृतज्ञता व्यक्त करता येते. अगदी आपल्यासाठी शेतात राबणाऱ्या बैलांपासून संपूर्ण पृथ्वीला ऊर्जा पुरविणाऱ्या सूर्यापर्यंत, सर्वांप्रति व्यक्त केलेली ममता आणि कृतज्ञता ही या सणांमधून दिसते.

आता काळ बदलतो आहे. १५ ऑगस्ट व २६ जानेवारी, १ मे या दिवसांना ज्याप्रमाणे आपण राष्ट्रीय सण म्हणतो तद्वत माणसांसह जीवसृष्टीतील प्रत्येकाशी निगडित असलेल्या घटकांचे महत्त्व विचारात घेता त्यांच्या उपयुक्ततेच्या आधारे वर्षांतील काही महत्त्वाचे दिवस आपण साजरे करतो, त्यांना अलीकडच्या काळात आधुनिक सण म्हणून संबोधले जाते.

मार्च, एप्रिल व मे हे तीन महिने वन व वनसंपदेच्या दृष्टिकोनातून तसे महत्त्वाचे महिने मानले जातात कारण वृक्षांना नवीन पालवी फुटण्याबरोबरच बहुतांश प्रजातींचा आकर्षक फुलाफळांनी बहरण्याचा हा कालावधी असतो, विशेषत: गुलमोहर, पांगारा, पळस, काटेसावर, चाफा, बहावा, पेल्टोफोरम या लाल व विविध रंगाच्या वृक्षांची फुले या काळात आपले लक्ष वेधून घेतात. या कालावधीत अनेक विशेष दिन येतात. उदा. : ३ मार्च – जागतिक वन्यजीव दिवस, २० मार्च – जागतिक चिमणी दिवस, २१ मार्च – जागतिक वन दिन, २२ मार्च – जागतिक जलदिन, २३ मार्च जागतिक हवामान दिन इ. मार्च महिन्याचा शेवटचा शनिवार– रात्री ८.३० ते ९.३० जागतिक वसुंधरा तास, २२ एप्रिल – जागतिक वसुंधरा दिवस, ३ मे आंतरराष्ट्रीय स्थलांतरित पक्षी दिवस, ९ मे प्रदेशनिष्ठ पक्षी दिवस, २२ मे आंतरराष्ट्रीय जैवविविधता दिवस. वसंत ऋतूमध्ये फुलून जाणाऱ्या वनांबाबत संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीमध्ये १८ व्या अध्यायात १६३५ क्रमांकाच्या ओवीत वर्णन केले आहे की,

वसंत तेथे वने । वने तेथे सुमने ।
सुमने पालिंगणे । सारंगची ।

आणि म्हणूनच या कालावधीमध्ये आपण अनेक दिवस साजरे करतो. एकंदरीत पर्यावरण रक्षणाच्या किंवा वातावरणीय बदलाच्या दृष्टीने आता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर मोठ्या प्रमाणावर लक्ष केंद्रित होत असल्याचे दिसत आहे.

पर्यावरणाचा ऱ्हास झपाट्याने होत असल्याची जाणीव समाजातील सर्व स्तरांमध्ये निर्माण होत असल्याने सर्व जगाचे लक्ष या संकटाकडे वेधून घेण्याकरिता अमेरिकेचे सिनेटर गेलॉर्ड यांच्या प्रेरणेने २२ एप्रिल १९७० रोजी पहिला वसुंधरा दिवस अमेरिकेत साजरा करण्यात आला. या पहिल्या वसुंधरा दिनाच्या उत्सवात सुमारे दोन कोटी अमेरिकन नागरिक सहभागी झाले होते. त्या दिवसापासून आजपर्यंत दरवर्षी ही संपूर्ण पृथ्वी वाचविण्यासाठीचा विचार जागृत ठेवण्याच्या दृष्टीने २२ एप्रिल हा दिवस वसुंधरा दिवस म्हणून ओळखला जातो. या दिवशी जगातील सर्व प्रकारची प्रसारमाध्यमे हा विचार उचलून धरतात व कोट्यवधी नागरिक वेगवेगळ्या प्रकारे यात सहभागी होतात. जगातील सर्व जागृत देश व जागृत माणसे हा दिवस वसुंधरा दिवस म्हणून साजरा करीत असतात.

भौगोलिक दृष्टिकोनातून पृथ्वीच्या अंतरंगातून सोने, चांदी, लोखंड, इत्यादी धातू, विविध खनिजे, कोळसा, तेल तसेच

अणुऊर्जा निर्माण करण्याकरिता लागणारे युरेनियम इत्यादी गोष्टी मिळतात. पृथ्वीवरील वनसंपदाही मनुष्याला अनेक प्रकारे उपयोगी पडत असते. परंतु औद्योगिकीकरण, जलसिंचन योजना, विद्युत निर्मिती प्रकल्प, वाढती लोकसंख्या यांमुळे वनांवर भयंकर मर्यादा आल्या. डोंगर ओसाड झाले व पावसाळ्यात याच ठिकाणी जमिनीची मोठ्या प्रमाणावर धूप सुरू झाली. या धुपीमुळे नद्यांचे प्रवाह बदलू लागले, पाणलोट क्षेत्रातील वृक्षराजी कापल्यामुळे धरणांत प्रचंड गाळ साठून धरणांचे आयुष्य कमी झाले. दरवर्षी आफ्रिका, चीन, उत्तर अमेरिकेतील पाण्याची पातळी सातत्याने खाली जात आहे. एकूण प्राणी, वनस्पती व कीटक यांच्या संख्येपैकी बहुतांश प्रजाती या नष्ट होत आहेत.

भूगर्भातील तसेच जमिनीवरील पाण्याचे प्रदूषण ही एक गंभीर समस्या निर्माण होत आहे. औद्योगिकीकरणामुळे दूषित पाण्याचा प्रश्न निर्माण होत आहे. सतत वाढणाऱ्या उष्ण तापमानामुळे हिमपर्वत वितळून समुद्राच्या पाण्याची पातळी वाढून कित्येक भूपृष्ठ पाण्याखाली जाण्याची शक्यता शास्त्रज्ञांकडून वर्तविण्यात येत आहे. पृथ्वीची निर्मिती ही अनुमानानुसार ३५० कोटी वर्षांपूर्वी झाल्याचा निष्कर्ष निघतो. प्रारंभी पृथ्वी हा एक उष्ण वायुरूप गोळा होता. स्वत:भोवती फिरता फिरता तो थंडावत गेला. त्याचे प्रथम द्रवस्थितीत व नंतर घनस्थितीत रूपांतर होऊ लागले. पृथ्वी थंड होण्याची प्रक्रिया पृष्ठभागाकडून केंद्र भागाच्या दिशेने झाल्याने प्रथमत: पृष्ठभागास घनावस्था प्राप्त झाली. या शिलावरणाला सुरकुत्या पडून उंच सखल भाग निर्माण झाले. पृथ्वी थंड होण्याच्या क्रियेमध्ये कालांतराने मूळ बाष्पाचे पाणी होऊन ते खोलगट भागात साठल्यामुळे समुद्र व महासागरांची निर्मिती झाली. सागर पातळीच्या वरील शिलावरणाच्या भागास आपण भूखंड म्हणतो व ही सर्व क्रिया चालू असताना हवेचे आवरण तयार होऊन वातावरण निर्मिती झाली, आणि तेव्हापासून प्रवास करीत आपण आजच्या आण्विक युगात वावरत आहोत.

पाणी, हवा, भूमी, वने, वनस्पती, प्राणी, पक्षी हे सर्व निसर्ग चक्राचे महत्त्वाचे घटक आहेत. परंतु विकासाच्या नावाखाली वसुंधरेच्या विविध भागांवर मानवाने अतिक्रमण केलेले आहे. यामुळे पर्यावरणाचा विनाश, निसर्गाचा ऱ्हास, हवा व पाण्याचे प्रदूषण इतकेच नव्हे तर सूर्यकिरणांमध्ये असणाऱ्या इन्फ्रारेड आणि अल्ट्रा व्हायलेट किरणांपासून संरक्षण करण्याकरिता वातावरणाच्या वरच्या थरात निर्माण झालेले ओझोन वायूचे कवच नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. ओझोन वायूचे संरक्षक कवच नष्ट झालेच तर सूर्यकिरणांमध्ये असणारे इन्फ्रारेड व अल्ट्रा व्हायलेट किरण सरळ पृथ्वीवर येतील व त्यामुळे पृथ्वीचे तापमान बऱ्याच पटींनी वाढेल व दोन्ही ध्रुवांवरील बर्फ वितळून समुद्राच्या पाण्याची पातळी वाढेल आणि त्यामुळे समुद्रकिनारी असणाऱ्या मोठ्या शहरांना धोका पोहोचण्याची शक्यता नाकारता येत नाही. मलेरिया, फायलेरिया यांसारखे अनेक संसर्गजन्य व साथीचे रोग यांचा प्रसार होऊन आरोग्यविषयक विविध समस्या देखील अलीकडच्या काळात निर्माण होत आहेत.

मानवाच्या आधुनिकीकरणाच्या मागे धावण्याच्या प्रवृत्तीमुळे व चंगळवादी संस्कृतीमुळे काही मूलभूत महत्त्वाच्या गोष्टींचा बळी द्यावा लागू नये हीच माफक अपेक्षा प्रत्येकाने ठेवणे आवश्यक आहे. वनांचे, निसर्गाचे, पर्यावरणाचे सामाजिक बांधिलकीने आणि प्राणपणाने संरक्षण करणे आवश्यक आहे. याकरिता आपल्या राज्य घटनेत देखील कलम ४८ अ व ५१ अ (१) मध्ये विस्तृतपणे तरतूद आहे.

'माणसाची प्रत्येक गरज पृथ्वी पूर्ण करू शकते, पण हाव नाही' अशा अर्थाचे महात्मा गांधींचे एक वचन आहे. हवा, पाणी, जंगल यांसारख्या पृथ्वीवरच्या नैसर्गिक साधनसंपत्तीचा वारेमाप वापर केल्याचे आणि वाढत्या प्रदूषणाचे परिणाम दिसतच आहेत आणि हे असेच चालू राहिले तर मानवाचे भविष्य अंधकारमय आहे हे निश्चित! म्हणून या धोक्याबाबत प्रबोधन करण्यासाठी २२ एप्रिल हा वसुंधरा दिन मानला जाऊ लागला.

पृथ्वीवरील पर्यावरणाचा समतोल राखण्यात सर्वांत मोठी भूमिका आहे जंगलांची. अगदी शहरी भागातही भरपूर झाडी असल्याने मोठे फायदे होतात. त्यानुसार प्रत्यक्ष तसेच अप्रत्यक्ष मार्गांनी जंगलतोड कमी करणे, अधिक झाडे लावणे, प्रदूषण घटविणे, योग्य जीवनशैली राखणे अशा अनेक मुद्द्यांवर सर्वांगीण जागृती व प्रसार करणे आवश्यक आहे. या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना विविध बक्षिसे दिली जातात. सर्व प्रसार माध्यमांतून समाजात जागृती करणे व माहिती पुरविणे, पर्यावरण मित्रगटांच्या (इको-क्लब) सदस्यांना या विषयांवरील चित्रपट, इ. दाखविणे. प्रदर्शन, स्पर्धा, चर्चासत्र, इत्यादींचे आयोजन करणे, स्वत:ची जीवनशैली तपासून पर्यावरणास हानिकारक बाबींचा वापर टाळणे, स्थानिक प्रजातींची झाडे मोठ्या प्रमाणात लावणे, अपारंपरिक तसेच पुनर्वापर योग्य ऊर्जा स्रोतांचा वापर करणे, पर्यावरण संरक्षणासंबंधी विविध अभ्यासक्रमांची माहिती नेटवरून मिळविणे व ती सर्वांपर्यंत पोहोचविणे इत्यादी बाबी केल्या पाहिजेत.

रामसेतू बांधायला आपल्या परीने मदत करणाऱ्या खारीने 'माझ्या मूठभर वाळूने काय होणार?' असा विचार केला

नाही. खारीचे उदाहरण कायम लक्षात ठेवले पाहिजे. एकाच उद्दिष्टपूर्तीसाठी सर्वांनी एकदिलाने केलेला प्रयत्न यशस्वी होण्याचे हे एक उत्तम उदाहरण आहे!

अर्थ अवर ही सिंगापूरमधून चालविली जाणारी धर्मादाय संस्था आहे व तिच्या कार्याला वर्ल्ड वाइल्डलाइफ फंडाचे सहकार्य आहे. या संस्थेने २००८ साली प्रथम केलेल्या 'एक तास दिवे बंद' या आवाहनाला जगभरातून प्रतिसाद मिळाला व तो दरवर्षी वाढतो आहे. गरज नसलेले दिवे एक तास बंद ठेवल्याने कित्येक दशलक्ष युनिट्स वीज वाचते असे दिसून आले आहे. या कृतीने जगभराच्या एक दिवसाच्या वीज वापरात ५ ते १५ टक्के बचत होते, असे आढळले उदा. दुबईत १०० मेगावॅट-अवर वाचले; तर महाराष्ट्रातील अमरावती वीज विभागात ७.५० लाख युनिट्स वीज वाचली. या मोहिमेत भाग घेण्याचा दुसरा अर्थ असा की हवामानातील बदल, तापमान वाढ यामागील कारणे लक्षात आणून देऊन त्यांना विरोध दाखविणे हा आहे. यांसारख्या पर्यावरणाला धोकादायक बाबींमध्ये मानवाच्या आधुनिक चंगळवादी जीवनशैलीचा मोठा वाटा आहे हे सिद्ध झाले आहे. आपल्या एकमेव पृथ्वीच्या संरक्षणासाठी केलेले हे एक प्रकारचे मतदानच आहे म्हणा ना! हा तास मार्च महिन्यातील २८ तारखेला शेवटच्या शनिवारी स्थानिक वेळेनुसार रात्री पाळण्यात येतो. आपण आपल्याला जमेल तेवढे योगदान करू शकतो.

१) याबाबत जागृतीसाठी वृत्तपत्रांतून माहितीपर लेख प्रसिद्ध करणे. २) व्यावसायिक, उद्योजक यांना अनावश्यक दिवे व यंत्रणा बंद ठेवण्याचे आवाहन करणे. ३) पंखे तसेच अधिक वीज लागणारी एसी सारखी यंत्रणा बंद ठेवणे. ४) सौर ऊर्जा तसेच पवन ऊर्जा यांसारख्या अपारंपरिक स्रोतांचा जास्तीतजास्त वापर करणे. ५) विद्यार्थ्यांच्या पालकांनाही शाळेतर्फे ऊर्जा बचतीचे आवाहन करणे. ६) वीजनिर्मिती केंद्राला भेट देऊन वीज निर्मिती प्रक्रिया समजावून घेणे. ७) फक्त वसुंधरा दिनापुरतेच नाही तर इतर वेळीही आवश्यकता नसताना दिवे, पंखे बंद करा आणि तसे करण्यास इतरांनाही प्रवृत्त करा !

या वसुंधरा मातेने तृण, वेलींपासून विशाल वृक्षांना, कीडा, मुंगीपासून ते वाघ, सिंह, हत्ती, गेंडा यांसारख्या अजस्र प्राण्यांना, फुलपाखरांपासून गरुडासारख्या उंच गगनात भरारी मारणाऱ्या पक्ष्यांना, आणि मासोळीपासून ते देवमाशांसारख्या अवाढव्य जलचरांना जन्म दिला. तसाच तिने या बुद्धिप्रधान मानवप्राण्याला सुद्धा तिच्याच कुशीत जन्म दिला आहे. सर्वांसाठी अन्न, वस्त्र व निवारा या सर्व सोयी उपलब्ध करून ठेवल्या आहेत. हा सृष्टीचा संसार समतोल रहावा म्हणून दृश्य-अदृश्य, चल-अचल, सजीव-निर्जीव आणि सुबुद्ध-निर्बुद्ध अशा चराचरांची निर्मिती करून ठेवली परंतु या सर्वांत उच्च बुद्धिमत्ता ही फक्त मनुष्यप्राण्यासच बहाल केली आहे.

याच मानवाने त्याला लाभलेल्या अफाट बुद्धिमत्तेच्या जोरावर या सर्वच सृष्टीची सूत्रे आपल्या हातात घेतली. जणू काही तोच या सृष्टीचा कर्ता करविता आहे असा अहंकार त्याच्या मनात निर्माण झाला व आकाशालाही गवसणी घालण्याचा प्रयत्न त्याने सुरू केला. सर्व काही तो फक्त आपल्या स्वत:च्या सुखासाठीच करीत आहे हे सत्य कोणीही नाकारू शकणार नाही. या वसुंधरा दिनाच्या निमित्ताने आपण पुढील प्रतिज्ञा अमलात आणावी.

वसुंधरा प्रतिज्ञा

माझी पृथ्वी माझी आईच आहे. माझे पर्यावरण हा माझा श्वास आहे. माझ्या सभोवतालचे पशू, पक्षी आणि झाडे हे माझे सगेसोयरे आहेत. त्यांच्याकडून माझ्या गरजांपुरते मी जरूर घेईन. त्यांना ओरबाडण्याचा प्रयत्न मी करणार नाही. पण त्याचबरोबर त्यांच्या वाढीचे प्रयत्नही करेन. माझ्या वसुंधरामातेने मला भरभरून दिले आहे. मी त्याचा काटकसरीने वापर करीन. पशू, पक्षी, झाडे, जंगले, हवा, पाणी, जमीन या तिच्या अलंकारांचे मी संरक्षण करीन. तिला समृद्ध करीन आणि मीही आनंदाने समृद्धीकडे वाटचाल करीन.

वृक्ष प्रतिज्ञा

वसुंधरा दिनामध्ये वृक्ष लागवड या घटकाचा सिंहाचा वाटा असल्याने शालेय, महाविद्यालयीन व सर्वच स्तरांवर वृक्ष लागवडीबाबत संकल्प करणे आवश्यक आहे व त्या करिता पुढील प्रतिज्ञा मनावर बिंबवली तर निश्चितच प्रगती होईल.

भारत माझा देश आहे. सारे वृक्ष माझे बांधव आहेत. या सर्व वृक्षांवर माझे प्रेम आहे. माझ्या देशातील समृद्ध आणि विविधतेने नटलेल्या निसर्गाचा मला अभिमान आहे. या निसर्गाचा पाईक होण्याची पात्रता माझ्या अंगी यावी, म्हणून माझ्या घराच्या अंगणात, मोकळ्या जागेत, शाळेच्या आवारात, रस्त्याच्या कडेला, गायरानावर, गावठाणात मी वृक्ष लागवड करीन आणि आजन्म त्या वृक्षांचे, संरक्षण व संगोपन करीन. मी राज्यघटनेतील कलम ४८ व ५१ नुसार, सांगितलेले कर्तव्य करीन. मी व माझे वृक्षप्रेमी बांधव यांच्या सहकार्याने, ज्या ज्या वेळी, जिथे कुठे शक्य होईल त्या वेळी, त्या ठिकाणी मी वृक्ष लागवडीचे व वृक्ष संरक्षणाचे सत्कार्य करण्याची, प्रतिज्ञा करतो. वृक्षांचे संगोपन व संवर्धन यातच माझे व पुढील पिढीचे हित सामावले आहे.

बोली भाषेकडून प्रमाणभाषेकडे नेणारी शाळा

उमेश खोसे
जि. प. प्राथ. शाळा जगदंबानगर, ता. कडदोरा. भ्रमणध्वनी : ९७६४४१२५०१

कोणत्याही गोष्टीत मन रमायचे असेल तर ती गोष्ट आधी कळावी लागते आणि कळली तर ती आवडायला लागते; म्हणूनच बोलीभाषेतून विषय कळायला लागल्यावर शाळा आवडली. बोलीभाषेबरोबरच प्रमाणभाषेचाही परिचय झाला आणि शिकण्यातील अडसर दूर झाला. त्याविषयी...

लहान मूल श्रवण, भाषण, वाचन व लेखन या चार टप्प्यांतून भाषा शिकत असते. श्रवण म्हणजे ऐकणे. मूल आईच्या पोटात असल्यापासूनच श्रवण करीत असते; म्हणजेच मूल बोली भाषा शिकत असते. आई जे जे शब्द बोलत असते, ते ते मूल ऐकत असते. जेव्हा मूल जन्माला येते, तेव्हा ते प्रत्यक्षात श्रवण करण्यास सुरुवात करते. घरात जी भाषा बोलली जाते, ती भाषा मूल ऐकत असते. यापासूनच मूल भाषा शिकण्यास प्रारंभ करते.

मूल जे ऐकते ते बोलण्याचा प्रयत्न करते. यातूनच मूल भाषण म्हणजेच बोलण्यास सुरुवात करते. मूल बोलायला फक्त बोली भाषेतच शिकते कारण घर ही त्याची पहिली शाळा आणि आई ही पहिला गुरू असते. घरात अजूनही मुख्यत: आपापली बोलीभाषाच बोलली जाते.

जेव्हा मूल शाळेत जाते तेव्हा त्याची बोली भाषा मराठी सोडून इतर असेल तर आपल्या महाराष्ट्रात त्याला शिक्षणास निश्चितच अडचणी येतात. उदा. जर मुलाची बोली भाषा लमाणी असेल आणि मूल जर मराठी शाळेत शिकायला आले तर त्याला निश्चितच शिकताना अडचणी येतात. हा अनुभव मी स्वत: घेतलेला आहे. अशा बऱ्याच बोली भाषा आहेत. त्यामुळे मुलांना सुरुवातीची काही वर्षे शिक्षण घेताना अडचणी निर्माण होतात.

या बाबतीत मी माझ्या शाळेत आलेला अनुभव व त्यावर काढलेला मार्ग कथन करीत आहे. महाराष्ट्र व कर्नाटक सीमेवर असलेले बेळब हे गाव. या गावात दोन शाळा. एक गावात व दुसरी तांड्यावर. गावात मुख्यत: कन्नड व तांड्यावर बंजारा भाषा बोलली जाते. कर्नाटक सीमा आमच्यापासून अगदी २ कि.मी. वर आहे. मी १५ जून २००७ रोजी जि. प. प्राथ. शाळा लमाण तांडा, बेळब, ता. उमरगा, जि. उस्मानाबाद येथे रुजू झालो. तेव्हा शाळा एका पत्र्याच्या शेडमध्ये भरत होती. शाळेचा अभ्यास केला असता असे लक्षात आले, की शाळेत जेमतेम ४० पैकी १० ते १२ मुले उपस्थित रहायची. इतर मुलांचे आईवडिलांसोबत स्थलांतर झालेले असायचे. शाळेत येण्यात त्यांना रस नव्हता. जेव्हा मी शाळा पहायला गेलो होतो, तेव्हा मला त्या तांड्यातील लोकांनी लमाणी व कन्नड भाषेतच माझ्याशी संवाद साधला होता. मला तर मराठी, हिंदी आणि इंग्लिश याच भाषा येत होत्या. शाळा बदलून मिळेल का यासाठीही मी प्रयत्न केला, पण तिथे मला अपयश आले. शाळेची भौतिक व शैक्षणिक स्थिती फारच बिकट होती. माझ्या अगोदर ३-४ जणांनी आदेश बदलून दुसरी शाळा घेतली होती, पण मी मात्र शेवटी त्याच शाळेत रूजू झालो.

शाळेचा इतिहास पाहता, माझ्या असे लक्षात आले की, शाळा तालुक्यात गुणवत्तेच्या बाबतीत खालून पाचमध्ये आहे आणि येथे उपस्थितीचा प्रश्न खूप मोठा होता. यासाठी काय करावे तेच कळत नव्हते. शेवटी मनाचा निश्चय केला व कामाला लागलो. येथील लोक दिवाळीच्या नंतर कारखान्यावर ऊसतोडणीसाठी स्थलांतर करतात. यावर उपाय म्हणून घरोघरी जाऊन गृहभेटी केल्या, लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले शाळेत पालक-शिक्षक बैठक घेणे, शाळेतील कार्यक्रमात महिलांना सामावून घेणे, यांसारख्या प्रयत्नांनी त्यांच्यामध्ये शिक्षणाविषयी जागृती करण्यात आम्हांला यश आले होते. आम्ही त्यांना मुलांना त्यांच्या आजी-आजोबांकडे ठेवण्यास सांगितले. यामुळे उपस्थितीचा प्रश्न बऱ्यापैकी कमी झाला होता. या वेळी शाळाबाह्य मुलांना शाळेत प्रवेश दिला. कायम गैरहजर राहणाऱ्या मुलांची उपस्थिती नियमित करण्यात यश आले. वर्ग १ ते ४ व आम्ही दोघे असा प्रवास सुरू होता. शाळेचे दप्तर एका पेटीत व शाळा कधी झाडाखाली तर कधी शेडमध्ये असा दिनक्रम होता.

शाळेत नाव असून शाळेत नियमित न येणाऱ्या ५५ मुलांना नियमित केले. शाळाबाह्य २७ मुलांना शाळेच्या नियमित प्रवाहात आणले. यामुळे नक्कीच शाळेची प्रगती होण्यास सुरुवात झाली होती.

शाळेतील उपस्थिती वाढू लागली परंतु गुणवत्ता सुधारण्यात मात्र अपयश येत होते. याच्या कारणांचा शोध घेतला असता असे लक्षात आले की, मुलांना शाळेतील भाषा शिकण्यात अडचण येत आहे. यासाठी मी सुरुवातीला मुलांकडून व नंतर पालकांकडून हळूहळू त्यांची भाषा शिकू लागलो. मुलांशी त्यांच्याच बंजारा भाषेत संवाद साधू लागलो. मुले माझ्यासोबत रमू लागली. विद्यार्थ्यांना त्यांच्याच भाषेत शिक्षण मिळाले तर त्यांना शाळेत रुची निर्माण होईल व मुले रोज शाळेत उपस्थित राहतील असे आम्हांस वाटले. यासाठी मी व माझ्या सहकाऱ्यांनी लमाणी भाषा शिकून घेतली व पहिलीत येणाऱ्या मुलांना पहिल्या सत्रात मराठी समजेपर्यंत लमाणी व मराठी या दोन्ही भाषांचा बोलण्यासाठी वापर करू लागलो. तसेच भाषा विषयातील कविता त्यांना त्यांच्याच भाषेत शिकवू लागलो, यामुळे मुले शाळेत येऊ लागली व शिकू लागली, मग हळूहळू बंजारा बोली भाषेकडून प्रमाण भाषेकडे घेऊन गेलो.

इयत्ता पहिलीच्या पुस्तकाचा आम्ही बंजारा बोली भाषेत अनुवाद केला. याचा चांगला परिणाम मुलांच्या उपस्थितीवर व गुणवत्तेवर दिसून आला. १०० टक्के मुले शिकू लागली. जी शाळा १ ते ४ होती ती आता १ ते ७ वर्गांची झाली. पटसंख्या ४० वरून १०४ झाली आहे. शाळेतील शिक्षकांची संख्या २ वरून ५ झाली आहे.

याचाच परिणाम असा झाला की, २००८-०९ मध्ये माझ्या शाळेने तालुक्यात गुणवत्तेत पहिला क्रमांक मिळविला व २००९-१० मध्ये शाळेला जिल्हा आदर्श शाळा पुरस्कार मिळाला. शाळा ISO झाली. शाळेला शाळा सिद्धी मध्ये 'ए' ग्रेड मिळाली आहे. तसेच शाळेला 'स्वच्छ शाळा सुंदर शाळा', Active School Award मिळाले आहे. हे केवळ आम्ही लमाणी बोलू लागलो म्हणून झाले नाही, पण लमाणी बोलण्याने फरक नक्कीच पडला. मुले आनंदाने शाळेत शिकू लागली.

याबरोबरच आम्ही वेगवेगळे उपक्रम राबवीत होतो. मूल पहिलीत यायच्या अगोदरच म्हणजे पुढील वर्षी पहिलीत येणारी मुले आम्ही आधीच शाळेत बसवून घेतो. त्यांना पहिलीच्या मुलांसोबतच बसवतो त्यामुळे मूल पहिलीत येताना मराठी भाषेशी एकरूप झालेले असायचे. अजूनही सदर उपक्रम चालू आहे. याबरोबरच आम्ही सकाळी ९ ते १० या वेळेत मुलांना ग्रुप करून दिलेले आहेत. त्या ग्रुपमध्ये मुले बसतात. हे ग्रुप आम्ही सर्व स्तरांतील मुलांचे केलेले आहेत. त्यामुळे या वेळेत मुले जो घटक ज्या मुलांना समजला नाही त्या मुलांना तो घटक लमाणी भाषेत समजावून सांगतात. यामुळे गुणवत्ता वाढीस मदत होत आहे.

आता तांड्यातील लोक जागरूक झाले आहेत. सन २०१६-१७ यावर्षी शाळेची नवोपक्रमशील शाळा म्हणून निवड झाली होती. तांड्यात सुरेश नावाचा एक दिव्यांग मुलगा होता. २०१३ साली त्याचे आईवडील त्याला शाळेत घालायला तयार नव्हते. त्याचे वय वाढत होते. त्यांना वाटायचे हा मुलगा अपंग आहे, हा काय सर्वसामान्य मुलांबरोबर शिकणार? त्याला शिकवायलाच नको. वडील दारू पिणार, आई दिवसभर रोजगार करणार. त्यांच्या घरी सतत भेटी देऊन, त्यांना त्याच्या शिक्षणाचे महत्त्व पटवून देऊन, तसेच त्याला असणाऱ्या सुविधा यांची माहिती देऊन त्यांना त्याला शाळेत दाखल करायला लावले. आज तो मुलगा इयत्ता सातवीमध्ये उत्तम शिक्षण घेत आहे. केवळ शाळेत येतो असे नाही तर सर्वसामान्य मुलांपेक्षा त्याचा अभ्यास छान आहे. आवर्जून सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे तो कधीच शाळा चुकवत नाही.

तांड्यावर मोबाईलला रेंज नव्हती अशा स्थितीतही मुलांना तंत्रज्ञानाच्या साहाय्याने शिक्षण द्यायचे ठरविले. लोकांमध्ये जनजागृती करून लोकवाटा जमा करण्यास सुरुवात केली. प्रथम शिक्षकांनी स्वत:५-५ हजार रुपये देऊन सुरुवात केली. बोली भाषेला तंत्रज्ञानाची जोड द्यायचे ठरविले. यात नक्कीच आम्हांला यश आले.

शाळेत प्रोजेक्टर, टी.व्ही., टॅब आले परंतु शाळेत मोबाईललाही रेंज नव्हती. यासाठी मग स्वत: ऑफलाईन ॲप्स, टेस्ट, व्हिडिओ तयार केले. व्हिडिओ मुलांच्या सहकार्याने तयार केले. यात बंजारा भाषा व मराठी भाषा अशा दोन्ही भाषांमध्ये व्हिडिओ निर्मिती केली.

सन २०१६-१७ मध्ये तंत्रज्ञानाचा अध्यापनात वापर हा विषय घेऊन मी शिक्षणाच्या वारीत सादरीकरण केले होते. 'बोली भाषा व तंत्रज्ञान' या उपक्रमाची निवड २०१७-१८ च्या शिक्षणाच्या वारीसाठी झाली होती. महाराष्ट्रातील सर्व शिक्षकांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

बोली भाषा व तंत्रज्ञान हा विषय पूर्ण महाराष्ट्रात पोहोचला. महाराष्ट्रातील तब्बल १२०० पेक्षा जास्त शाळांमध्ये बंजारा बोली भाषेतील शिक्षक मार्गदर्शिका पोहोचली. विद्यार्थ्यांना समजून घेण्यासाठी शिक्षकांना त्याचा उपयोग होऊ लागला.

माझी शाळा आता लोकांसाठी आकर्षणाचे केंद्र झाले आहे. शाळेला आय.एस.ओ मानांकन मिळाले आहे, म्हणूनच वाटते की, मुलांना समजेपर्यंत तरी त्यांना बोली भाषेशी संलग्न शिक्षण मिळावे ज्यामुळे मुले शिकतील व टिकतील.

अवांतर वाचनाची आवड रुजविण्यासाठी राबविलेले उपक्रम

रूपेश जाधव

जि. प. प्रा.शाळा, निगडी, ता. कोरेगाव, जि. सातारा. भ्रमणध्वनी : ९८८१९००४५३

वाचनासारखा दुसरा चांगला छंद नाही. ज्ञान, मनोरंजन, मैत्र अशा आपल्या गरजा वाचनातून पूर्ण होतात. आजच्या मोबाईलच्या जमान्यात वाचनाची आवड निर्माण करणे हे एक मोठे आव्हान आहे. हे आव्हान पेलले आहे जि. प. प्राथ. शाळा निगडीच्या शिक्षकांनी. त्याविषयी....

जीवनात आपण अन्नाचा कण आणि आनंदाचा क्षण कधीच वाया घालवायचा नसतो. त्याचप्रमाणे वेळही वाया घालवायचा नसतो. जेवढा मोकळा वेळ असेल त्यातील काही वेळ वाचनासाठी देऊन तोही आनंद मिळविला पाहिजे. त्यासाठी बालवयातच गृहपाठ व पाठ्यपुस्तकांव्यतिरिक्त अवांतर वाचनाची गोडी विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे गरजेचे आहे परंतु आजच्या तंत्रज्ञानाच्या दुनियेत जर आपण पाहिले तर अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंतचे सर्वजण दूरदर्शनवर विविध कार्यक्रम पाहण्यात व मोबाईलमध्ये हरवलेले दिसतात. लहानगे मोठ्यांचेच अनुकरण करताना दिसत आहेत. अशा परिस्थितीमध्ये विद्यार्थ्यांना अवांतर वाचनाची आवड निर्माण करणे ही खूप मोठी समस्या माझ्यापुढे होती परंतु ही समस्या पालक, विद्यार्थी व सहकारी शिक्षक यांच्या सहकार्याने सोडविण्यात यश आले, ते राबविलेल्या विविध उपक्रमांमुळे ! त्याचा हा आढावा.

माझ्या समोर होते 'निगडी' या एका खेडेगावातील इयत्ता पहिली ते इयत्ता सातवी पर्यंतचे विद्यार्थी. या विद्यार्थ्यांच्या दिनक्रमाचा बारकाईने अभ्यास केला असता, असे लक्षात आले की सकाळी शाळेत येईपर्यंत काही विद्यार्थी आईवडिलांना कामात मदत करतात, तर काही नुसतेच मित्रांसोबत खेळतात. दिवसभराची शाळा करून घरी गेल्यावर तीच परिस्थिती. संध्याकाळी पुढ्यात पुस्तक उघडे ठेवून दूरदर्शनसमोर आईवडिलांसोबत कार्यक्रम पाहतात. नंतर जेवण आणि झोपणे आलेच. काही विद्यार्थी तर पालकांचे मोबाईल घेऊन त्यामध्येच हरवलेले पहावयास मिळतात. अशा परिस्थितीत मुलांना वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी मला आणि माझ्या शाळेतील सहकाऱ्यांना विशेष प्रयत्न करावे लागणार, हे लक्षात आले. सर्वांच्या चर्चेतून आणि मुख्याध्यापकांच्या प्रेरणेतून काही उपक्रम शाळेत राबविण्याचे ठरविले.

शाळेतील सर्व विद्यार्थ्यांच्या पालकांसाठी शालेय व्यवस्थापन समिती आणि शिक्षक यांच्या समवेत सहविचार सभेचे आयोजन केले. त्यांना विद्यार्थ्यांच्या दिनक्रमाच्या वस्तुस्थितीची जाणीव करून दिली. सदरची परिस्थिती बदलून आपल्या पाल्याला वाचनाकडे वळविण्यासाठी शाळा काही विशेष उपक्रम राबवीत असल्याबाबत सांगण्यात आले. सर्वांना संकल्पना आवडली. पहिल्याच सहविचार सभेमध्ये सर्व पालकांनी व समितीने आम्हांस सर्वोतोपरी सहकार्य करण्याचे मान्य केले. त्यामुळे आमचा उत्साह वाढला आणि आम्ही खालीलप्रमाणे विविध उपक्रम राबविण्यास सुरुवात केली.

राबविलेले उपक्रम :

१) खुले वाचनालय : सुरुवातीपासूनच आम्ही आमच्या शाळेमध्ये खुल्या वाचनालयाची संकल्पना राबविली आहे. यामध्ये ग्रंथालयात उपलब्ध असणाऱ्या सर्व पुस्तकांची मुखपृष्ठे स्पष्ट दिसतील याप्रमाणे मांडणी करण्यात आली आहे. जवळ जवळ १०० पुस्तकांची मुखपृष्ठे एका वेळी, एका दृष्टिक्षेपात विद्यार्थ्यांना दिसतात. जे पुस्तक आवडेल ते घेऊन तेथे बनविलेल्या बैठक व्यवस्थेमध्ये बसून मुले ते पुस्तक वाचून काढतात व ते पुस्तक जेथून घेतले तेथे सुव्यवस्थित ठेवतात. अशा प्रकारे दर पंधरा दिवसांनी भिंतीवर ठेवलेल्या मांडणीमधील पुस्तके बदलली जातात.

२) तरंग वाचनालय : शाळेतील सर्व वर्गांमध्ये भिंतींवर तार बांधून त्या तारेवर पुस्तके अडकवून तरंग वाचनालये बनविण्यात आली आहेत. त्या वर्गातील मुले पुस्तके शाळेमध्ये किंवा घरी नेऊन त्याचे वाचन करतात व वाचलेले पुस्तक त्याच ठिकाणी पुन्हा अडकवितात. तरंग वाचनालयातील पुस्तके सुद्धा दर पंधरा दिवसांनी बदलली जातात.

३) मुलांसाठी वाचन कट्टे किंवा गप्पा कट्टा : शालेय परिसरामध्ये झाडे होती. त्यांपैकी मोठी २० झाडे निवडून त्याभोवती कट्टे बांधून घेतले. त्या सर्व कट्ट्यांना इंद्रधनुष्यातील रंगांप्रमाणे

आकर्षक रंग देण्यात आले. शाळेतील वाचनालय सर्व मुलांसाठी खुले ठेवण्यात आलेले आहे. या खुल्या वाचनालयामध्ये ठेवलेल्या देवघेव रजिस्टरमध्ये विद्यार्थी स्वतः पुस्तकाची नोंद करतात व ते पुस्तक घेऊन या वाचन कट्ट्यांवर बसून निसर्गाच्या सान्निध्यात वाचन करतात.

सुट्टीच्या वेळी, रिकाम्या वेळी व संधी मिळेल त्या वेळी त्या कट्ट्यावर बसून वाचनासाठी मुलांमध्ये चढाओढ लागलेली असते. कट्ट्यावर बसून त्यांनी वाचलेल्या पुस्तकांवर मुले गप्पा मारतात. या पुस्तकात काय आहे? काय चांगले वाटले यावर चर्चा करतात. यातून मुलांना वाचनाची आवड निर्माण झाली. एकमेकांमध्ये संवाद होऊ लागल्याने आपुलकी वाढली. नवीन शब्द माहीत झाल्याने शब्दसंपत्ती वाढली. वाचलेले पुस्तक मुले स्वतःहून जमा करतात. पुस्तक अगदी आपलं समजून सांभाळतात. 'वाचनालय आपलं आहे, आपणच जपलं पाहिजे' अशी भावनाही त्यांच्यामध्ये नकळत वाढीस लागली आहे.

४) पालकांसाठी ग्रंथालय : पालकांना वाचनाची आवड असेल तर पर्यायाने मुलांमध्येही ती रुजण्यास मदत होते. या हेतूने आम्ही पुस्तके जमविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. त्या कामी शाळेच्या विकासासाठी ९ लाख रुपयांचा निधी देणारे निगडी गावचे दानशूर ग्रामस्थ श्री. जयंत डांगरे साहेब यांच्याशी चर्चा केली. योगायोगाने पुढच्या महिन्यातच त्यांनी आपल्या मातोश्रींच्या 'सहस्र चंद्रदर्शन' सोहळ्याचे आयोजन गावामध्ये केले होते. या सोहळ्यामध्ये पालक व विद्यार्थ्यांना उपयुक्त अशा पुस्तकांनी त्यांच्या मातोश्रींची ग्रंथतुला करून त्यांनी ती सर्व पुस्तके शाळेस भेट दिली. त्यामुळे आमची पालकांसाठीच्या ग्रंथालयाची कल्पना देखील पूर्णत्वास गेली. आता जमा झालेल्या पुस्तकांचा सुयोग्य वापर करण्यासाठी आम्ही प्रथमतः सर्व पालकांची सभा आयोजित केली. आमची कल्पना त्यांना समजावून सांगितली. ती सर्वांना खूप आवडली. थोड्याच कालावधीत चांगला प्रतिसाद मिळाला. काही स्त्री पालकांनी परिपाठाच्या वेळी आवडलेल्या पुस्तकांचा सारांश व त्यातील आवडलेले प्रसंग सांगितले. हे विद्यार्थ्यांसाठी फार आगळे वेगळे होते. फार खूश होती मुले! पालकही पुस्तके वाचू लागले. पर्यायाने मुलांनाही वाचनाची गोडी लागली. मुले आणि पालकांमध्ये वाचनाबद्दल गुजगोष्टी होऊ लागल्या. आमचा हेतू खऱ्या अर्थाने साध्य झाला.

५) पुस्तक भेट योजना : 'वाचन प्रेरणा' दिनानिमित्त प्रत्येक पालक शाळेस एक पुस्तक भेट देतात. तसेच विद्यार्थी त्यांच्या वाढदिवसानिमित्त खाऊ किंवा चॉकलेट देण्याऐवजी एक छान पुस्तक शाळेस भेट देतात. त्यामुळे ग्रंथालयात पुस्तकांची संख्या आपोआपच वाढली आहे. तसेच शाळेला भेट देणाऱ्या मान्यवरांना आम्ही शाल, नारळ देण्याऐवजी एक छान पुस्तक भेट देतो.

६) दर्शनी फलक व भावलेलं पुस्तक : विद्यार्थी वाचलेल्या पुस्तकाचे नाव, लेखकाचे नाव व त्यातील भावलेला प्रसंग, पात्राचे नाव, सुंदर वाक्य इत्यादींची माहिती या व्हरांड्यात लावलेल्या दर्शनी फलकावर लिहितात. तसेच त्या खाली स्वतः चे नाव व इयत्ता लिहितात त्यामुळे दिवसभर येणारी जाणारी मुले ते वाचतात. विद्यार्थी दर्शक फलकावरील मजकूर वाचून त्या पुस्तकासंदर्भातील अधिकची माहिती फलकावर लिहिणाऱ्या मुलांना विचारत असतात. त्यामुळे मुलांना ते पुस्तक वाचावेसे वाटते. पुस्तकांची नावे माहीत होतात. इतर मुलांना त्या पुस्तकात काय आहे हे समजते, ज्ञान वाढते, माहिती मिळते. शाळेत येणाऱ्या पालकांनाही फळ्यावरील लेखन पाहून खूप कौतुक वाटते.

७) पालक मनोगत/मतदर्शनी काच फलक : काही पालकही वाचलेल्या पुस्तकाचे नाव, लेखकाचे नाव, वाचलेल्या पुस्तकाचा सारांश, भावलेला प्रसंग किंवा पुस्तकाबद्दल मत इत्यादी लिहून मुलांजवळ देतात. त्या खाली पालकांचे नाव व विद्यार्थ्यांचे नाव लिहिलेले असते. असा कागद दर्शनी काचफलकात लावला जातो. ज्या मुलाच्या पालकाने तो कागद दिलेला असतो तो मुलगा तर खूपच खूश असतो. त्यामुळे मुलांमध्ये एकमेकांच्या पालकांबद्दल खूपच आदर वाढला आहे. मुलांनाही अधिक माहिती, ज्ञान मिळू लागले आहे.

८) स्वयं अध्ययन कार्ड : आम्ही इयत्तांनुसार स्वयं-अध्ययन कार्ड्स बनविली आहेत. त्या स्वयं-अध्ययन कार्डांवरील कविता, कथा, माहिती, परिच्छेद वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे मुलांनी लिहावयाची असतात. मुलांमध्ये कार्डांची अदलाबदल केली जाते. याचाही अवांतर वाचनासाठी खूपच फायदा झाला आहे. मुलांच्या मेंदूला चालना मिळाली असून त्यांची विचारशक्ती वाढण्यास मदत झाली आहे.

एकंदरीत अवांतर वाचनासाठी आम्ही राबविलेले उपक्रम खूपच यशस्वी झाले आहेत. वाचनामुळेच व्यक्ती समृद्ध बनते हे आम्ही विद्यार्थ्यांकडे पाहून अनुभवत आहोत व हा अनुभव आम्हां सर्वांना आनंद देत आहे. या उपक्रमासाठी शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्य, पालक व माता पालक संघ, सर्व पालक व ग्रामस्थ यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

माणूसपणाची पेरणी

सुनील कारंजकर

विद्यामंदिर, कुर्डू, ता. करवीर, जि. कोल्हापूर. भ्रमणध्वनी : ९३७३०७२९७९

' मानसा, मानसा कधी व्हशील माणूस' हा माणसालाच विचारलेला प्रश्न 'माणूस' असण्याचं महत्त्व अधोरेखित करतो. विद्वान पंडित, संशोधक, खेळाडू, गायक, कलाकार.... ही यादी कितीही वाढली तरी, या सगळ्यांपेक्षा माणूस असणं हे फार महत्त्वाचं. माणुसकी हे माणसाचं व्यवच्छेदक लक्षण. माणुसकी असेल तर माणूस असण्याला अर्थ. हे लक्षात घेऊन माणूसपणाची पेरणी करणारा एक उपक्रम राबविणाऱ्या शाळेविषयी...

'एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ' या वचनानुसार माणसांनी एकमेकांना मदत केली पाहिजे. 'विना सहकार, नाही उद्धार'. जो दुसऱ्यांना मदत करतो तोच खरा माणूस. संत गाडगेबाबा महाराजांनी म्हटले आहे की, 'देव दगडात नसून तो माणसातच आहे.' माणसाला सहकार्य, मदत केल्यास माणसातच आपणाला देव भेटतो.

आज समाजात पसरलेला हिंसाचार, अत्याचार, अन्याय, जाळपोळ, मोडतोड पाहून बहिणाबाई चौधरींच्या कवितेची आठवण होते. 'मानसा मानसा, कधी व्हशील माणूस? लोभासाठी झाला माणसाचा रे कानूस'. दुसऱ्याकडून चूक झाली की, आपण पटकन बोलून जातो 'अरे जरा माणसासारखा वाग'. आता माणसासारखे वागणे म्हणजे कसे वागणे? आपल्यासारखे दुसऱ्यालाही सुख मिळावे, दुसऱ्याच्या दुःखात सहभागी व्हावे. याची जाणीव सतत मनात बाळगून आचरण करणाऱ्यालाच माणूस म्हणता येईल. संकटप्रसंगी, अडचणीच्या वेळी जो इतरांना मदत करतो त्यालाच माणूस म्हणता येईल. थोडक्यात, माणसासारखे वागणे म्हणजे गाभाभूत घटक, जीवनमूल्ये, जीवन कौशल्ये यांच्या आधाराने वागणे. लहान वयातच विद्यार्थ्यांमध्ये माणूस असण्याची ही संकल्पना पेरली तर ही मुले मोठेपणी माणूसपणाचा कळस गाठतील. या विचारातून माणूसपणाची रुजवणूक व्हावी या दृष्टीने माणूसपण जपणारा लहानसा उपक्रम मी माझ्या इयत्ता सातवीच्या वर्गात राबविला.

'भिंत खचली, चूल विझली, होते नव्हते नेले,
प्रसाद म्हणून पापण्यामध्ये पाणी थोडे ठेवले.'

'कणा' या कवितेतील या ओळींची आठवण २०१९ साली झालेल्या महापुराच्या वेळी आली. पावसाने हाहाकार माजविला होता. १४-१५ दिवस धो धो पाऊस कोसळत होता. जिकडे तिकडे पाणीच पाणी शिरले होते. संपूर्ण जनजीवन विस्कळीत होऊन गेले होते. मुकी जनावरे पाण्यात बुडून मेली. पूरग्रस्त लोकांची घरे तर पाण्यात पूर्ण बुडाली होती. सगळा संसारच पुरात बुडाला होता. होत्याचे नव्हते झाले होते. शेतातील पिके कुजून गेली होती. पूरग्रस्त लोक घर, गाव सोडून दुसऱ्या गावातील शाळा, महाविद्यालये, मंदिर, मस्जिद, आश्रम या ठिकाणी वास्तव्यास गेले होते. अशा या नैसर्गिक आपत्तीच्या प्रसंगी अनेक दानशूर व्यक्तींनी, स्वयंसेवी संस्थांनी, विविध संघटनांनी, कार्यकर्त्यांनी, प्रशासनाने पूरग्रस्तांना भरभरून मदत केली. मदतीचा ओघ चालू होता. घरे पाण्यात बुडाल्याने विद्यार्थ्यांचेही खूप नुकसान झाले होते. विद्यार्थ्यांची दप्तरे पाण्यात बुडाली होती. कवी अशोक कौतिक कोळी यांच्या कवितेतील ओळींप्रमाणे,

'महापुरामध्ये घरदार गेले,
जुल्मी पावसाने दप्तरही नेले.
हिम्मत द्या थोडी, उसळू द्या रक्त,
पैसा बिसा नको, दप्तर द्या फक्त.'

अशी परिस्थिती विद्यार्थ्यांची झाली होती. या विद्यार्थ्यांसाठी काय मदत करता येईल, याचा मी विचार करीत होतो. तेव्हा आमच्या शाळेतल्या कारंजकर मॅडम म्हणाल्या. 'आपण आपल्या परीने किमान दोन गावांतील पूरग्रस्त विद्यार्थ्यांना मदत करू या.' मला वाटले यामध्ये शाळेतील मुलांनाही सहभागी करून घ्यावे.

कुर्डू शाळेतील इयत्ता सातवीच्या वर्गातील मुलांसमोर मी प्रस्ताव मांडला. ''मुलांनो नुकताच महापूर येऊन गेला. त्यामध्ये पूरग्रस्तांचे अतोनात नुकसान झाले आहे. हाच प्रसंग आपल्यावर ओढवला असता तर! तेव्हा आपणाला या पूरग्रस्तांना काही मदत करता येईल का?'' यावर वर्गातील सर्व विद्यार्थ्यांनी आपले

(पृष्ठ क्र.१९ वर)

रंजक उपक्रम

सुरेखा भामरे
एच. ए. स्कूल प्रा. वि. पिंपरी, पुणे. भ्रमणध्वनी : ९८५०९५९०९०

औषधाची कडू गोळी शुगरकोटेड असली की तिचा कडवटपणा जाणवत नाही, तद्वतच एखादी क्लिष्ट गोष्ट खेळाच्या माध्यमातून रंजक पद्धतीने सांगितली की क्लिष्टपणा केव्हाच निघून जातो आणि तीच बाब सहज सोपी होऊन जाते. अवघड वाटणारी गणितातील संकल्पना खेळातून कशी सोपी होते याविषयी...

१) सांगू का संख्या?



आमच्या डेक्कन एज्युकेशन संस्थेचे 'शिक्षणविवेक' हे मासिक आहे. दि. २७ फेब्रुवारी अर्थातच 'मराठी राजभाषा दिनानिमित्त या शिक्षणविवेक अंकांतर्गत संस्थेच्या सर्व शाळा व इतर शाळांत 'सांगू का गोष्ट?' या स्पर्धेचे आयोजन केले होते. सांगू का गोष्ट? ही स्पर्धा मातृभाषेतून माय मराठीतून व्यक्त होण्यासाठी खूपच प्रेरक ठरली.

त्याचीच प्रेरणा घेऊन मला 'सांगू का संख्या?' हा गणिती खेळ सुचला. तो खेळ कसा खेळायचा हे विद्यार्थ्यांना समजावले. इयत्ता पहिलीच्या वर्गातील मुलांना खेळ खूपच आवडतात.

कार्यवाही : ० ते ९ अंकांचे दोन संच बनविले. एका संचास फुलाचा आकार व दुसऱ्या संचास गोलाचा आकार घेतला. त्यास आईस्क्रीमच्या काड्या आधारासाठी (धरण्यासाठी) चिकटविल्या.

१० मुली व १० मुले असे दोन गट तयार केले. मुलींच्या गटास चिमणी व मुलांच्या गटास पोपट नाव दिले. प्रत्येकास एक-एक संख्याकार्ड हातात धरण्यास दिले. त्यानंतर खेळास सुरुवात केली. मी एक संख्या सांगितली.

उदा. जसे – ३५ तर दोन्ही गटांतील विद्यार्थ्यांनी ३५ संख्या पटकन तयार करायची आहे. जो गट कमी वेळात अचूक संख्या तयार करेल, त्या गटास १ गुण दिला जाईल. अशा ५ किंवा १० फेऱ्या खेळाव्यात. ज्या गटास जास्त गुण मिळतील, तो गट जिंकेल.

फलनिष्पत्ती :

१) खेळातून संख्याज्ञान पक्के होते.
२) गट पद्धतीने लवकर अध्ययन होते.
३) जिंकण्याची चुरस निर्माण होते.
४) अवधान, लक्ष केंद्रित करण्यास मदत होते.
५) संख्या तयार करताना झालेल्या चुका समजण्यास मदत होते.
६) अनुभवातून शिक्षण होते.
७) ज्ञानरचनावादानुसार शिक्षण मिळते.

२) फुगा फुगवा, उडवा, पकडा

प्रश्न वाचा व उत्तर द्या.



कार्यवाही : चित्रात दाखविल्याप्रमाणे निरनिराळ्या रंगांचे वर्गाच्या पटाएवढे फुगे आणले. प्रत्येक विद्यार्थ्यास एक फुगा दिला. ते फुगे त्यांना फुगविण्यास सांगितले व त्यास गाठ मारली. त्यानंतर त्या फुग्यांवर एक-एक शब्द लिहिला. उदा. पक्षी असे त्यावर लिहिलेले असेल तर कोणत्याही एका पक्ष्याचे नाव सांगणे हे उत्तर अपेक्षित आहे.

सर्वांचे फुगे फुगवून व गाठ मारून झाल्यानंतर मी त्यांवर पक्षी, फळ, फूल, भाजी, पाळीव प्राणी, जंगली प्राणी, सरपटणारा

प्राणी, कीटक, सण, वाहन, झाड, वेल, गोड पदार्थ, आंबट पदार्थ, कडू पदार्थ, खारट पदार्थ...असे शब्द लिहिले. प्रत्येकास पुन्हा फुगा हातात देऊन तो उडविण्यास सांगितले.

त्यानंतर मुलांना आपल्या हाती जो फुगा येईल तो पकडण्यास सांगितले. एकेका मुलास जवळ बोलावून त्या फुग्यावरील शब्द वाचण्यास सांगितला. उदा. एका मुलाच्या हाती जो फुगा आला त्यावरील शब्द होता – पक्षी, तर त्याने एका पक्ष्याचे नाव सागितले.

याप्रमाणे वर्गातील सर्व विद्यार्थ्यांकडून आपापल्या फुग्यावरील शब्द वाचून त्याचे उत्तर काढून घेतले.

उपक्रमाची माहिती उपक्रम राबविण्यापूर्वी मुलांना दिली होती.

फलनिष्पत्ती :

१) सामान्यज्ञान वाढते.
२) प्रश्न स्वत: वाचून उत्तर सांगतात.
३) आनंददायी पद्धतीने अध्ययन होते.
४) स्वयंअध्ययन वाढते.
५) गटात चर्चा करून ज्ञान मिळवितात.
६) अभ्यासू वृत्ती वाढते.
७) शोधक वृत्ती वाढते.
८) ज्ञानरचनावादातून रंजक पद्धतीने ज्ञान मिळवितात.
९) चर्चा, संवाद यांची सवय वाढीस लागते.
१०) कळत–नकळत परिसर, विज्ञानाची ओळख होते.
११) अभ्यासाची गोडी निर्माण होते.

(पृष्ठ क्र. १७ वरून)

आपले विचार मांडले. 'आपण घरोघरी फिरून तांदूळ, गहू व चटणी असे खाद्यपदार्थ गोळा करून मदत करू या.' असा विचार मुलांनी मांडला. मी मुलांना म्हणालो, ''मुलांनो आपणाला जी मदत करायची आहे, ती पूरग्रस्त विद्यार्थ्यांना. तेव्हा विद्यार्थ्यांना कोणत्या प्रकारे मदत करता येईल?'' पुन्हा विद्यार्थ्यांमध्ये विचारमंथन सुरू झाले. मुले म्हणाली, ''सर आमच्याकडे खाऊचे जे पैसे जमा आहेत ते आम्ही देतो.'' काही मुले म्हणाली, ''आपण घरोघरी फिरून गावातून आर्थिक मदत गोळा करू.'' मी म्हणालो, ''मुलांनो गावातून आर्थिक मदत गोळा करणे एवढे सोपे नाही. समाजात मदत देणारे सारखेच भेटणार नाहीत. काहीजण सढळ हाताने मदत करतील. काहीजण देणार नाहीत. काहीजण प्रसंगी वेडेवाकडे बोलतील. या प्रसंगांना सामोरे जाण्याची तुमच्यात हिंमत असेल तर तुम्ही मदत गोळा करू शकता.''

मुले म्हणाली, ''सर, आम्ही चांगल्या कामासाठीच मदत गोळा करीत आहोत, जे देतील ते स्वीकारू. कोणी काही बोलले, तरी नाराज न होता आम्ही हे कार्य आनंदाने पार पाडू.'

दुसऱ्या दिवसापासून सर्व मुले–मुली शाळा सुटल्यानंतर गावातून मदत गोळा करू लागले. काही व्यक्तींनी उत्साहाने मदत केली तर काही व्यक्तींनी मदत करण्यास टाळाटाळ केली. काहींचे रागाचे बोलणे विद्यार्थ्यांना ऐकून घ्यावे लागले. विद्यार्थ्यांनी सर्व हकीकत कथन केली. मुलांना मी म्हणालो, ''याची पूर्वकल्पना मी तुम्हांला दिली होतीच. ठीक आहे, नाराज होऊ नका.'' मुलांनी उत्साहाने मदत गोळा केली. गावातून दीड हजार रुपये मदत जमा झाली व प्रत्येक विद्यार्थ्यांने स्वतःच्या खाऊचे शंभर रुपये या प्रमाणे दोन हजार चारशे रुपये जमा झाले. मी आणि अलका कारंजकर मॅडम आम्ही दोघांनी तीस हजार रुपये मदत करून एकूण तेहतीस हजार नऊशे रुपयांची (रु. ३३,९००/–) स्कूल बॅग, पेन, वह्या, पुस्तके अशा स्वरूपात हळदी व गाडेगोंडवाडी येथील शंभर विद्यार्थ्यांना मदत केली.

या उपक्रमात विद्यार्थ्यांचा खारीचा का असेना वाटा होता हे महत्त्वाचे. सहकार्याची भावना त्यांच्या मनात रुजावी हा हेतू साध्य झाला. पूरग्रस्त असो, भूकंपग्रस्त असो व कोणतीही नैसर्गिक आपत्ती असो, मदतीस धावून जाण्याची सवय या वयातच लागावी; या उद्देशाने मुलांना या उपक्रमात सहभागी करून घेतले. समाजातील अनेक व्यक्तींनी या उपक्रमाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. आपल्या मोठ्यांच्या दृष्टीने छोटी असणारी ही मदत विद्यार्थ्यांच्या दृष्टीने मात्र फारच मोठी आहे. पूरग्रस्त विद्यार्थ्यांना मदत करून विद्यार्थ्यांच्या मनात 'माणूसपणाची पेरणी' करून भावनिक विकास करण्याचा हा छोटासा प्रयत्न भविष्यात राष्ट्रीय कार्यात विद्यार्थ्यांना दिशादर्शक ठरेल, हे सांगण्यास कोणत्याही ज्योतिषाची गरज भासणार नाही.

'खडकाळ मातीलाही ओल आणा
जमीन वांझ असत नाही
बालपणीच मूल्ये रुजवू या
संस्कृती आयात होत नाही.'

माझी शाळा माझे उपक्रम

आर. आर. चायंदे
जि. प. प्राथ. शाळा बाभुळखेडा, पो. आमनेर, ता. वरूड, जि. अमरावती. भ्रमणध्वनी : ८९२८९५०७१६

तहान लागली की पाणी हवेच. पाण्याला दुसरा पर्यायच नाही. पाण्याला जीवन म्हटले जाते. पाणी पिणे या मूलभूत गरजेकडे कित्येकदा गांभीर्याने बघितले जात नाही. पाणी पिण्याचा आळस केला जातो आणि आजारांना आमंत्रण दिले जाते. हे टाळण्यासाठीच सुरू केला ***water bell*** *हा उपक्रम. याविषयी....*

पाणी पिणे ही शरीराची मूलभूत गरज आहे, पण अज्ञानामुळे बालवयात मुलांना पाणी पिण्याचे महत्त्व माहीत नसते. घरून भरून आणलेली पाण्याची बाटली शाळेत अर्धी सुद्धा रिकामी होत नाही. पाणी पिण्याच्या बाबतीत शाळेत व घरी सुद्धा अधिक जागरुकता नसते. आपल्या शरीराला किती पाणी आवश्यक आहे हे विद्यार्थ्यांना माहीत नसते, त्यामुळे ते कमी पाणी पितात आणि मग मुलांना बालवयातच अनेक आजारांना सामोरे जावे लागते.

पाण्याच्या कमतरतेमुळे ओठ सुकणे, ओठावर भेगा पडणे, लघवीचा रंग बदलणे, लघवी न होणे, त्वचा थंड अथवा कोरडी पडणे, रडू आले तरी अश्रू न येणे इत्यादी आजार लहान मुलांना होतात. उन्हाळ्यात जास्त घाम आल्यावर किंवा उलट्या व अतिसारामुळे तसेच सतत लघवी झाल्यामुळे शरीरातील पाणी कमी होऊन डिहायड्रेशन होते. वरील सर्व बाबींचा विचार करून सर्वप्रथम गोवा सरकारने प्रत्येक शाळेत drinking water bell हा उपक्रम राबविला.

महाराष्ट्र शासनाने सुद्धा २१ जानेवारी २०२० च्या परिपत्रानुसार महाराष्ट्रातील प्रत्येक शाळेत सदर उपक्रम राबविण्याचे आवाहन सर्व शिक्षक आणि संस्थांना केले आणि संपूर्ण महाराष्ट्रात पाणी पिण्याची चळवळ सुरू झाली. पाणी पिणे ही नैसर्गिक प्रक्रिया असून सुद्धा पाणी पिण्यासाठी असा अभिनव उपक्रम राबविणे हे शालेय इतिहासात पहिल्यांदाच घडले आहे. आज अनेक शाळांमध्ये हा उपक्रम हिरिरीने राबविण्यात येत असेल यात शंकाच नाही.

जि. प. बाभुळखेडा शाळेत हा उपक्रम शासनाचे परिपत्रक यायच्या आधीपासून राबविण्यात येत होता. गोव्यातील काही शाळांमध्ये हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे कळताच मी सुद्धा सदर उपक्रम शाळा पातळीवर राबविला. प्रथम विद्यार्थ्यांना पाणी कसे व कोणत्या वेळेस प्यायचे याविषयी माहिती देण्यात आली. याविषयी मला सुद्धा आधी माहिती गोळा करावी लागली.

जेवण झाल्यानंतर लगेच पाणी पिऊ नये, तसेच जेवणाच्या नंतर किमान अर्धा-एक तासाने पाणी पिण्याच्या सूचना विद्यार्थ्यांना देण्यात आल्या कारण जेवणानंतर लगेच पाणी प्यायल्याने पचन क्रियेवर विपरीत परिणाम होतो. अन्न चांगल्या प्रकारे जठरात घुसळले जाऊ शकत नाही. परिणामत: बद्धकोष्ठतेसारखे आजार होतात. विद्यार्थी घरून जेवण करून शाळेत येतात. शाळेत आल्यावर एक तासानंतर एक drinking water bell तसेच शाळेत दुपारचे जेवण झाल्यानंतर एक तासाने पुन्हा एकदा drinking water bell अशा प्रकारे दोनदा आवश्यक तेवढे पाणी प्या असे विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. काही विद्यार्थ्यांना जास्त पाणी प्यायल्याने उलट्या झाल्या. पालकांच्या तक्रारी सुद्धा आल्या, पण काही दिवसांनंतर विद्यार्थ्यांनाच सवय झाली. आता विद्यार्थी पाहिजे तेवढे भरपूर पाणी पितात. पालकांना सुद्धा सदर उपक्रमाचे महत्त्व पटल्याने घरी सुद्धा आम्ही सदर उपक्रम राबवू असे त्यांनी सांगितले.

पूर्वी मुलांना पोट दुखण्याची समस्या होती. नियमित पाणी पिण्यामुळे ती काही प्रमाणात कमी झाली तसेच इतर आरोग्यविषयक समस्या सुद्धा कमी झाल्या. पाणी उभ्याने न पिता बसून प्यावे, रोज सकाळी रिकाम्यापोटी कोमट पाणी प्यावे इत्यादी सूचना आता विद्यार्थ्यांच्या अंगवळणी पडल्या आहेत.

विद्यार्थी घडविताना

ताई पवार

जि. प. प्रा. शाळा. शेंडगेवाडी, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर.

शिक्षकाने आपल्या कामाकडे एक व्यवसाय म्हणून बघायचे नसते कारण त्याचा शिक्षकी पेशा. त्यामुळे विषय अध्यापनाच्या पलीकडे जाऊन विद्यार्थ्यांच्या जीवनाला आकार देण्यासाठी शिक्षकाची धडपड असली पाहिजे. शिक्षणाच्या प्रवाहात शिक्षक म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतर नुसते अध्यापन करण्याच्या औपचारिकतेमुळे विषय पूर्ण होत जातील परंतु केंद्रस्थानी असणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये त्यातून काही परिवर्तन होत आहे का, दिल्या जाणाऱ्या शिक्षणातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित होत आहे का, मुलांच्या जीवनाला आकार देण्यासाठी शिक्षण निश्चितपणे उपयुक्त ठरत आहे का, या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न शिक्षकांनी केला पाहिजे आणि येथेच शिक्षकांचे भावनिक योगदान, त्यांची कामाप्रती असणारी निष्ठा आणि समाजाशी बांधिलकी या बाबी अतिशय महत्त्वाच्या ठरतात.

'प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र' साकारताना म्हणजेच भारत देशाची भावी पिढी घडविताना दोन घटक सर्वांत महत्त्वाचे आहेत. एक म्हणजे शिक्षक आणि दुसरा म्हणजे विद्यार्थी. ज्ञानरचनावादी शिक्षणाची अंमलबजावणी करीत असताना त्याची आखणी व नियोजन यांमध्ये या दोन्ही घटकांकडे जाणीवपूर्वक विशेष लक्ष देण्यात आलेले आहे कारण शाळेमध्ये नुसत्या भौतिक सुविधा किंवा तंत्रज्ञानाची जोड देणे पुरेसे ठरत नाही. त्यातून शिक्षणाची प्रक्रिया सुलभ होऊ शकते, परंतु खरी गरज असते ती आत्मीयतेची.

शिक्षणाच्या प्रवाहात शिक्षक म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतर नुसते अध्यापन करण्याच्या औपचारिकतेमुळे विषय पूर्ण होत जातील परंतु केंद्रस्थानी असणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये त्यातून काही परिवर्तन होत आहे का, दिल्या जाणाऱ्या शिक्षणातून विद्यार्थ्यांचे व्यक्तिमत्त्व विकसित होत आहे का, मुलांच्या जीवनाला आकार देण्यासाठी शिक्षण निश्चितपणे उपयुक्त ठरत आहे का, या सर्व प्रश्नांची उत्तरे शोधण्याचा प्रयत्न शिक्षकांनी केला पाहिजे आणि येथेच शिक्षकांचे भावनिक योगदान, त्यांची कामाप्रती असणारी निष्ठा आणि समाजाशी बांधिलकी या बाबी अतिशय महत्त्वाच्या ठरतात.

विद्यार्थ्यांच्या अंगी असणाऱ्या कौशल्यांचा विकास करण्यासाठी कृतियुक्त शिक्षणावर भर दिला पाहिजे. कृतियुक्त शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना पुस्तकी ज्ञानापेक्षा जीवनाचे ज्ञान मिळण्यास मदत होते. विद्यार्थ्यांच्या मनात अनेक प्रश्न असतात. या प्रश्नांची उकल करण्यासाठी शिक्षकांनी कृतीची जोड द्यावी. कृती करण्यासाठी लागणारे साहित्य फार महागडे असावे असे मुळीच नाही. महागडे साहित्य घ्यायला अनुदान नाही म्हणून हातावर हात धरून बसण्यापेक्षा शिक्षकांनी प्राप्त परिस्थितीतून मार्ग काढला पाहिजे. 'एकच मिशन अनुभवातून शिक्षण' हे शिक्षकांचे ब्रीदवाक्य असावे. परिसरात सहज उपलब्ध होणाऱ्या वस्तू वापरून विद्यार्थ्यांना अनुभव दिले पाहिजेत. उदा. रिकाम्या बाटल्या, स्ट्रॉ, पेपरची रद्दी, रिफील, खराट्यांच्या काड्या, रिकामी खोकी, वगैरे. यासाठी शिक्षकांना कल्पक बुद्धीचा वापर करावा लागेल. विद्यार्थ्यांच्या विविध संकल्पना स्पष्ट करण्यासाठी कोणते साहित्य उपयोगी ठरेल याचा जर विचार केला तर शिक्षकांना कितीतरी नवनवीन गोष्टी सुचतील.

कोणतीही कृती करताना, साहित्य तयार करताना, जर विद्यार्थ्यांना सहभागी करून घेतले तर अनेक फायदे होतात. मुलांची कृतिशीलता वाढते, मुले टी. व्ही., मोबाईलवरील आभासी खेळांपासून दूर राहतात आणि स्वनिर्मितीचा आनंद घेतात. कमी खर्चात साहित्य बनवितात. वैज्ञानिक दृष्टिकोन वाढतो, सहकार्याची भावना वाढीस लागते. जिज्ञासू वृत्ती वाढते. मनोरंजन होते आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांचा उजवा मेंदू विकसित होतो.

मानवाच्या मेंदूचे दोन भाग असतात एक उजवा भाग आणि दुसरा डावा भाग. ज्या विद्यार्थ्यांच्या मेंदूचा उजवा भाग विकसित होतो तो विद्यार्थी अफलातून कार्य करू शकतो. बालमानसशास्त्रानुसार विद्यार्थ्यांचा उजवा मेंदू प्रयत्नपूर्वक विकसित करता येतो. यासाठी आपण शिक्षकांनी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. कृतियुक्त शिक्षणावर भर देऊन भारत देशाचे भावी नागरिक आपण घडवू शकतो.

BRITISH COUNCIL

LearnEnglish Kids

WORDSEARCH

E	N	G	L	I	S	H	V	Q	T
S	U	O	I	G	I	L	E	R	R
I	V	D	E	Y	B	V	A	M	N
S	C	I	E	N	C	E	M	H	Q
S	S	E	N	I	S	U	B	U	F
N	R	P	H	Y	S	I	C	A	L
D	F	N	I	I	M	A	T	H	S
A	J	T	C	F	C	N	S	U	I
Q	Y	R	O	T	S	I	H	E	B
G	E	O	G	R	A	P	H	Y	O

Answers 1. art 2. geography 3. physical 4. religious 5. music 6. maths 7. science 8. business 9. history 10. english

1. This subject helps you paint and draw
2. You'll learn about different places in the world
3. Football and games in the gym are port of p------- education
4. You'll learn about different religions in r-------- education
5. You can learn to play an instrument in this lesson
6. You'll use a lot of numbers in this lesson
7. Biology, chemistry, physics are part of this
8. You'll learn about the world of work in b------- studies
9. You'll learn about things that happened in the past
10. Your favourite language!

You can play this game and more online at:
www.britishcouncil.org/learnenglishkids

BRITISH COUNCIL

LearnEnglish Kids

TONGUE TWISTERS

Tongue twisters are difficult to say.
How fast can you say it without
making any mistakes?

"She sells sea shells by the sea shore."

You can play this game and more online at:
www.britishcouncil.org/learnenglishkids

समजून घेऊ या, तिची मासिक पाळी

ज्योती आंबेकर

जि. प. प्रा. शाळा, कविलवहाळ, ता. माणगाव, जि. रायगड. भ्रमणध्वनी : ९९६०३३२८२२

'७ एप्रिल' हा जागतिक आरोग्य दिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. स्त्रियांच्या आरोग्यविषयक प्रश्नांचे गांभीर्य लक्षात घेऊन जागतिक आरोग्य संघटनेने 'अठ्ठावीस मे' हा दिवस 'जागतिक मासिक पाळी स्वच्छता दिन' म्हणून जाहीर केला आहे. परंतु ज्या विषयावर उघडपणे बोललेही जात नाही, तो दिवस साजरा तरी कसा होणार?

मासिक पाळीच्या काळात पाळल्या जाणाऱ्या अनेक चालीरीती, आरोग्यविषयक सुविधांचा अभाव व त्याबाबतचे अज्ञान यांचा स्त्रियांच्या आरोग्यावर व मनावर विपरीत परिणाम होतो. याविषयी वाचकांच्या मनात जागरूकता, सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणारा व आत्मचिंतन करण्यास भाग पाडणारा एक वैचारिक लेख.

लेखाचे शीर्षक वाचून कदाचित अनेक वाचकांच्या भुवया उंचावल्या जातील परंतु संपूर्ण लेख वाचल्यावर एक सकारात्मक दृष्टिकोन व सजगता आपल्या अंतर्मनात निर्माण होईल हे मात्र नक्की. खरं तर या संवेदनशील विषयावरील लेख लिहिण्याची प्रबळ इच्छा मला झाली आणि लिहिण्याचे धाडस मी करू शकले ते माझ्या जिल्हास्तरावर झालेल्या प्रशिक्षणामुळे. मासिक पाळीविषयी आपल्या समाजात अनेक अंधश्रद्धा, चालीरीती प्रचलित आहेत. त्यातील अनेक चालीरीती या केवळ चुकीच्या समजांमुळे फार पूर्वीपासून सुरूच राहिल्या आहेत. या विषयावर मोकळेपणाने, उघडपणे बोलायला कोणीही तयार नाही. त्यामुळे संबंधित आरोग्यविषयक प्रश्नाने उग्र रूप धारण केले आहे. याचे गांभीर्य ओळखून या विषयावरील मौन सोडण्याची वेळ आता आली आहे. अनेक शैक्षणिक व सामाजिक संस्था या प्रश्नावर समाज प्रबोधनाचे काम करीत आहेत. या लेखाच्या माध्यमातून या समाज प्रबोधन चळवळीतील खारीचा वाटा मी उचलू इच्छिते. चला तर मग, समजून घेऊ या मानसिक पातळीवर तिची मासिक पाळी.

मासिक पाळीच्या काळात स्त्रीला होणारा रक्तस्राव ही खरं तर एक नैसर्गिक प्रक्रिया. परंतु त्याविषयी कुटुंबात किंवा समाजात उघडउघड चर्चा अजिबातच होत नसल्याने, या काळात करावयाची शारीरिक स्वच्छता, घ्यायची काळजी, योग्य आहार यांबाबत योग्य मार्गदर्शन स्त्रियांना मिळत नाही. त्यामुळे अनेक गैरसमजुती व अंधश्रद्धांचाच पगडा मनावर कायम राहतो म्हणून योग्य वयातच मुलींना मासिक पाळीविषयी सविस्तर माहिती दिली पाहिजे. सहज आठवले म्हणून सांगते, लहानपणी आम्ही सर्व बहिणी आईच्या अवतीभवती असतानाच आई अचानक बाजूला बाहेर बसत असे. त्या वेळी आजी आम्हांला 'तिच्या अंगावर पाल पडली आहे' असे सांगत असे. तेव्हा 'पाल' हा असा भयानक प्राणी आहे की, जो अंगावर पडला तर चार दिवस बाहेर बसावे लागते या कल्पनेनेच भीती वाटत असे. पुढे मोठे झाल्यावर, समज आल्यावरही 'पाल' या प्राण्याविषयी मनातील भीती गेली नाही.

मासिक पाळीला कावळा शिवला, गुंता आला, बाहेरची, अडचण अशा अनेक प्रकारे संबोधले जाते. जर एखाद्या मुलीला मासिक पाळी सुरू झालीच नाही तर तिचे लग्न जमणे फारच कठीण होते. मग जरा विचार करा हं, पाळी आली म्हणून अडचण, की ती आली नाही तर अडचण? पूर्वीपासून घरातील वयोवृद्ध स्त्री जे सांगत असे, त्याप्रमाणे घरातील इतर स्त्रिया वागत असत. आपल्या मुलीला आई तेच सांगते, जे तिला तिच्या आईने सांगितलेले असे. यापुढे जाऊन 'बाई ग! हे स्त्री जन्माचे भोग आहेत' अशी नकारात्मकता सूचकताही होती. मासिक पाळीच्या काळात तिच्या वेगळ्या वस्तू, वेगळे ताट, बाहेर बसणे, कोणत्याही वस्तूला किंवा व्यक्तीला स्पर्श न करणे, देवाला नमस्कार न करणे, झाडांना पाणी न घालणे, लोणच्याच्या बरणीला हात न लावणे, पापड न लाटणे, केसात फुले न घालणे, लहान मुलांना उचलून न घेणे यांसारखी एखादा संसर्गजन्य आजार झाल्यासारखी वागणूक मिळाल्यानंतर तिलाही तिचा स्त्री जन्म नकोसा न वाटला तरच नवल !

यातील काही चालीरीती त्या त्या काळानुसार, आरोग्यविषयक सुविधांच्या अभावामुळे योग्य असतीलही. परंतु आता काळ

बदलला आहे. बदलत्या काळानुसार आरोग्यविषयक सुविधाही प्राप्त झाल्या आहेत. मग तरीही त्या चालीरीती तशाच चालू ठेवणे कितपत योग्य आहे? नुकतीच मासिक पाळी सुरू झालेल्या मुलींच्या मनात किती प्रश्नांचे काहूर उठत असेल याचा आपण कधी विचार केला आहे का? बरं, त्यांच्या मनातील प्रश्नांची उत्तरे देणाऱ्या व्यक्ती फार कमी आहेत आणि जर एखाद्या मुलीने धाडस करून प्रश्न विचारलाच तर आजूबाजूच्या व्यक्तींनी टाळाटाळ करून दिलेली उत्तरे किंवा खिल्ली उडविणारी दिलेली प्रतिक्रिया यामुळे त्यांच्या ओठांवर आलेले अनेक प्रश्न बाहेर पडतच नाहीत. त्यामुळे पाळी येणाऱ्या मुलींची मानसिक स्थिती, त्यांच्या मनावर येणारा ताण आपण कधी लक्षात घेतला आहे का? सध्याच्या काळात स्त्रियांना मासिक पाळीच्या काळात बाहेर बसविण्याचे प्रमाण काही अंशी कमी झाले असले तरी 'विटाळ' ही धारणा बऱ्याच प्रमाणात तशीच दिसते. या विषयावर अनेक महिलांशी जेव्हा मी संवाद साधला तेव्हा असे लक्षात आले, की या काळात स्त्रियांना विश्रांतीची गरज असते असे म्हणत तिला स्वयंपाक करू द्यायचा नाही परंतु घरातील सर्वांचे कपडे धुणे, भांडी घासणे, कचरा काढणे, इत्यादी सर्व श्रमांची कामे करून घ्यायची. यावरून या हेतूतील ढोंगीपणा, दुटप्पीपणा लक्षात येतो.

इतर समाजाच्या तुलनेत आदिवासी समाजात तर याबाबतीत अनेक अंधश्रद्धा आहेत. गोंड, माडिया या आदिवासी समाजात 'कुर्मा' प्रथा पाळली जाते. पाळीच्या काळात दूर जंगलात नदीच्या कडेला असलेल्या 'कुर्मा' मध्ये या स्त्रियांना राहवे लागते. 'कुर्मा' म्हणजे पक्की जमीनसुद्धा नसलेली गवताने शाकारलेली एक साधी झोपडी. या काळात घरून येणाऱ्या भाकरीवर तिला पोट भरावे लागते. पावसाळ्यात या कुर्मामध्ये पूर्ण ओल आलेली असते. आजूबाजूला गवत वाढलेले असल्याने त्यात विंचू, साप असतात. अशा परिस्थितीत जर तिला सापाने दंश केला किंवा ती आजारी पडली तरी तिच्यावर उपचारही होत नाहीत आणि योग्य वेळी उपचार न झाल्याने तिला मृत्यूला सामोरे जावे लागते. पाळीच्या काळात पुरुषाने तिला स्पर्श करायचा नाही किंवा तिचे तोंड पहायचे नाही ही ही अंधश्रद्धा. जर एखाद्या स्त्रीने कुर्मामध्ये राहण्यास विरोध केला आणि गावावर किंवा कुटुंबावर एखादे संकट आले तर ही प्रथा न पाळणाऱ्या स्त्रीला दोषी ठरविले जाते.

हल्ली बदलत्या जीवनशैलीमुळे मुलींना लवकर पाळी सुरू होते. कितीतरी मुली मासिक पाळी आल्यावर शाळेत जाणे टाळतात. अर्थात त्याची कारणे अनेक आहेत. ती प्रथम आपण समजून घेतली पाहिजेत.

१) पाळीच्या काळात होणाऱ्या रक्तस्रावामुळे डाग पडण्याची भीती मुलींच्या मनात असते.
२) कपडे बदलण्यासाठी स्वच्छ व बंदिस्त स्वच्छतागृहांचा अभाव असतो.
३) स्वच्छतागृहे असली तरी पुरेसे पाणी नसते.
४) प्राथमिक औषधोपचारांची कमतरता असते.

या आरोग्य सुविधांच्या अभावामुळे कितीतरी मुली शाळा अर्धवट सोडतात ही फार चिंताजनक बाब आहे. ग्रामीण भागातील कितीतरी मुली त्यांचे अनेक प्रश्न, मनातील घुसमट घेऊन चौकटीच्या आत उभ्या आहेत. यासाठी मासिक पाळीबद्दल सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करणे, किशोरवयीन मुली व महिलांना त्यांच्या शरीरात होणाऱ्या शारीरिक, मानसिक व भावनिक बदलांची जाणीव करून देऊन त्याची शास्त्रीय माहिती देणे गरजेचे आहे. मुली जेव्हा किशोरावस्थेत पदार्पण करतात त्याच वेळी त्यांना चांगल्या आरोग्यदायक सवयी व योग्य आहार यांविषयी मार्गदर्शन झाले पाहिजे. त्यांना मासिक पाळीविषयी संकोच वाटू नये, यासाठी प्रबोधन झाले पाहिजे. याकरिता शाळांमधून तसेच ग्रामपातळीवर किशोरवयीन मुली व महिलांसाठी 'मासिक पाळी व्यवस्थापन' या विषयावर शिबिरे भरवून माहिती दिली पाहिजे. या शिबिरांमधून खालील मुद्द्यांवर चर्चेद्वारा उद्बोधन करता येईल.

१) मासिक पाळी ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. याबाबत किशोरवयीन मुली व महिला यांच्याशी संवाद साधून वैज्ञानिक कारणे स्पष्ट केली तर त्यांच्या मनातील मासिक पाळीविषयीच्या समाजात असलेल्या गैरसमजुती दूर करता येतील.
२) मासिक पाळीच्या काळात जी शोषके वापरली जातात त्यांचा चुकीच्या पद्धतीने वापर केल्यास जंतूसंसर्ग होऊन आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. योग्य आरोग्यशिक्षण देऊन त्यांच्या मनातील गैरसमजुती दूर करता येतील.
३) मासिक पाळी ही प्रत्येक स्त्रीच्या जीवनात येणारी नैसर्गिक प्रक्रिया आहे हे आरोग्य शिक्षणातून कळल्यामुळे त्यांच्या मनात आत्मविश्वास व सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होईल.
४) मुलींना मासिक पाळीबाबतचे योग्य शिक्षण व योग्य मार्गदर्शन मिळाल्याने मुलींची शाळेतील उपस्थिती वाढेल.

हल्ली प्रसारमाध्यमातून सर्रासपणे सॅनिटरी पॅडच्या जाहिराती येतात. अजूनही बऱ्याचशा महिला दुकानात जाऊन सॅनिटरी पॅड मागायला लाजतात. दुकानदारही ते देताना पेपरमध्ये गुंडाळून देतो. त्या दुकानदाराला जेवढी घाई असते त्यापेक्षा अधिक घाई ते पॅड विकत घेणाऱ्या स्त्रीला असते. त्यामागे कोणी बघू नये ही भावना असते, संकोच असतो. मग अशा स्थितीत दुकानात असणाऱ्या पॅडपैकी कोणते पॅड पर्यावरणपूरक आहे. याचा विचार करणे ही तर दूरचीच गोष्ट. हे पॅड दर चार ते सहा तासांनी बदलणे आवश्यक आहे. जास्त काळ वापरले जाणारे पॅड, कोंदट, बंदिस्त वातावरणात सुकविलेले कपडे यांचा वापर केल्याने बुरशीजन्य आजार निर्माण होतात व वाढत जातात. त्यामुळे कित्येक महिला गर्भाशयमुखाच्या कॅन्सरला बळी पडतात.

सॅनिटरी पॅड वापरण्याविषयी प्रबोधन करीत असताना त्यामुळे निर्माण होणाऱ्या कचऱ्याची समस्या लक्षात घेऊन त्याची विल्हेवाट कशी लावावी याचेही योग्य मार्गदर्शन झाले पाहिजे. सुती कापड, सॅनिटरी पॅड, टॅम्पॉन, मेन्स्ट्रुअल कप या सर्व साधनांची माहिती दिल्यास त्यांना योग्य वाटणारा स्वच्छतेचा पर्याय त्या नक्कीच निवडतील व त्यांचा योग्य वापर करतील. नुकतीच एक बातमी वाचनात आली, की सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेच्या पाणी व स्वच्छता विभागाने 'उत्कर्षा मासिक पाळी व्यवस्थापन' या कार्यक्रमांतर्गत चारशे एकतीस ग्रामपंचायतींमध्ये हळदी-कुंकू समारंभ आयोजित करून चार लाख दोनशे बेचाळीस सॅनिटरी पॅडचे 'स्वच्छतेचे वाण' म्हणून वाटप केल्याच्या उपक्रमाची नोंद लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये झाली. अशा प्रकारचे स्तुत्य उपक्रम सर्वत्र राबविले गेले पाहिजेत. त्यामुळे स्वतःच्या आरोग्याबाबत व स्वच्छतेबाबत मुली व महिला जागरूक होतील.

आपण सर्वांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, मासिक पाळीच्या माध्यमातून प्रत्येक स्त्रीला निसर्गाने नवनिर्मितीची शक्ती बहाल केली आहे. योग्य वयात मासिक पाळी येणे हे चांगल्या आरोग्याचे लक्षण आहे. भविष्यातील मातृत्त्वाचा तो संकेत आहे. आज एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करीत असताना विटाळाच्या या भ्रामक कल्पना आपण किती काळ कवटाळून बसणार आहोत? म्हणूनच जे शिक्षित आहेत त्यांना सुशिक्षित करणे व मानसिक पातळीवर मासिक पाळीबाबत समजावून सांगणे यासाठी आपल्याला एक फार मोठी चळवळ उभी करावी लागेल. '७ एप्रिल' हा दिवस जागतिक आरोग्यदिन म्हणून सर्वत्र साजरा केला जातो. स्त्रियांच्या आरोग्याशी संबंधित या प्रश्नाकडे गांभीर्याने पाहण्याची वेळ आता आली आहे. हा प्रश्न सोडविताना फक्त स्त्रियांचीच मानसिकता बदलणे पुरेसे नाही तर पुरुषांची मानसिकताही बदलणे गरजेचे आहे, कारण प्रत्येक पुरुष हा मुलगा, भाऊ, नवरा, वडील यांसारख्या भूमिकांमधून जात असतोच ना? याबद्दल जरूर विचार व्हावा. असे झाले तरच समाजातील हा अंधश्रद्धारूपी विटाळ कायमचा दूर करण्यात आपण नक्कीच यशस्वी होऊ.

◈◈◈

अक्षरांचे गाणे

मंगल साळुंखे
जि. प. प्राथ. शाळा नं. १, केंद्र-इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली.
भ्रमणध्वनी : ८८८८३७८८३४

क	क	कसा	कमरेवर हात विठोबा जसा
ऐ	ऐ	कसा	बॉलिंग टाकतोय बाळू जसा
ई	ई	कशी	डोक्यावर पदर घेते जशी
ऊ	ऊ	कसा	चटणी वाटायला बसलाय जसा
ळ	ळ	कसा	पाटावर भटजी बसलाय जसा
छ	छ	कसा	गोबऱ्या गालात हसतोय जसा
ठ	ठ	कसा	झाडाला पपनस लोंबतोय जसा
ल	ल	कसा	फतकल मारून बसलाय जसा
व	व	कसा	कंबर धरून बसलाय जसा
ह	ह	कसा	पोट काढून बसलाय जसा
ढ	ढ	कसा	तुम्हीच सांगा अन् पटकन बसा

अशा प्रकारे शाळेत आपण गाणी, बडबडगीते, बोधकथा, समूहगीते, बालगीते हे सर्व सरावाद्वारे घेतले तर मुलांमध्ये शाळेची आवड निर्माण होते.

◈◈◈

‘गुरुजी मला वाचायला शिकायचंय’

शिवाजी गोतरणे

जि. प. उच्च प्राथ. शाळा कुंडनपाडा, ता. शहापूर, जि. ठाणे. भ्रमणध्वनी : ९४२३०८७३७७

कोणीही काही शिकायचं असं म्हणालं की मन सुखावून जातं. मुलांना शिकण्याची इच्छा असणं यापेक्षा शिक्षकाला दुसरा आनंद नाही; म्हणून ‘आम्हांला वाचायला शिकायचंय’ असे जेव्हा विद्यार्थिनींनी गुरुजींना म्हटले, तेव्हा गुरुजींच्या आनंदाला पारावार राहिला नाही. मुलींचं वाचणं सुरू झालं आणि त्यांना वाचता यायला लागलं त्याविषयी..

जुलै महिन्यात बदली होऊन नव्या शाळेत हजर झालो. सारं काही नवं नवं. वर्गात प्रवेश केला, पूर्ण वर्ग गच्च भरलेला, कुतूहलाने सारे माझ्याकडे पाहत होते. परिचय करून घ्यायला बरेचजण उत्सुक होते. नवे गुरुजी कसे असतील? असे प्रश्नांकित, साशंक चेहरे वाचले. विद्यार्थिसंख्या जरा जास्तच असल्याने सर्वांशी नावासहित परिचय व्हायला काही दिवस गेले. वर्गात वाडीवरून येणाऱ्या मुलांची संख्या जवळपास एकोणीस होती. त्यांपैकी तीन ते चार विद्यार्थी सोडून बाकी सर्व अध्ययन स्तरातील प्रारंभिक स्तरावर होते. सहावीच्या वर्गात शिकणाऱ्या मुलांच्या अभ्यासाबाबतची समस्या दिवसागणिक प्रकर्षाने जाणवू लागली. वाचन-लेखन याबरोबर गणनही आवश्यक; हे सर्व करायचे तर सर्वांची उपस्थिती टिकविणेही तेवढेच जिकिरीचे होते.

अप्रगत मुलांची समस्या सारखी डोळ्यांसमोर तरळू लागली. या समस्यांवर उपाय शोधणे महत्त्वाचे होते. गुलाबाला काटे असतात हा विचार करीत बसण्यापेक्षा काट्यांमध्ये गुलाब हसतहसत फुलतो असा विचार करून समस्यांना सामोरे जायचे ठरविले. समस्यांना कवटाळून बसलो तर काहीच साध्य होणार नाही, प्रयत्नांची पराकाष्ठा करायची, या अप्रगत मुलांसाठी प्रगतीचा मार्ग खुला करायचा असा मनाचा निर्धार पक्का झाला होता.

दुपारची वेळ. मधल्या सुट्टीत जेवणानंतर काही मुले गटकार्य करीत होती. काही पारावर गप्पा मारत होती. मी सुद्धा माझं जेवण लवकर आटोपून वर्गात टेबलावर प्रयोगाच्या साहित्याची मांडणी करीत होतो. दबक्या आवाजात शब्द कानावर पडले, ‘गुरुजी’. मी मान वर केली, पाहतो तर माझ्याच वर्गातील वाडीवरून येणाऱ्या दोन मुली समोर उभ्या होत्या. मी माझ्या कामातच राहून विचारले, ‘‘काय रेणुका?’’ रेणुका हळू आवाजातच म्हणाली, ‘‘गुरुजी, मला वाचायला शिकायचंय.’’ तिच्या तोंडचे वाक्य ऐकून मी चकित झालो आणि आनंदित झालो. मुली स्वत:हून वाचायला शिकायचंय म्हणत होत्या. त्यांचं कौतुक करण्यासाठी पुढे झालो. तेवढ्यात आणखी तीन मुली पुढं आल्या, ‘‘गुरुजी, आम्हांलाही वाचायला शिकायचंय.’’ मुलींच्या मनाची आणि शिकण्याची तयारी मला नवी दिशा, नवा मार्ग दाखवीत होती. माझ्याही आशा-आकांक्षा पल्लवित झाल्या. त्यांची शिकण्याची इच्छा, जिज्ञासा जागृत झालेली पाहून माझ्या आकांक्षांना नवं बळ मिळालं. मनात आलं हीच वेळ आहे तापलेल्या लोखंडावर घाव घालण्याची.

मी म्हणालो, ‘‘रेणुका तू निश्चित वाचायला शिकशील, बोल कधीपासून तुम्हांला जास्तीचा वेळ देऊ?’’ ‘‘गुरुजी, आम्हांला केव्हापण सांगा, आम्ही येऊ.’’ रेणुका म्हणाली. शालेय कामकाज सुरू होण्यापूर्वी पाऊण तास फक्त आणि फक्त या मुलींसाठी द्यायचा, त्यांच्यावर बसलेला अप्रगत हा शिक्का खोडून टाकायचा निर्धार पक्का झाला.

वाचन-लेखन कार्यक्रमाचे माझे नियोजन तयार झाले. लगेच पालकांची भेट घेऊन मुलींना शाळेत लवकर पाठविण्याबाबत सांगितले. स्वनिर्मित शैक्षणिक साहित्य वापरायला सुरुवात केली. चित्र वाचनावरून मुलींना बोलते करायला सुरुवात केली. अर्थपूर्ण सोपे शब्द वाचन, अक्षर वाचन, वाक्य वाचन सुरू झाले. रेणुका आणि कविता सोबत इतर मुलीही हजर राहू लागल्या. वाचन-लेखनाबरोबरच संख्याज्ञान, संख्या ओळख, गणिती क्रियांचा सरावही सुरू झाला. भाषिक खेळ, गणिती खेळ यांतून अभ्यास वर्गात नियमित अध्ययन घडू लागले. बघता बघता रेणुका आणि इतर मुलीही वाचायला लागल्या.

(पृष्ठ क्र. ३७ वर)

लाभले पंख सर्जनशीलतेचे

सुनील मोरे
जि. प. प्राथ. शाळा चुडाणे, ता. शिंदखेडा, जि. धुळे. भ्रमणध्वनी : ९६०४६४६१००

कचऱ्यातून कला, टाकाऊतून टिकाऊ या संकल्पना पटवायच्या असतील तर शिक्षकाजवळ हवी कल्पकता आणि सर्जनशिलता. अशा शिक्षकांच्या कलाकृतींचे निरीक्षण करून विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला पंख फुटले नाही तर नवल नाही. त्याविषयी...

गोष्ट तशी काही महिन्यांपूर्वीची आहे. गावात आषाढ सण (आखाड-घाटा) घराघरात साजरा होणार होता म्हणून गावातील सर्व मोलमजुरीला जाणारे ग्रामस्थ घरीच होते. सकाळी सकाळी शाळेसमोरच एकजण बोकड कापत होता. नेहमीप्रमाणे मी शाळेत गेलो. सर्वांची लगबग सुरू होती. माझी शाळा ही भौतिक सुविधांपासून जरी वंचित असली तरी 'शाळा गावात गेली पाहिजे आणि गाव हे शाळेत आले पाहिजे' या तज्ज्ञांच्या विचारसरणीला मुळीच अपवाद नाही. ती या विधानाला पुरेपूर उतरते. कारण शाळा आणि गाव असे काही वेगळे नाहीच. गावकरी बिनधास्तपणे शाळेच्या आवारात, शाळेसमोर वावरत असतात.

सर्वांची लगबग सुरू होती कारण प्रत्येकाला सण 'आपापल्या' पद्धतीने साजरा करावयाची घाई होती. गावकऱ्यांचा व्यत्यय अंगवळणी पडल्यामुळे मला फारसे विशेष वाटले नाही. मी काही विचारणार इतक्यात मुलांनीच मला माहिती पुरविली, की ''सर, आज आमना आखाड घाटा शे....'' मी ते ऐकले आणि म्हटले, ''ठीक आहे.'' आणि आपल्या दैनिक कामकाजास सुरुवात केली. मुलांचे सगळे लक्ष बाहेर होते. त्यांचे अवधान आपल्याकडे वळवून घेण्यासाठी मी मुद्दाम गोष्टीने सुरुवात केली. अजूनही काही मुलं शाळेत येत होती. मधेच चौथ्या इयत्तेतील पंकज आला. उशीर का झाला म्हणून मी त्याला विचारणार त्या आधीच त्याने दप्तरात हात घातला. मी त्याला सहज म्हटले, ''अरे काही खाऊ आणलास का मला?'' ''हो सर,'' असे म्हणून त्याने दप्तरातून नारळाची करवंटी काढून माझ्या टेबलावर ठेवली. ती टेबलावर ठेवताच सारी मुले त्याला खि-खि करून हसली. ''का हसताय रे?'' मी ओरडल्यावर सर्व मुले गप्प झाली आणि वर्गातील दहा-बारा मुलांनी आपापल्या दप्तरातून करवंट्या काढून टेबलावर ठेवल्या. मी म्हटले, ''अरे, इतक्या करवंट्या कोठे मिळाल्या?'' ''सर, आज सणामुळे सकाळीच देवाला नारळ फोडले ना, त्या या करवंट्या आहेत.'' मुलं म्हणाली. माझ्या हस्तकलेच्या आवडीबाबत माझे विद्यार्थी देखील सुपरिचित असल्याने ते कधीतरी माझ्यासाठी उत्साहाने करवंट्या आणून देतात. इतकेच नव्हे तर गावकरी देखील नारळ फोडल्यावर त्यांना निरुपयोगी असणारी करवंटी कुठेही फेकून न देता खोबरे व्यवस्थित काढून घेऊन करवंटी मला उपयोगी येईल म्हणून मुलांकडे देतात. त्यांनी टेबलावर ठेवलेल्या त्या करवंट्यांकडे मी एक नजर टाकली. नारळ व्यवस्थित असे फोडून त्यातील खोबरे काढून त्यांनी त्या माझ्यासाठी आणल्या होत्या. त्यात आकाराने अगदी लहान आणि ओबडधोबड अशी करवंटी मी हातात धरून पाहत असतानाच पुन्हा सारी मुले खो-खो हसली आणि म्हणाली, ''सर, ही एवढीशी करवंटी पंकजने आणली आहे.'' वर्गात नेहमी मस्ती करणारा, सर्वांच्या खोड्या काढण्यात धन्यता मानणारा, चंचल व अभ्यासाकडे फारसे लक्ष न देणारा पण चित्रकलेची आवड असणारा पंकज आनंदा कोळी. आपण एवढीशी करवंटी आणली म्हणून मुलं आपल्याला हसत आहेत हे पाहून त्याचा चेहरा पडला. मी मुलांना गप्प केले आणि म्हटले, ''अरे पंकज, काहीच का बोलत नाहीस?'' त्याचा पडलेला चेहरा मला काहीतरी खुणावत होता, की ''सर, याच्यापासून काहीतरी बनवा.'' ''अरे, ही सुद्धा कामाला येईल. ये इकडे. बघ, तुला हिचा आकार कसा वाटतो? नीट बघ आणि सांग मला.'' पंकज जवळ आला आणि करवंटी बघून विचार करू लागला. मात्र थोडा वेळ थांबून जागेवर जाताना पुन्हा परत आला. एकदम करवंटी उचलली आणि मला म्हणाला,''सर, मी बोललो तर मुलं हसतील.'' मी म्हटलं, ''अरे, नाही हसणार, हसू नका रे मुलांनो कोणी पंकजला.'' मग पंकज बोलला, ''सर, ही करवंटी अशी धरली तर वरचा भाग मला ना कासवाच्या पाठीसारखा वाटतोय. पुढे तोंड आणि खाली तिला

पाय जोडले तर कासव दिसेल.'' मी आणि सर्व वर्ग स्तब्ध होऊन ऐकत होतो. त्याची निरीक्षणशक्ती मला माझ्या विचारशक्तीपेक्षा विशेष वाटली आणि त्याच वेळेस तिसरीच्या पाठ्यपुस्तकातील 'एकदा गंमत झाली' हा मनुलीचा पाठ आठवला. त्यात ती मनुली अशीच तिच्या शिक्षिकेसमोर तिच्या मनातील कल्पना आपल्या शब्दांतून मांडते. मी बालभारती अभ्यास मंडळाच्या अभ्यास गटात कार्यरत आहे. राज्यातील सुमारे दोन कोटी मुलांसाठी योग्य नीतिमूल्ये आणि संस्कारक्षम अभ्यासाची मांडणी आम्ही करीत असतो. मात्र विद्यार्थ्यांना कोणत्या अध्ययन अनुभवांची गरज आहे याचे माझ्या वर्गातील पंकज कोळी हे प्रातिनिधिक स्वरूप आहे याची मला त्या क्षणी जाणीव झाली. मला मुलांचे भावविश्व उलगडायचे आहे या माझ्या कर्तव्य भावनेतून मी पंकजला म्हणालो, ''अरे, खरंच की! सहज शक्य आहे. छोट्याशा करवंटीपासून बनविलेले इवलेसे कासव खूप सुंदर दिसेल.'' माझ्या बोलण्याने त्याचा पडलेला चेहरा काहीसा पूर्वपदावर आला आणि कला-कार्यानुभवाच्या तासिकेत मुलांसाठी फळ्यावर चित्र काढून मी पंकजला करवंटी घासण्यासाठी पॉलिश पेपर दिला. त्याने ती घासली. जवळच असलेल्या बाभळीची फांदी मी कापून आणली आणि त्यावरील काटे काढले. पंकजला कासवासाठी पाय आणि तोंडाच्या आकाराचे भाग घरून घासून आणायला सांगितले. परवा आपले कासव तयार होईल असे मी त्याला सांगितले.

पंकजने सांगितलेली कल्पना मला प्रत्यक्षात साकार करून त्याच्या चेहऱ्यावर आनंद फुलवायचा होता. शिक्षक म्हणून मला माझ्या विद्यार्थ्यांना गुणवत्तेसह त्यांच्यातील सुप्त शक्तींच्या आत्माविष्काराची संधी द्यायची आहे हे पुन्हा मनात दृढ केले. शाळेतून घरी आल्यावर पंकजने दिलेली करवंटी मी घेतली आणि कामाला लागलो. करवंटी अधिक गुळगुळीत करताना पंकजची अमूर्त कल्पना आणि त्याचा चेहरा माझ्या डोळ्यांसमोर होता. माझ्या नारळाच्या करवंटीपासून कलाकृती निर्मितीत मी कासवापासून सुरुवात केली होती हा यातील निव्वळ योगायोग. आजवर विविध कलाकृती साकारताना मला सदैव भरभरून दाद देणारे, माझ्या कलेचे कौतुक करणारे आणि मला अखंड प्रेरणा देणारे माझे निरागस, निष्पाप विद्यार्थी हे माझे सच्चे कलाप्रेमी आहेत; जे वयाने खूप लहान आहेत मात्र मनाने तितकेच मोठे आहेत.

दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे शाळेत गेलो. अध्यापन सुरू केले. मधल्या सुट्टीत पंकज चित्रकलेची वही घेऊन माझ्याजवळ आला आणि त्याने काढलेले कासवाचे चित्र मला दाखविले. तो म्हणाला, ''सर, हे बघा कासव. असे तयार करा.'' त्याने काढलेले चित्र मी निरखून पाहिले. त्यात त्याने भरलेले रंग पाहून मी म्हटले, ''असेच रंग हवेत का?'' तो म्हणाला, ''हो सर, हा रंग मला खूप आवडतो.'' ''ठीक आहे. असेच रंग भरेन.'' शाळेतून घरी आलो. खरं तर मी कासव रंगवणार नव्हतो, पण मला पंकजला नाराज करायचे नव्हते. पंकजने वहीवर काढलेल्या चित्राचा मी मोबाईलमध्ये फोटो काढला होता आणि त्यानुसार मी करवंटीचे कासव रंगविले. गुरुवारी शाळेत गेलो. मुलांना लोकसंख्यादिनाचे महत्त्व सांगितले व अध्यापनाला सुरुवात केली. दुपारच्या सुट्टीत पुन्हा पंकज जवळ आला. त्याच्याशी कासव या विषयावर काहीच बोललो नाही, पण त्याची नजर आणि कान कशासाठी आतुर झाले आहेत हे मी जाणून होतो. कला विषयाची तासिका आली आणि मी मुलांना सांगितले, ''मुलांनो, तुम्ही परवा पंकजला हसला होतात ना, त्याने एवढीशी करवंटी आणली म्हणून! पण पंकजने दिलेल्या करवंटीपासून त्यानेच सुचविलेले हे कासव बघा.'' आणि मी बॅगेतून हळूच करवंटीचे कासव काढले. तेव्हा मुलांनी 'वॉवऽऽ' असे उद्‌गार काढले. मी पंकजला जवळ बोलावले. त्याच्या हातात ते कासव दिले आणि मग काय! त्याच्या चेहऱ्यावर मला अपेक्षित हास्याचे कारंजे फुलले दिसले. सर्व मुलांनी टाळ्या वाजवून पंकजचे कौतुक केले आणि पंकजसह सर्वांचे मन आणि चेहरे फुलले. फुललेल्या त्या अबोल कळ्या पाहून मी देखील मनोमन सुखावलो.

मातृहृदयी कवी आणि लेखक साने गुरुजी यांनी म्हटले आहे, '

'करील मनोरंजन जो मुलांचे, जडेल नाते प्रभुशी तयाचे.''

या प्रसंगी या ओळींची सत्यता पटली. कुठेतरी माझ्या विद्यार्थ्यांमुळे माझे देखील नाते प्रभूशी जोडण्यात माझी कला, माझा शिक्षकी धर्म थोडा का होईना पण यशस्वी होतो आहे याची धन्यता वाटते.

आमच्या शाळेची परसबाग

सुधाकर डिग्रजकर

विद्यामंदिर सांगवडे वाडी, ता. करवीर, जि. कोल्हापूर. ◆ भ्रमणध्वनी : ९९२१८१०६११

शिकणे आनंददायी होण्यासाठी फुलझाडांनी नटलेला परिसर हा एक महत्त्वाचा घटक आहे. 'बाग' हा मुलांच्या जिव्हाळ्याचा विषय. मातीत काम करायला मुलांना खूप आवडते. आवडीचे काम मिळाले की त्यात रमणे आलेच. त्यातूनच साकारली एका शाळेची परसबाग. त्याचे किती फायदे झाले, त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये कोणते संस्कार रुजायला मदत झाली त्याविषयी...

अध्यापन व अध्ययन प्रक्रिया आनंददायी होण्यासाठी शालेय परिसरात फुलझाडांनी व फळझाडांनी नटलेली बाग असणे खूप महत्त्वाचे आहे. शाळेच्या बंदिस्त वातावरणातून मुलांना थोडा मोकळा श्वास हवा असेल, शाळेच्या सौंदर्यात भर घालायची असेल तर शाळेजवळ छोटीशी बाग असणे अत्यंत गरजेचे आहे.

विद्यामंदिर सांगवडे वाडी, ता. करवीर शाळेची परसबाग उपक्रमासाठी निवड करण्यात आली. एका दिवसाचे प्रात्यक्षिक स्वरूपाचे प्रशिक्षण मिळाले. प्रशिक्षणात मिळालेल्या माहितीनुसार व प्रात्यक्षिकानुसार कामाची सुरुवात करण्यात आली. शाळेजवळ जेसीबीच्या मदतीने सपाटीकरण करण्यात आले. लोकांनी आपल्या सहभागातून दोन ट्रॉली माती आणली. ५०० विटा आणल्या. दि. २० मार्च २०१९ रोजी रिलायन्स फाऊंडेशनच्या पॅटर्नप्रमाणे परसबागेची रचना केली.

जूनमध्ये पावसाला सुरुवात झाल्यावर, जिल्हा परिषद कोल्हापूर यांच्याकडून पुरविण्यात आलेल्या बियांची लागवड करण्यात आली. विद्यार्थ्यांनी आपल्या घरातून शेणखत आणून बागेला घातले. शालेय परिसरातील झाडांची पाने व ओला कचरा गोळा करून खत तयार करण्यात आले. परसबाग हळूहळू मोठी होत होती. शिक्षक आणि विद्यार्थी उत्साहाने बागेत काम करीत होते.

परसबागेत आलेली फुले, फळे पाहून मुलांच्या चेहऱ्यावर एक वेगळाच आनंद दिसू लागला. शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, गावातील पदाधिकारी, नागरिक व पालकांना परसबागेचे कुतूहल वाटू लागले.

परसबागेसाठी शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक पालक शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, गावातील पदाधिकारी, नागरिक, शिक्षण विभागातील अधिकारी यांचे सहकार्य लाभले.

परसबाग करताना आलेल्या अडचणी :

१) शेतीच्या अवजारांची कमतरता.
२) बागकामासाठी मनुष्यबळाची कमतरता.
३) बागकामासाठी वेळेची उपलब्धता.
४) माती, विटा, दगड, बांबू, दोरे, इ. बाबींची कमतरता.
५) जनावरे व इतर प्राणी यांच्यापासून संरक्षण करणे.

अडचणींवर कशी मात केली :

१) माती, विटा, दगड, बांबू, तारा, दोरी, इ. साहित्य लोकसहभागातून मिळविले.
२) ग्रामपंचायत सांगवडे वाडी यांच्या सहकार्याने पाणी उपलब्ध करून घेतले.
३) कामासाठी विद्यार्थ्यांचे गट करून काम केले.
४) शारीरिक शिक्षण व कार्यानुभवाचे तास परसबागेसाठी वापरले.
५) गावातील प्रगतिशील शेतकऱ्यांकडून अवजारांची माहिती करून घेतली.
६) ग्राम पंचायतीच्या सहकार्याने तारेचे कुंपण करून घेतले.

परसबागेचे फायदे :

१) आवडीची व ताजी ताजी भाजी दररोज मिळाली.
२) पोषक व आरोग्यदायी भाजी मिळाली.
३) मुलांना भाज्या पिकवता आल्या. अंकूर, मूळ, पान, फूल, फळ असा वनस्पतींचा जीवनक्रम अनुभवता आला.
४) वेळ व पैशांची बचत झाली.
५) कचरा व्यवस्थापन करण्यात आले.
६) गरजेप्रमाणे भाजी वापरता आली.
७) मुलांना शेतीची आवड निर्माण झाली, श्रमांचे मोल समजले.
८) विविध भाज्या व त्यांच्या बिया यांची ओळख झाली.
९) मुलांमध्ये सामूहिक कामाची आवड निर्माण झाली.
१०) कमी जागेत भरपूर भाजीवाला पिकविता आला.
११) शाळेतील एका चांगल्या उपक्रमाला साथ देण्यासाठी पालकांचा संपर्क वाढला. शाळेबद्दल आपुलकी वाढली.

माझ्या नजरेतून CCRT प्रशिक्षण

रंजना भिसे
जि. प. प्राथ. शाळा डेहणे तळईपाडा, ता. डहाणू, जि. पालघर. ◆ भ्रमणध्वनी : ७०३८७६३७४०

प्रशिक्षण आहे म्हटले की, 'वैताग नुसता' 'काही नसतं त्यात' 'नुसता टाईम पास' 'माहिती आहे आम्हांला' असेच भाव चेहऱ्यावर उमटताना दिसायचे; पण आता तसं दिसत नाही. प्रशिक्षणातून आपण समृद्ध होत जातो हे पटू लागलं आहे. त्यामुळे प्रशिक्षणाकडे सकारात्मक दृष्टिकोनातून बघितले जाऊ लागले आहे. एका शिक्षिकेच्या नजरेतून CCRT च्या प्रशिक्षणाविषयी...

संस्कृती मंत्रालय, भारत सरकार यांच्या विद्यमाने सांस्कृतिक स्त्रोत एवं प्रशिक्षण केंद्र (CCRT), नवी दिल्ली आयोजित रायपूर, छत्तीसगड येथील प्रशिक्षण. हे प्रशिक्षण दि. ३०/१२/२०१९ ते ०९/०१/२०२० पर्यंत 'भारतीय सांस्कृतिक विविधता' या विषयाचे होते.

मुळात गुवाहाटी, नवी दिल्ली, उदयपूर, हैद्राबाद ही CCRT ची चार मुख्य प्रशिक्षण स्थळे माहीत असणारी मी. जेव्हा प्रशिक्षणाची ऑनलाईन लिंक आली, तेव्हा रायपूर पाहताक्षणीच निवडले आणि थोड्याच दिवसांत म्हणजेच प्रशिक्षण कालावधीच्या जवळपास ४० दिवस आधी मला मेल आली. माझी निवड झाल्याचे कळताच माझ्या आनंदाला पारावार उरला नाही. पालघर जिल्ह्यातून मी एकटीच असल्याचे मेलमधील शिक्षक यादीवरून समजले. एकूण तीनच शिक्षिकांची नावे यादीत होती. आम्ही एकमेकींशी भ्रमणध्वनीवरून संपर्क साधून रेल्वेचे आरक्षण केले आणि २८ डिसेंबर रोजी आम्ही निघालो; एका नवीन अनुभवाची दारे ठोठावण्यास, एका नवीन वातावरणात.

रायपूरच्या SCERT व DIET च्या सुंदर प्रांगणात आम्ही प्रवेश केला. तेथील उपस्थितांची स्वागताची रीत व आपलेपणा पाहून आम्ही अक्षरश: भारावून गेलो. राहण्याची व जेवणाची अतिशय उत्तम सोय होती. एकूण सात राज्यांचे शिक्षक प्रशिक्षणासाठी हजर होते. महाराष्ट्र, कर्नाटक, पाँडेचेरी, छत्तीसगड, नागालँड, राजस्थान व गुजरात या राज्यातील शिक्षकांनी हे ११ दिवसीय प्रशिक्षण अतिशय खेळीमेळीने व उत्साहवर्धक वातावरणात यशस्वीरीत्या पूर्ण केले.

तज्ज्ञ, कुशल अशा कारागिरांनी आम्हांला मुखवटे बनविणे, रंगमंचावरील हालचाली, ज्यूटकाम आणि गोंड पेंटिंग इ. चे उत्कृष्ट असे प्रशिक्षण दिले. तसेच विश्वविद्यालयातील उच्चशिक्षित, तज्ज्ञ अशा वक्त्यांनी सांस्कृतिक, विविधतेशी संबंधित विषयावर सखोल, विस्तृत मार्गदर्शन केले.

CCRT च्या विविध स्कॉलरशिप्स, पुरस्कार यांविषयीच्या फॉर्मची माहिती CCRT Co-ordinator श्री. अपूर्व पंत यांनी करून दिली व त्याचा लाभ घेण्याचे आवाहान केले. तसेच एकदिवसीय क्षेत्रभेटीचे आयोजनही CCRT तर्फे करण्यात आले. त्यात आम्हांला रायपूरमधील मुक्तांगण, जंगल सफारी, विज्ञानकेंद्र व श्रीराम मंदिर इ. प्रेक्षणीय स्थळांचे दर्शन घडविण्यात आले. रविवारी सुट्टी असल्यामुळे आम्ही सर्व प्रशिक्षणार्थींनी स्वखर्चाने गाडी बुक करून शिरपूर हे पुरातन मंदिरांचे गाव पाहण्याचे ठरविले. ५ व्या व ६ व्या शतकातील अतिशय आकर्षक अशी मंदिरे इथे उत्खननात सापडली आहेत. जवळच पवित्र महानदीचा काठ आहे. तिथे नयनरम्य अशा शांत वातावरणाचा अनुभव मिळाला.

CCRT प्रशिक्षणाची आगळीवेगळी व वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे आपापल्या राज्यांचे संस्कृती दर्शन इतरांना घडविणे. प्रत्येक राज्याला एक दिवस ठरवून दिलेला असतो. त्या दिवशी त्या शिक्षकांनी परिपाठाच्या वेळेत आपल्या पारंपरिक वेशभूषेत राज्याच्या विविध पैलूंचे दर्शन इतरांना करून द्यायचे. त्यात तुम्ही PPT दाखवू शकता. नृत्य, गीते सादर करू शकता. अशा प्रकारे भारतातील राज्यांची सर्वांना थोडक्यात ओळख होते.

प्रशिक्षणाच्या कालावधीत इतर राज्यांतील शिक्षकांची भाषा जरी वेगवेगळी असली तरी आपण आपल्या तोडक्या मोडक्या इंग्रजी व हिंदी भाषेतून आपल्या संभाषणाने एकामेकांचे जिवलग मित्रमैत्रिणी कधी होऊन जातो ते कळतच नाही.

खरंच, प्रत्येक शिक्षकाने एकदा तरी अशा आगळ्यावेगळ्या प्रशिक्षणाचा नक्कीच अनुभव घेतला पाहिजे आणि आपले अनुभवविश्व सर्वांगसुंदर केले पाहिजे, यासाठीच हा सर्व लेखनप्रपंच.

सकारात्मक दृष्टिकोनातून गणेशचे परिवर्तन

सविता पवार

जि. प. प्रा. शाळा. माताळवाडी क्र. २, ता. मुळशी, जि. पुणे.

मुलाला समजून घेणे, त्याच्या कलाने त्याला शिकविणे, त्याला प्रेरणा देणे, मार्गदर्शकाच्या भूमिकेतून त्याचे आत्मभान जागृत करणे आणि सकारात्मक दृष्टीने जगाकडे बघण्याचा दृष्टिकोन निर्माण करणे या बाबी लक्षात ठेवून आपल्या व्रात्य, मनमानी पण हुशार अशा विद्यार्थ्याचे परिवर्तन घडवून आणणाऱ्या एका शिक्षिकेस तिला समाधान देणाऱ्या हृदय अनुभवाविषयी...

आज आमच्या गणेशच्या चेहऱ्यावरचा आनंद ओसंडून वाहत होता. आज त्याच्या डोळ्यातील चमक आणि चेहऱ्यावर वेगळेच तेज दिसत होते. आम्हीही सगळे शिक्षक खूप आनंदाने 'उत्सवमूर्तीचा' चेहरा पाहत होतो. त्याचे अभिनंदन करीत होतो शाळेत जणू आनंदोत्सव साजरा होत होता आणि याचे कारणही तसेच होते. ते म्हणजे 'राज्यस्तरीय घनकचरा व्यवस्थापन' स्पर्धा सन २०१९, या स्पर्धेत त्याच्या 'टाकाऊतून कलात्मक शो पीस' या प्रकल्पाची निवड झाली होती. १४ व १५ फेब्रुवारी २०२० रोजी 'आयसर पुणे' येथे होणाऱ्या प्रदर्शनात सहभागी होण्याची संधी गणेशला मिळाली होती. माझ्या दृष्टीने गणेशला मिळालेली ही एक सुवर्णसंधीच होती. सकारात्मक प्रेरणेच्या दृष्टिकोनाचा एक शिक्षक म्हणून मला मिळालेले हे 'फळ' आहे.

खरंच! सकारात्मक दृष्टिकोनाने मुलांमध्ये कसे परिवर्तन घडू शकते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे गणेश. गणेश इयत्ता पाचवीत असताना अगदी खोडकर व मनमानी होता. असे असले तरी तो हुशारही होता. त्याने शिष्यवृत्तीचा सरावही खूप चांगला केला होता. नंतर मात्र तो एकदम इतका मूडी बनला, की त्याच्या मूडप्रमाणे बाईंना अभ्यासाचा सराव घ्यावा लागायचा. त्याला कसे सुधारावे? याच विवंचनेत आम्ही होतो. आई वडिलांचे छत्र हरविलेल्या मुलांची व्यथा/दुःख आम्ही प्रत्यक्षात पहात होतो. त्याला फक्त सहानुभूती देऊन उपयोग नव्हता. त्याला गरज होती ती सकारात्मक ऊर्जा, प्रेरणा देऊन त्याचे आत्मभान जागृत करण्याची!

जेव्हा तो सहावीत आला तेव्हा मी त्याला वर्गमंत्री बनवून 'गणेश'च्या परिवर्तनाचा श्रीगणेशा केला. प्रथम त्याच्यावर फलक लेखनाची जबाबदारी सोपविली. शाळेचा परिपाठ मंत्रीही त्यालाच केले. जणू काही गेल्या वर्षी पाचवीत काही घडलेच नाही, अशा सामान्य स्थितीतच मी प्रत्येक गोष्ट त्याच्याकडून करून घेऊ लागले आणि त्याच्यातील हळूहळू होणारे बदल टिपत राहिले. सुरुवातीला फलक लेखनासाठी आढेवेढे घेणारा गणेश आता रोज एक नवीन सुविचार शोधून लिहितो, तेही सुंदर हस्ताक्षरात. तसेच अजूनही काही पैलू उलगडले गेले ते पुढीलप्रमाणे :

- गणेश सलग २००–२५० दोरी उड्या न थकता मारतो. त्याची दमश्वास क्षमता चांगली आहे.
- क्रीडा स्पर्धेतही थाळीफेक व गोळाफेकमध्ये त्याने उल्लेखनीय कामगिरी केली.
- परसबागेतही तो मनापासून काम करतो. रोपांची काळजी घेतो. त्याला शेतीच्या कामाची आणि औजरांचीही उत्तम जाण आहे.
- पेटीवर राष्ट्रगीत, समूहगीत उत्तमरीत्या अगदी चपखलपणे वाजवितो.
- प्रजासत्ताकदिनी कवायत संचलनाचे नेतृत्व त्याने केले.
- कोणतेही चित्र अगदी सुंदर काढतो आणि रंगसंगती खूपच छान करतो.
- शाळेत स्वच्छ गणवेशात टापटीपपणे व नियमित येतो.
- सूर्यनमस्कार, मनोरे स्वतः अचूक करून इतरांनाही मार्गदर्शन करतो.

असा हा आमचा सर्वगुणसंपन्न विद्यार्थी १४ व १५ फेब्रुवारीला 'आयसर' पुणे येथे घनकचरा व्यवस्थापन राज्यस्तरीय स्पर्धेत सहभागी होतो, ही आमच्या शाळेच्या आणि शिक्षकांच्या दृष्टीने अभिमानाची गोष्ट आहे. तेथे त्याने उल्लेखनीय कामगिरी केली आणि संधीचे सोने करणे काय असते. याचा प्रत्यय आम्हां सर्व शिक्षकांना दिला.

मुलाला समजून घेणे, त्याच्या कलाने त्याला शिकविणे, त्याला प्रेरणा देणे, मार्गदर्शकाच्या भूमिकेतून त्याचे आत्मभान जागृत करणे आणि सकारात्मक दृष्टीने जगाकडे बघण्याचा दृष्टिकोन निर्माण करणे, या सर्व बाबींच्या यशस्वितेचे समाधान एक वर्गशिक्षिका म्हणून मला निश्चितच वाटेल.

किचन शेड ते शाळा सभागृह

दीपक मगर
जि. प. प्राथ. शाळा मोगरवाडी (कोंजवडे), ता. पाटण, जि. सातारा. ◆ भ्रमणध्वनी : ९८२२४५६५१४

शून्यातून विषय निर्माण करणाऱ्या अनेकांच्या यशोगाथा आपण वाचतो. मोगरवाडीच्या शिक्षकांनी आणि गावकऱ्यांनी, वाऱ्याने छत उडून गेल्यामुळे देवळात भरणारी शाळा, श्रमदान करून आणि लोकसहभागातून भौतिक सुविधांनी कशी संपन्न केली त्या प्रवासाविषयी...

पाटण तालुक्यातील तारळे भागात कोंजवडेच्या डोंगरावर वसलेले मोगरवाडी हे दुर्गम गाव ना रस्ते, ना पाणी.

डोईवरती घेऊन माठ, तुडवीत जाती पाऊलवाट...

शोधावया निर्झरा'...अशी स्थिती.

भौतिक सुविधांपासून कोसो दूर असलेल्या या गावातील शाळेचे छत कधीकाळी वाऱ्याच्या प्रचंड वेगाने उडून गेले होते. तेव्हापासून शाळा देवळात भरत होती. बदली होऊन आलेल्या शिक्षकांनी गावकऱ्यांच्या मदतीने त्याच देवळाचा कायापालट करायचा निश्चय केला आणि थोड्या दिवसांतच मंदिराचे ज्ञानमंदिरात रूपांतर झाले.

सर्व मुलांसाठी शासकीय योजना आणि दानशूर व्यक्तींच्या माध्यमातून विविध शालोपयोगी वस्तू उपलब्ध करून देण्यात आल्या. बदलून गेलेल्या दिवेकर सरांनी मुलांसाठी टॅब भेट दिला.

पावसाळा संपत आला होता, दरम्यान किचनशेडचा दिलेला प्रस्ताव मान्य झाला होता. नेमकी तेव्हाच शासनाच्या तंबाखूमुक्त अभियानास सुरुवात झाली होती. त्यासाठी ग्रामस्थांची बैठक आयोजित केली. त्या बैठकीत खूप काही ठरले. बैठक संपताच महिला, पुरुष, लहानसहान मुले सारेचजण लगेच कामाला लागले. बघता बघता दारासमोरचे, रस्त्यांतील मोठमोठाले दगड बाजूला झाले, साफसफाई झाली, सगळी अडगळ दूर झाली. सारे कसे लख्ख-लख्ख....

दुसऱ्या दिवशीच जेसीबी मशिन मागविण्यात आले. किचनशेड बांधकाम साहित्य आणण्यासाठी रस्ता करायला सुरुवात झाली आणि अवघ्या दोनशे मीटर अंतरावर जेसीबी मशिन पलटी झाले. त्या भयंकर परिस्थितीत सारेच घाबरले. तात्काळ दुसरे जेसीबी मशिन आणि ट्रॅक्टर मागविला. गावातून अगदी देवळापर्यंतचा रस्ता बघता-बघता पूर्ण झाला. शाळेची छत नसलेली जुनी इमारत पाडली गेली. महिलांनी, मुलांनी तातडीने ती जागाही मोकळी केली.

दरम्यान सर्व महिलांमध्ये विलक्षण विश्वास निर्माण करीत त्यांना तंबाखू, मिश्रीमुक्त करण्यात शिक्षकांना यश मिळाले होते. या सर्व महिलांचा पदाधिकारी, अधिकारी यांच्या हस्ते साडीचोळी देऊन गौरव करण्यात आला. पत्रकार मित्रांनी दखल घेतली, तारळे विभागाच्या गुणगौरव कार्यक्रमात सर्व गावाचा सत्कारही झाला.

कोंजवडे गावचे सरपंच, उपसरपंच, कार्यकर्ते, अधिकारी आणि गावकऱ्यांच्या हस्ते किचनशेडचे भूमिपूजन संपन्न झाले, पाया खणला. साहित्य आणायला सुरुवातही झाली पण, वाळूचा पहिलाच ट्रॅक्टर सुरुवातीचा चढ चढेनासा झाला. मात्र प्रसंगी दोन-दोन, तीन-तीन ट्रॅक्टर एकमेकांना जोडून बांधकाम साहित्य जागेपर्यंत पोहोचले.

देवळाची दुरुस्ती सुरू झाली होती. शाळा आता झाडाखाली भरू लागली होती. फाऊंडेशन पूर्ण झाले होते. त्यात भराव टाकण्यासाठी श्रमदानाचे आयोजन करण्यात आले. रविवारी सुट्टीच्या दिवशीही कार्यकर्ते, अधिकारी, शिक्षक, मित्र, नातलग असे एकूण ६६ जण मदतीसाठी आले, तब्बल साडेतीन तास सर्वांनी जीव ओतून काम केले. सारे फाऊंडेशन भराव टाकून पूर्ण झाले. श्रमदात्यांच्या श्रमपरिहाराकरिता केलेला झणझणीत पिठलं भाकरीचा बेत सर्वांनाच आवडला. सारे तृप्त झाले.

जेसीबीच्या साहाय्याने राहिलेला भराव पूर्ण केला. थोड्याशा विश्रांतीनंतर श्रमदानाचा दुसरा टप्पा आयोजित केला. या वेळी तर तब्बल ११२ जण श्रमदानासाठी आले. सुमारे तीन तास

सर्वांनी बेभान होऊन काम केलं. सहा-सात हजार विटा, लोखंड, पत्रे सारे साहित्य जागेवर आले. झणझणीत पिठलं-भाकरीचा पाहुणचार याही सर्वांना आवडला.

दैनिक सकाळ, पुढारी, तरुण भारत, लोकमत, प्रभात, इ. पत्रकार मित्रांनी वेळोवेळी दखल घेत मोगरवाडी सर्वदूर पोहोचविली.

३१ डिसेंबर साजरा करण्यासाठी लोक पर्यटनस्थळी जातात, मात्र तारळ्याचे सुपुत्र आणि मुंबई महापालिकेचे सहायक अभियंता श्री. सुहास वसंत नेमाने साहेब सहकुटुंब मोगरवाडीला आले. शिक्षणक्षेत्रात लाखमोलाचे योगदान देणाऱ्या या अवलियाने एक लाखाची देणगी शाळा बांधकामासाठी दिली.

नववर्षाची सुरुवात सुद्धा तितक्याच जोमाने झाली. कोंजवडे गावचे विद्यमान सरपंच, उपसरपंच, कार्यकर्ते यांनी १४ व्या वित्त आयोगातून लॅपटॉप, प्रिंटर, स्मार्ट टी.व्ही. असे एकूण ५० हजारांचे दर्जेदार ई-लर्निंग साहित्य भेट देत शाळेची वाटचाल सुकर केली. श्रमदात्यांचे श्रम, नेमाने साहेबांचे योगदान आणि ग्रामपंचायतीची साथ यांमुळे सर्व ग्रामस्थ एक झाले आणि तब्बल दोन लाख रुपयांची मदत शाळा बांधकामासाठी पर्यायाने गावाच्या विकासासाठी दिली.

'डोंगरमाथा उघडी राने, काय कमाई कोण जाणे,

विशाल सागरासम इथली मने, मोगरवाडीमधे काय उणे?

ग्रामस्थांच्या गरिबीतील श्रीमंतीचे खरे दर्शन इथेच घडले.'

विविध मान्यवरांच्या भेटी होतच होत्या. बांधकामानेही गती घेतली होती. प्लॅस्टर, फरशी, रंगकाम असे अंतिम स्वरूप प्राप्त होऊ लागले होते.

शिक्षकांच्या कल्पना प्रत्यक्षात उतरल्या, भिंती चितारल्या, रेखाटल्या, नटल्या. नभ उतरलं, हिरवळ दाटली, वृक्षवल्ली अवतरली.. सारं कसं विलोभनीय...अविश्वसनीय...

नव्या शाळेच्या सभागृहात ग्रामस्थांची पहिली बैठक झाली. नवी नवेली शाळा पाहून सारीच हरखली. लागलीच लर्निंग सॉफ्टवेअर बसवून प्रत्याक्षिक दाखविले. शिक्षक मित्र व मित्रपरिवाराने दिवस दिवस साथ दिली. अंतरंगाला आणखीच झळाळी लाभली.

नेमाने साहेबांनी पुन्हा एक लाखाची मदत दिली, मित्रपरिवाराने लाखभराची साथ दिली आणि सर्वांच्या श्रमदानातून आणि योगदानातून ११ × ११ चे किचन शेड ते ३० × ४० चे सुसज्ज शाळा सभागृह असा विलक्षण प्रवास अखेर पूर्ण झाला.

२ मे रोजी लोकार्पण सोहळा निश्चित झाला. कार्यक्रमाला जेमतेम आठ दिवस बाकी असताना प्रचंड वेगाचा वारा आणि सोबत टपोऱ्या गारा घेऊन पाऊस आला, मोगरवाडीवर धो धो बरसून गेला. सारा फुफाटा, सारा पसारा लख्ख लख्ख स्वच्छ करून गेला.

२ मे २०१९ लोकार्पण सोहळ्याचा दिवस उजाडला, गावकऱ्यांनी गुढ्या उभारल्या, रांगोळ्या काढल्या, कार्यक्रमासाठी मंडप उभारला, उपस्थितांच्या भोजनाची व्यवस्थाही केली. सारे वातावरण प्रसन्नतेने भरून गेले होते.

कार्यकर्ते, अधिकारी, शिक्षक, मित्र, सगेसोयरे यांचे आगमन झाले. सारे जसे येतील तसे तडक शाळेकडे जात होते. सारे काही डोळ्यांत आणि मोबाईल कॅमेऱ्यात टिपत होते.

नियोजित वेळेत मान्यवरांचे आगमन झाले. गावकऱ्यांनी त्यांचे वेशीवरच स्वागत केले. आपुलकीने सोबत आणले. भगिनींनी औक्षण केले. सन्मानाने शाळेच्या प्रांगणात आणले. तिथे सारे क्षणभर विसावले.

पुन्हा कार्यक्रमाची लगबग सुरू झाली. मान्यवरांच्या हस्ते शाळा सभागृहाचे लोकार्पण झाले. कोनशिलांचे अनावरण झाले आणि खऱ्या अर्थाने मोगरवाडीकरांचे शाळेचे स्वप्न साकार झाले. पुन्हा सारे मंडपात परतले. दीपप्रज्वलन, मान्यवरांचे स्वागत, प्रास्ताविक झाले.

दात्यांना मानपत्र, श्रमदात्यांना आभारपत्र देऊन गौरविण्यात आले. अगदी बांधकाम करणाऱ्या गवंड्यांपासून ते दोन-तीन ट्रॅक्टर एकमेकांना बांधून साहित्य पोहोचविणाऱ्या, पाण्याच्या टँकरच्या ३० खेपा करून वेळच्यावेळी पाणी पुरविणाऱ्या, पर्यायी रस्ता उपलब्ध करून देत सहकार्य करणाऱ्या आणि शिक्षकांच्या हाकेला हाक देत रात्रंदिवस राबणाऱ्या गावकऱ्यांपर्यंत सर्वांनाच मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. सारे कसे तृप्त झाले.

मान्यवरांची मनोगते झाली, प्रत्येकाची दखल घेतली.

किचन शेडचा प्रवास मोगरवाडीत सुरू झाला खरा पण तो थांबला, मात्र सुसज्ज अशा सभागृहापर्यंतह येऊन. सोबत मंदिर जीर्णोद्धार, विंधन विहीर-पाणवठा आणि स्माशानभूमी पूर्णत्वास नेऊनच.

अनेकांचे कष्ट आणि दातृत्व आज लाखमोलाचे ठरले. अत्यंत तळमळीने आणि उदात्त भावनेने आपण सर्वांनी लावलेला हातभार मोगरवाडीकरांसाठी अभिमानास्पद आणि अविस्मरणीय...

आनंददायी भाषा शिक्षण कार्यक्रमाच्या निर्मितीचा आणि अंमलबजावणीचा मागोवा

सचिन लोखंडे

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे. ◆ भ्रमणध्वनी : ९८८११४५५३८

सन २००८-०९ मध्ये राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने इयत्ता पहिलीसाठी वाचनकेंद्री भाषा शिक्षणाचा कार्यक्रम राबविला होता. 'आनंददायी भाषा शिक्षण कार्यक्रमाच्या निर्मितीचा आणि अंमलबजावणीचा मागोवा अभ्यास' हा दस्तावेज असणारा अहवाल तयार केला. आपण केलेले कार्य इतरांना पुढील कार्यात मार्गदर्शक, उपयोगी ठरावे, यासाठी ते आगळ्या-वेगळ्या पद्धतीने कसे मांडावे याविषयी माहिती देणारा लेख...

शिक्षण प्रक्रियेत सातत्याने बदल होत असतात. हे बदल प्रामुख्याने अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत सतत सुरू असतात. समोर आलेला विद्यार्थी, त्याची स्थिती, परिस्थिती, त्याचा शैक्षणिक स्तर कोणता यावर हे पात्र ठरतात; त्यानुसार शिक्षक अध्ययन अनुभवांची रचना करतात. विद्यार्थ्याला समजावे यासाठी शिक्षक सतत वेगवेगळे प्रयोग करीत असतात. यासाठी कधी ते स्वतःचे अनुभव सांगतात तर कधी सहकारी शिक्षकांचे. WhatsApp,instagram या सारख्या संपर्क साधनांमुळे राज्यातील व राज्याबाहेरील शिक्षकांचेही उपक्रम त्यांना पाहण्यास मिळतात. काही वेळा शिकविण्याचा नवीन अनुभव ते घेतात तर कधी जुनेच अनुभव बदललेल्या परिस्थितीत कसे उपयोगी पडतात याचा अनुभव घेतात. या सर्व प्रकारांतून अध्ययन-अध्यापन, मूल्यमापन इ. मध्ये त्यांना यश मिळत राहते. त्याचे प्रमाण अर्थात कमी-जास्त असू शकते. पर्यवेक्षीय अधिकारीही आपल्या कार्यक्षेत्रानुसार विद्यार्थ्यांच्या संपादणुकीत वाढ व्हावी, यासाठी वेगवेगळे नवीन शैक्षणिक कार्यक्रम आपापल्या कार्यक्षेत्रात घेत असतात परंतु हे सगळे कार्य त्यांच्यापुरते, त्यांच्या कार्यक्षेत्रापुरते मर्यादित राहते किंवा काही कालावधीपुरतेच राहते. खरे तर त्यांच्या शैक्षणिक कार्याची, त्यांच्या यशाची माहिती इतरांना करून देण्याची गरज आहे. आपण केलेल्या कार्याची माहिती दुसऱ्यांना समजेल अशा पद्धतीने कशी मांडावी याची कल्पना फारच थोड्या लोकांना असते. त्यामुळे त्यांचे कार्य इतरांपुढे व्यवस्थित येत नाही, तसेच आपण केलेले कार्य पुढील काळात किती उपयोगी ठरणार आहे याची कल्पना त्यांना नसल्यामुळे, या कार्याचे व्यवस्थित दस्तावेज करून ठेवणे राहून जाते. शिवाय अशा प्रकारचे उदाहरण समोर असल्याने ते कसे ठेवायचे ते कळत नाही. यावर उपाय म्हणजे असे संशोधन अहवाल व दस्तावेज पाहणे. असाच एक दस्तावेज नुकताच प्रसिद्ध झाला आहे. सन २००८-०९ मध्ये राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने इयत्ता पहिलीसाठी वाचनकेंद्री भाषा शिक्षणाचा कार्यक्रम राबविला होता. त्याविषयी डॉ. व. सी. देशपांडे यांनी 'आनंददायी भाषा शिक्षण कार्यक्रमाच्या निर्मितीचा आणि अंमलबजावणीचा मागोवा अभ्यास' हा दस्तावेज असणारा अहवाल तयार केला व 'आपणच' या स्वयंसेवी संस्थेने प्रसिद्ध केला. आपण केलेले कार्य इतरांना पुढील कार्यात मार्गदर्शक, उपयोगी ठरावे, यासाठी ते आगळ्या व वेगळ्या पद्धतीने कसे मांडावे याचे उत्तम उदाहरण म्हणजे हा अहवाल आहे.

लेखकाविषयी थोडेसे :

विद्या वाचस्पती डॉ. व. सी. देशपांडे, सेवानिवृत्त भारतीय शिक्षण संस्थेचे माजी प्रकल्प संचालक, एस.एन.डी.टी. अध्यापिका महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक आहेत. इयत्ता पहिली ते आठवीच्या अभ्यासक्रम २०१२ च्या मराठी विषय समितीचे अध्यक्ष आहेत. वाचन व भाषा शिक्षणावर १९६८ पासून काम करणारे, पूर्वीच्या राज्य शिक्षण संस्थेचे म्हणजेच आताच्या राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र' चे विद्यार्थी आहेत. डॉ. चित्रा नाईक आणि डॉ. ना. के. उपासनी यांचे पीएचडी साठी मार्गदर्शन लाभलेले अभ्यासक आहेत. महाराष्ट्रात सन २००८-०९ मध्ये ७०००० पेक्षा अधिक शिक्षकांना आनंददायी वाचन प्रकल्पाचे प्रशिक्षण दिले गेले त्याचे जनक म्हणजे शिक्षणतज्ज्ञ डॉ. व. सी. देशपांडे. डॉ. देशपांडे यांनी सन १९६९ मध्ये प्रायोगिक स्तरावर

प्रारंभकांना वाचन शिकविण्याची समावेशक पद्धती शोधून सिद्ध केली आहे व ४० वर्षांहून अधिक काळ वेगवेगळ्या परिस्थितीत पडताळून पाहिलेली आहे. त्यांचे हे कार्य अविरतपणे सुरू आहे.

आनंददायी वाचनकेंद्रीभाषा शिक्षण कार्यक्रम पूर्वपिठिका :

सन २००७ मध्ये प्रथम संस्थेमार्फत घेतलेल्या सर्वेक्षणात असे लक्षात आले की, पहिलीतील केवळ १२.६% मुले आपल्या स्तराचे वाचन करू शकत आहेत. त्यामुळे या परिस्थितीत सुधारणा करण्यासाठी वाचनकेंद्री भाषा शिक्षणाचा कार्यक्रम हाती घेण्याचे परिषदेने ठरविले. त्यासाठी डॉ. व. सी. देशपांडे व डॉ. चित्रा सोहनी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रारंभकांना वाचन शिकविण्याची समावेशक पद्धती सुरुवातीला पथदर्शी स्वरूपात काही शाळांमध्ये पडताळून पहायची व त्यात गरजेनुसार योग्य ते बदल करून संपूर्ण राज्यात ती सुरू करायची असे ठरले.

आनंददायी वाचनकेंद्रीभाषा शिक्षण कार्यक्रम :

सन २००७-०८ मध्ये पथदर्शी स्वरूपात पुणे व परिसरातील ९४ शाळांमध्ये (सर्व प्रकारच्या शाळांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या शाळा) प्रायोगिक स्वरूपात राबविला गेला. डॉ. देशपांडे व डॉ. चित्रा सोहनी यांच्या मार्गदर्शनाखाली, महाराष्ट्रातील विविध भागांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या होतकरू, उत्साही व प्रयोगशील शिक्षकांमार्फत अध्ययन साहित्य, शिक्षकांसाठी मार्गदर्शिका, विद्यार्थ्यांसाठी वाचन कार्डे तयार करण्यात आली. यात शिक्षक व त्यांच्या पर्यवेक्षण यंत्रणेचे तसेच परिषदेतील अधिकाऱ्यांचे उद्बोधन करण्यात आले. शिक्षकांनी या पद्धती द्वारे शिकविण्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतला. मुलांना आनंददायी अध्ययन अनुभव दिले गेले; त्यासाठी अर्थातच वाचन हे केंद्रस्थानी ठेवण्यात आले होते. चाचण्या, निरीक्षण पत्रे, शिक्षक प्रश्नावल्या, अभिवृत्ती मापिका यांद्वारे माहिती घेऊन तिचे विश्लेषण करून निष्कर्ष काढले गेले. त्यावर परिषदेने 'आनंददायी वाचनकेंद्री भाषा शिक्षणाचा अभ्यास' नावाची पुस्तिकाही प्रकाशित केली. त्या अनुभवांवर साहित्यामध्ये सुधारणा केली गेली. पुढे हा कार्यक्रम महाराष्ट्रातील मराठी व उर्दू माध्यमाच्या सर्व शाळांमध्ये इयत्ता पाहिलीसाठी विस्तारित करायचा व नंतर पुढील इयत्तांसाठी विकसित करायचा असा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. त्यानुसार सन २००८-०९ मध्ये सत्तर हजार शिक्षकांचे प्रशिक्षण झाले, या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांसाठी वाचन कार्ड संच विकसित केला होता परंतु विद्यार्थ्यांना आवश्यक असणारी वाचन कार्डे काही तांत्रिक अडचणींमुळे शाळांपर्यंत वेळेत पोहोचली नाहीत. कार्यक्रमाची कार्यवाही तर शाळापातळीवर सुरू झाली होती. या कार्यक्रमाचे फलित पडताळून इयत्ता चौथीपर्यंत हा कार्यक्रम टप्प्याटप्प्याने विकसित करण्याची योजना होती. पुढे हे कार्य परिषदेच्या परवानगीने 'आपणच' या संस्थेने ३५०० शाळांमध्ये केले.

'आनंददायी भाषा शिक्षण कार्यक्रमाच्या निर्मितीचा आणि अंमलबजावणीचा मागोवा अभ्यास' :

सन २००९-१० मध्ये सुरू झालेल्या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीची परिणामकारकता या संस्थेमार्फत छोट्या प्रमाणात का होईना तपासायचे ठरले. डॉ. देशपांडे सरांच्या चमूने नवी पद्धती वापरताना शिक्षकांचा अनुभव, विद्यार्थी-विद्यार्थी, शिक्षक-विद्यार्थी आंतरक्रिया या अनुभवांचा अभ्यास, शिक्षकांना या कार्यक्रमाच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी, मूल्यमापन पद्धतीत केलेले बदल समजून घेणे इ. उद्दिष्टे समोर ठेवून व्यक्ती अभ्यास पद्धतीने शाळांचा अभ्यास करणे व निवडलेल्या शाळांचा तुलनात्मक अभ्यास करायचे ठरविले. यासाठी राज्यातील विद्यापीठे, शिक्षणशास्त्र महाविद्यालये आणि विद्यालये, विद्यार्थी यांचे सहकार्य घेण्यात आले.

माहिती गोळा करण्याची साधने :

आनंददायी भाषा शिक्षणाच्या अभ्यासकांना व्यवस्थित सूचना देण्यात आल्या. त्यांच्याकडून माहिती संकलित करण्यासाठी समन्वयक नेमण्यात आले होते. कार्य करण्याचे सुव्यवस्थित नियोजन करण्यात आले होते. अभ्यासकांना पुढील साधने देण्यात आली.

१. **पडताळा सूची :** यामध्ये शिक्षकांना पुरविलेली साधने, त्यांनी तयार करावयची साधने, नोंदी, अध्ययन-अध्यापनावर होणारा परिणाम, कार्यक्रमाची अंमलबजावणी इत्यादी बाबतच्या प्रतिक्रिया यांची माहिती या साधनाद्वारे घेतली गेली.

२. **विद्यार्थ्यांच्या आंतरक्रिया नोंद तक्ते :** गटात चालणाऱ्या विद्यार्थ्यांच्या क्रिया-प्रतिक्रियांचे स्वरूप आणि त्यातील सहभागी विद्यार्थी, त्यासाठी त्यांना मिळणाऱ्या सुविधा, निर्माण होणाऱ्या अडचणी इ. चा पडताळा पाहण्यासाठी हे तक्ते तयार करण्यात आले होते.

३. **नवोपाययोजनेच्या शिक्षक आकलनासंबंधी प्रश्नावल्या :** यामध्ये शिक्षकांना वाचन शिकविण्याची पद्धती समजली का? विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्य विकसनावर कसा परिणाम होत आहे, या पद्धतीबाबत त्यांची अभिवृत्ती कशी (सकारात्मक/नकारात्मक) होती, साहित्य मिळणे वा न मिळणे याचा परिणाम इ. बाबत मते.

४. **नवोपाययोजनेसंबंधी पालकांबरोबरच्या चर्चेसाठी प्रश्न :** पालकांचे या योजनेविषयीचे मत, (अनुकूल/प्रतिकूल), पालकांच्या मनातील शंका इ. समजून घेण्यासाठी हे प्रश्न तयार करण्यात आले होते.

५. **मुख्याध्यापकांसाठी मुलाखत पत्रिका :** नव्या कार्यक्रमाबाबत मुख्याध्यापकांची मानसिकता, त्यांची समज, अंमलबजावणीतील सहभाग, त्यांची मते इ.

माहितीचे संकलन करून, विश्लेषण करण्यात आले व अर्थनिर्वचन करून निष्कर्ष लिहिण्यात आले आणि राज्य स्तरावरील प्रशासन, परिषदेतील विभाग स्वयंसेवी संस्थांची जबाबदारी, प्रशासनातील संस्थांचा समन्वय, नवोपाय योजनेतील सातत्य, शिक्षकांचे प्रशिक्षण, प्रशिक्षण पद्धती, प्रशिक्षण साहित्य, तंत्रज्ञानाचा वापर इ. बाबत शिफारशी देण्यात आल्या.

'आनंददायी भाषा शिक्षण कार्यक्रमाच्या निर्मितीचा आणि अंमलबजावणीचा मागोवा अभ्यास' या पुस्तिकेत भाषा शिक्षण कार्यक्रमाची माहिती मिळते. त्यासोबतच आपण राबवीत असलेल्या कार्यक्रमाचे दस्त कसे करावे याची नेहमीपेक्षा वेगळी असलेली पद्धती पण कळते.

आपण आपल्या कार्यक्षेत्रात (वर्ग, शाळा, केंद्र, बीट, तालुका इ.) विविध प्रयोग करीत असतो, काही कार्यक्रम राज्याने दिलेले असतात, त्यांची अंमलबजावणीही करीत असतो. प्रशिक्षण साहित्य, प्रशिक्षण पद्धती, शिक्षक, मुख्याध्यापक, पालक यांची अभिवृत्ती, विषयाची जाण, पर्यवेक्षण यंत्रणेची जबाबदारी, विद्यार्थ्यांवर होणारा परिणाम इ. चा अभ्यास करून माहिती संकलन करून अहवाल तयार करणे व शिफारशी करणे आवश्यक आहे. त्यासाठी डॉ. व. सी. देशपांडे (भ्रमणध्वनी – ९८८११४५५३) यांचा परिषदेने घेतलेल्या 'आनंददायी भाषा शिक्षण कार्यक्रमाचा अभ्यासपूर्ण अहवाल निश्चितच उपयोगी ठरेल.

◈◈◈

(पृष्ठ क्र. २७ वरून)

शाळेत चावडी वाचनाचा कार्यक्रम होता. मी स्वत: वाडीत जाऊन पालकांना आवर्जून उपस्थित राहण्यास सांगितले. वाडीतील मुलींनी वाचनात घेतलेला सहभाग बघून पालकांचा विश्वासच बसेना. तीन महिन्यांत झालेला बदल मलाही खूप ऊर्जा देत होता. दिव्याने दिवा पेटवून दीपमाळ तयार व्हावी, तशी रेणुकाच्या जिद्दीतून इतरांच्यातही शिकण्याची जिद्द निर्माण झाली आणि एक-दोन विद्यार्थ्यांचा अपवाद वगळता सर्व विद्यार्थ्यांचा अध्ययन स्तर बदलला होता.

तीन महिन्यांनी शाळेत काव्यलेखन स्पर्धेत रेणुकाने 'कडुलिंब' ही स्वरचित कविता सादर केली तेव्हा सर्वांना आश्चर्य वाटले आणि कौतुकही वाटले.

रेणुकाचे वाचायला शिकणे, कविता लिहिणे शाळेमध्ये औत्सुक्याचा आणि तितकाच कौतुकाचाही विषय झाला होता. अशा अजून खूप रेणुका आपल्या शाळांमध्ये आहेत. त्यांना समजून घेऊन शिक्षण प्रवाहात आणणे आणि टिकविणे ही आपली सर्वांची नैतिक जबाबदारी आहे. चला तर मग, अशा अनेक रेणुका आहेत ज्यांना शिकण्याची जिद्द आहे. त्यांचा शोध घेऊन त्यांना शिक्षणाची दारं खुली करू या! त्यांच्या जिद्दीला, आकांक्षांना नवे बळ देऊन उंच भरारी घेण्यासाठी आकाश मोकळे करू या!

◈◈◈

फक्त तुझ्यामुळे...(कोरोनास पत्र)

शुभांगिनी वासनिक (नायर)

–

हे कोरोना,

'कोरोना ' हे तुझे नुसते नावही ऐकले तरी धसकाच बसतो. आज तू अख्ख्या जगाची झोप उडवली आहेस. कोरोना हा लॅटीन शब्द असून त्याचा अर्थ होतो क्राऊन! क्राऊन म्हणजेच 'मुकुट! खरंच रे तूच मुकुटधारी राजा ठरला आहेस. तसा तुझा जन्म चीनमधला, पण तू सर्व जगात थैमान घालत आहेस. २०० नॅनो मीटरपेक्षाही सूक्ष्म तू, पण तुझ्यासमोर आम्ही मानव खूपच खुजे वाटायला लागलो. आम्ही विकसित केलेले तंत्रज्ञान व वैज्ञानिक प्रगती तुझ्यापुढे काहीच नाही. हे तू पुन्हा एकदा सिद्ध केलेस.

कित्येक जण दवाखान्यात रडत आहेत तडफडत आहेत. महात्मा गांधीजींनी खेड्याकडे चला म्हणून सांगितलं पण आम्ही नाही ऐकलं. आता मरणाच्या भीतीने लोक खेड्याकडे पळत आहेत. ज्यांना विदेशात जाणे म्हणजे स्टेटस सिंबॉल वाटायचं त्यांना तुझ्या निमित्ताने का होईना आज 'भारत माझा देश आहे' या वाक्याची आठवण झाली आहे. शाळा-कॉलेज, देवालये, सिनेमागृहे लग्न समारंभ बंद झाले आहेत. अस ऐकलंय की, तू हवेत तीन तास, तांब्यावर चार तास, कार्ड बोर्डवर २४ तास, प्लॅस्टिक वर ७२ तास, स्टील वर ७२ तास आणि कागदावर २४ तास, जिवंत राहतोस. पंचावन्न डिग्री सेल्सिअसपेक्षा जास्त तापमानात तुझा मृत्यू होतो. तुझा आकार जरी सूक्ष्म असला तरी तू खूप मोठा आहेस हे पुरते कळले रे बाबा आम्हां समस्त मानव जातीला! आता काम धंदा बंद झाला. घर नसलेल्यांचे काय विचारावे! त्यांचं जगणंच भयंकर झालं आहे. जिवावर उदार होऊन माणसं गावाकडे निघाली. माणसं एकमेकांना भेटायला आसुसली. माणसांच्या गर्दीतून माणूसच गायब झाला रे ! सगळं असूनही माणूस एकटा झाला. गर्दीने भरलेले रस्ते एकाकी, सामसूम झालेत. हॉटेल्समधून दरवळणारा सुवास, खिदळणारे रस्ते सर्वच गायब!

या स्पर्धेच्या युगात कुणालाही कुणासाठी थांबायला वेळ नव्हता. प्रत्येक जण धावत सुटला होता आणि तू अचानक आलास व या सर्वांची गती नुसती कमी केली नाहीस तर पूर्णपणे थांबवलीस. फार अफाट ताकतीचा रे तू ! आमच्या चक्रव्यूहात आम्हीच फसलो. अगदी अभिमन्यू प्रमाणे ! आणि हो, तुला एक सांगायचं म्हणजे आम्हांला प्रदूषणाची जी समस्या भेडसावत होती ती मात्र तुझ्या येण्यामुळे नष्ट झाली आहे. कमालच आहे बुवा तुझी! पशुपक्षी मोकळे आहेत आणि माणूस आपल्याच पिंजऱ्यात बंदिस्त झाला आहे.

या परिस्थितीत देवाचा धावा करायचा, तर आज त्यानेही त्याचे दरवाजे बंद करून घेतले आहेत. तोही रोजच्या भक्तांमुळे हैराण झाला असेल ना! तोही माणसाच्या स्वार्थी वृत्तीला वैतागला असेल ना ! कारण माणूस प्रत्येक वेळी त्याच्याकडे काहीतरी मागायलाच जातो. देवाला लाच देतो. देवा, मला अमूक अमूक दे म्हणजे मी तुला कोंबडा देईन किंवा बकरा देईन, तर कुणी तुला सोन्या चांदीने मढवू असे म्हणतो. खरंच आम्ही कधी तरी विचार केलाय का रे, की देवाला खरंच हे सगळं हवंय का? बरं झालं बाबा, तुझ्या येण्यामुळे आता त्यालाही आराम मिळाला. तो तरी किती मागण्या पूर्ण करणार आम्हां भक्तांच्या ! पण एक विशेष सांगायचं म्हणजे आमच्या देवरूपी डॉक्टरांचे दरवाजे मात्र सदैव उघडे आहेत. तू कितीही मोठा घात करणारा कोरोना वायरस का असेनास परंतु आमच्या डॉक्टरांनी तुझ्यावर मात करण्यासाठी आपल्या प्रयत्नांची शिकस्त चालवलीय. आपल्या कर्तव्यासाठी त्यांनी आपल्या घरदाराची, लेकरा-बायकांचीही पर्वा केली नाही. मग मनात विचार येतो की, देव आपल्या मंदिराचे दरवाजे बंद करून दवाखान्यात तर गेला नसेल ना! होय आता कळलं की मंदिरांपेक्षा आपल्याला दवाखान्यांची गरज जास्त होती. हे तर खरं आम्हांला फार पूर्वी गाडगेबाबांनीही सांगून पाहिलं होतं. पण आम्हांला कधी कळलंच नाही. बऱ्याच गोष्टी आम्हांला कळत होत्या पण वळत नव्हत्या. स्वच्छता किती महत्त्वाची! पण तुझ्या येण्यामुळ कळले की आता स्वच्छता अभियान सर्वांनीच राबविणे महत्त्वाचे! हे तुझ्यामुळेच कळलं रे बाबा! खरंच कधी-

कधी वाटतं तू आलास हे बरंच झालं ! आमची अंधानुकरणाची घोडदौड काही काळ का होईना, थांबली. हात स्वच्छ धुणे, शिंक, खोकला आला की रुमाल समोर धरणे, हात पाय धुऊनच घरात जाणे, पादत्राणे बाहेर काढणे, नमस्कार करणे हे आमचे संस्कार. या संस्कारांची पुन्हा उजळणी करून घेतलीस. गर्दीमध्ये धक्के मारणारे आम्ही, आता अंतर राखून उभे रहायला शिकलो. गर्दीमध्ये शिस्त पाळायला लागलो. भल्याभल्यांना जे जमलं नाही, ते तू एका फटक्यात करून दाखवलंस. कायदयालाही न जुमानणारे आम्ही आज तुझ्या भीतीमुळे शिस्तीत वागू लागलो. पोलीस खात्याची निंदा करणारे आम्ही! मात्र तेच पोलीस आज दिवस-रात्र आमच्यासाठी झटत आहेत.

घरातच बंदिस्त झाल्यामुळे कॅरम, पत्ते यांवर जमलेली धूळ साफ झाली . गाण्याच्या भेंड्यांसारखे विसरलेले खेळ सुरू झाले. घराला घरपण आलं. भेदभाव मानवनिर्मित आहेत, हे आपल्या संतांनी, थोरांनी, महापुरुषांनी ओरडू ओरडू सांगितलं, पण त्याचा यत्किंचितही परिणाम आमच्यावर झाला नाही, पण तू मात्र सर्वांना समान वागणूक दिलीस. तुझ्यासमोर सगळे सारखेच! वर्ण, जात, धर्म, देश, गरीब, श्रीमंत सगळंच चूक ठरवलस की तू ! थांबला तो संपला, असंच आतापर्यंत आम्हांला माहीत होतं, पण आज जो थांबणार तोच जिंकणार हे शिकवलंस तूच. आज सर्व जग थांबलं आहे. गती महत्त्वाची, पण स्वतःहून थांबणं त्याहून महत्त्वाचं! दुसऱ्यानं थांबवलं की त्रास होतो, आणि हो तुझ्यामुळेच कळलं सक्तीची विश्रांती किती महागात पडते?

जीवन एकदाच मिळतं ! प्रियजनांना वेळ द्यावा, सोबत रहावं, प्रेम करावं, माफी मागावी, हट्ट पुरवावा, मनातलं सांगावं....किती किती शिकवलंस रे तू ! कारण दुसरी संधी नाहीच ! पैसा कितीही असला तरी काही गोष्टी विकत घेता येत नाहीत. हो, तुझ्यामुळेच आज सर्व सारखेच. सगळे एकाच सरकारी दवाखान्यातच, तू सगळ्यांचा आदर करायला शिकवलंस. होय, सगळेच समाजाचे घटक महत्त्वाचे ! परिस्थितीनुसार त्यांचे महत्त्व बदलते. लहान लेकरांसाठी दूधवाला महत्त्वाचा....आजाऱ्यांसाठी डॉक्टर....

खरंच, कायदे, नियम नुसते माहीत असून उपयोग नाही; तर त्याचे पालन करणे महत्त्वाचे हे पुन्हा एकदा शिकवलंस तू! 'तुम्हीच तुमचे रक्षक 'हे खरयं रे बाबा ! चुकातूनच आता शिकतो आहोत आम्ही. खरंच आमच्या आवश्यक गरजा खूपच कमी आहेत रे! तू अनावश्यक गरजा ओळखायला शिकवलंस. तुझ्यामुळेच आता पानठेले बंद, व्यसनं बंद. अरे, रस्त्याने चालताना खऱ्याचे फवारेच्या फवारे उडाले, की आपण हे थांबवू शकत नाही याचा खूप राग यायचा. पण मानलं बुवा तुला! तू जमवलंस, तुझ्यामुळे गुन्हेगारीतही घट झाली. काळजी व जाणीव वाढली.

आधी प्रत्येकाला आपापला धर्म, जात मोठी वाटायची. यासाठी तर एकमेकांच्या जिवावर उठायचे, पण आज धार्मिक मतभेदही नाहीत, की चढाओढ दिसत नाही. खरंच, माणसातला माणूस तू या निमित्ताने जागा केलास! मास्क घालून आता तो स्वच्छताही पाळायला लागला. आपल्या सोबत इतरांचीही काळजी घ्यायला लागला. आजचा दिवस उद्याच्या चिंतेत वाया घालविणे चुकीचे. भविष्याचे नियोजन गरजेचेच, पण त्याचा दबाव वर्तमानावर नको. वर्तमान आनंदात घालविणे हेही महत्त्वाचे! कारण 'कल हो ना हो ... '

पुढच्या पिढीला एक नक्की सांगावसं वाटतं की, मंदिरापेक्षा, मस्जिदीपेक्षा दवाखाने उभारण्यासाठी दिलेलं दान श्रेष्ठ असतं! इतर प्राण्यांपेक्षा माणूस नक्कीच वेगळा आहे. काही गोष्टी त्याच्याकडे उपजतच आहेत, पण निसर्गाला आव्हान देण्याइतपत आपण नक्कीच मोठे नाही. आमचं खुजेपण आणि निसर्गाचं मोठेपण आम्ही स्वीकारतो रे ! शेवटी आज एक जबाबदार नागरिक बनणे महत्त्वाचे. खरंच खूप काही शिकवलंस तू. त्याची आम्ही उजळणी करू. तुला हे आश्वासन देतो. हवं तर वचन देतो, तुझ्या पुढे आज आम्ही नतमस्तक झालो रे! तू ही निसर्गाचाच भाग, आमच्यासारखाच! मग आपण निसर्गबंधूच ना ! ए, ऐक ना! झालं ना खूप! सोड आता! कर मोकळं आम्हांला! घेऊ दे ना परत एकदा श्वास या मोकळ्या आकाशात! आम्हांला काही नको, फक्त जगू दे ना! पडू दे ना अन्नाचे दोन घास व घोटभर पाणी त्यांच्याही पोटात, जे रस्त्याच्या बाजूला झोपड्यांत राहतात. आता परत जा! शांतपणे! ऐकशील ना, ऐकशील ना रे?

◈◈◈

उपक्रमांतून शाळेचा आणि गावाचा कायापालट

जयराम देवढे

जि. प. प्राथ. शाळा चेडेचांदगाव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर. ◆ भ्रमणध्वनी : ७५८८५१२७१८

शैक्षणिक गुणवत्तावाढीबरोबरच शाळेत कला, क्रीडा यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी विविध नवनवे उपक्रम राबविले जातात. त्या निमित्ताने गाव आणि शाळा यांच्यातील नाते कसे दृढ होत जाते आणि गावाचाही कायापालट कसा होतो त्याविषयी....

मी अहमदनगर जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चेडेचांदगाव या ठिकाणी २०११ साली प्राथमिक शिक्षक म्हणून हजर झालो. शाळेची भौगोलिक परिस्थिती पाहून मन अगदी सुन्न होऊन गेले कारण माझी रायगड जिल्ह्यातील जुनी शाळा मी आदर्श शाळा म्हणून तयार केली होती. हिरवाईने नटलेली ती शाळा माझ्या नजरेसमोर असताना या उजाड माळरानावरील शाळा पाहून माझे मन सुन्न झाले. शाळेत दोन खोल्या होत्या, पण त्या विरुद्ध टोकाला होत्या. दोन खोल्यांमधून गावातील वर्दळीचा रस्ता जात होता. एकसंघ नसलेली तसेच भौतिक सुविधांचा अभाव असलेली शाळा पाहून या शाळेत कसे काम करावे हा प्रश्न माझ्या मनात निर्माण झाला. हळूहळू गावातील लोकांशी परिचय झाला. गावातील लोक गरीब असले तरी खूप कष्ट करतात असे जाणवले. शाळेविषयी ते सकारात्मक असल्याचे जाणवले.

पालकांच्या मदतीने शाळेचा कायापालट करायचा असे माझ्या मनाने पक्के ठरविले. डोळ्यांसमोर अडचणी अनेक होत्या परंतु कोणत्याही परिस्थितीत अडचणींवर मात करायची असे मनाने ठामपणे ठरविले होते. एकेक उपक्रम सुरू करीत संपूर्ण शाळेचा कायापालट करण्यात मला व माझ्या सहकारी शिक्षकांना गेल्या दहा वर्षांमध्ये यश आले आहे. मला आवर्जून उल्लेख करावासा वाटतो, की माझ्या या सर्व उपक्रमांमध्ये सर्व शिक्षक व गावकऱ्यांची मोलाची साथ होती म्हणूनच संपूर्ण शाळेचा कायापालट करण्यात मला यश आले. अडचणी अनेक असल्या, तरी गावकऱ्यांची व शिक्षकांची खंबीर साथ असल्याकारणाने हे यश संपादन करता आले.

१) डिजिटल क्लासरूम

तंत्रज्ञानाचा अभ्यासक्रमात वापर करण्यासाठी डिजिटल क्लासरूमची निर्मिती करण्यात आली. सर्व शैक्षणिक व्हिडिओ तसेच यूट्यूब वरील शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी डिजिटल क्लासरूमची निर्मिती लोक-सहभागातून करण्यात आली.

उपक्रमातून उद्दिष्टपूर्ती

१) ई-लर्निंग अध्यापन पद्धतीचा अभ्यासक्रमामध्ये व शाळेमध्ये वापर करण्यात यश आले.

२) ऑनलाइन टेस्ट तसेच यूट्यूबवरील नावीन्यपूर्ण व्हिडिओ विद्यार्थ्यांना दाखविता आले.

३) विद्यार्थ्यांना संगणकावर काम करण्याचा प्रत्यक्ष अनुभव घेता आला.

४) शैक्षणिक खेळाचा वर्गामध्ये उपयोग करून घेता आला.

५) विद्यार्थी पटसंख्या वाढण्यास मदत झाली.

६) विद्यार्थी स्वयंअध्ययन करू लागले.

विविध स्पर्धांतून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास

शाळेमध्ये निबंध लेखन, चित्रकला, वक्तृत्व, सांस्कृतिक कार्यक्रम यांबाबत विविध उपक्रम घेण्यात आल्याने विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला वाव मिळून त्यांच्या अंगी असलेल्या विविध गुणांची जोपासना होऊन त्यांचा सर्वांगीण विकास करण्यास मदत झाली. यामुळे शाळेमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले, विद्यार्थ्यांना खेळायची तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांची आवड असल्याने विद्यार्थी उपस्थिती टिकविण्यासाठीही याची खूप मदत झाली.

१) विद्यार्थ्यांनी जिल्हा पातळीवर विविध गुणदर्शन स्पर्धेत क्रमांक पटकावत शाळेचा नावलौकिक वाढविला.

२) तालुकास्तरावर झालेल्या स्पर्धेमध्ये शाळेतीला अनेक विद्यार्थ्यांनी प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकावले.

३) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला वाव मिळाला.

४) चित्रकला स्पर्धेत दोन विद्यार्थ्यांनी तालुक्यामध्ये प्रथम क्रमांक पटकावला.

५) गोकुळ बाबासाहेब जराड या विद्यार्थ्याचा वेशभूषा सादरीकरण या स्पर्धा प्रकारात जिल्ह्यामध्ये द्वितीय क्रमांक व ऋतुजा कालिदास मुंडे या विद्यार्थिनीने जिल्हा पातळीवर विविध गुणदर्शन स्पर्धेत कथाकथन या स्पर्धा प्रकारात जिल्ह्यामध्ये तृतीय क्रमांक पटकावला.

वार्षिक स्नेहसंमेलन

१) विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देता आला.

२) लोकसहभाग जमविण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रमाची खूप मदत झाली.

३) गावकऱ्यांना एकत्र आणण्यात यश आले.

४) शाळेतील विविध अडचणी पालकांसमोर मांडण्यासाठी हक्काचे व्यासपीठ मिळाले.

५) विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढण्यास मदत झाली.

हळदी-कुंकू कार्यक्रम

१) गावातील महिलांचा प्रत्यक्ष सहभाग घेता आला.

२) विद्यार्थ्यांच्या शालेय प्रगतीविषयी माता पालकांशी चर्चा करता आली.

३) विद्यार्थ्यांचे तसेच त्यांच्या मातांचे आरोग्यविषयक प्रबोधन करण्यात आले.

४) डॉक्टर तसेच कर्तबगार महिला यांचा शालेय उपक्रमांमध्ये सहभाग घेण्यात आला.

५) महिलांचे मनोरंजक खेळ घेण्यात आले.

शिवार फेरी

१) परिसरात कोणकोणती पिके घेतली जातात याची प्रत्यक्ष माहिती देता आली.

२) परिसरात असणाऱ्या अडीअडचणी कोणत्या व त्यावर कशी मात करता येईल याविषयी विद्यार्थ्यांना माहिती देता आली.

३) आपल्या परिसरात कोणकोणती झाडे आहेत, वेली आहेत, औषधी वनस्पती कोणत्या आहेत याची माहिती घेण्यास शिवार फेरीची मदत झाली.

शैक्षणिक सहल

१) परिसरातील गड-किल्ले दाखविता आले.

२) ऐतिहासिक वस्तुसंग्रहालयांना भेटी देता आल्या.

३) जगात प्रसिद्ध असणारे लोणार सरोवर प्रत्यक्ष दाखवून विद्यार्थ्यांना माहिती देता आली.

४) विविध प्राणी, पक्षी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष पाहता आले.

क्षेत्रभेट

१) परिसरातील कारखान्यांना भेटी देऊन मुलांना प्रत्यक्ष अनुभव देता आला.

२) कामगारांच्या अडचणी कोणत्या हे समजावून सांगता आले.

३) परिसरातील उद्योगाची विद्यार्थ्यांना माहिती झाली.

गावची शाळा, गावाचा अभिमान

१) शाळेतील सर्व माजी विद्यार्थ्यांचा मेळावा शाळेमध्ये आजोजित करण्यात आला.

२) लोकसहभाग वाढण्यास मदत झाली.

३) सर्व उपक्रमांची माहिती पालकांपर्यंत पोहोचविण्यात यश आले.

४) विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीमध्ये येणाऱ्या अडचणींवर चर्चा करता आली.

५) शाळेच्या प्रगतीसाठी गावकरी स्वत: पूर्ण क्षमतेने विविध उपकमांत सक्रिय सहभागी झाले.

लेझीम पथक

१) विद्यार्थ्यांना खेळाची आवड निर्माण झाली.

२) भेट देणारे अधिकारी, पदाधिकारी तसेच पालकांचे स्वागत करण्यासाठी लेझीम पथकाचा उपयोग झाला.

अधिकारी विद्यार्थ्यांच्या भेटीला

१) अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांशी थेट संपर्क साधला.

२) विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी अधिकाऱ्यांपर्यंत पोहोचल्या.

३) शाबासकी देणारे कोणीतरी आहे असे वाटून विद्यार्थी अभ्यासामध्ये चांगल्या प्रकारे तयारी करू लागले.

४) अधिकारी व पदाधिकारी आपल्याला शाबासकी देत असल्याने शिक्षकही चांगल्या प्रकारे काम करून विद्यार्थ्यांसाठी मेहनत घेऊ लागले.

प्रिय संपादक ....

माहे फेब्रुवारी २०२० चा 'जीवन शिक्षण' अंक हाती पडला. मा. दिनकर पाटील, संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे यांची 'निष्ठा : शिक्षक समृद्धतेचा प्रवास' ही अत्यंत सखोल व अभ्यासपूर्ण अशी मुलाखत वाचून प्रशिक्षणाविषयी सादयंत माहिती मिळाली.

संत गाडगेबाबा यांच्या समाजकार्याची ओळख करून देणारा पोपट निकम यांचा 'स्वच्छतेचे दूत : संत गाडगेबाबा' हा लेख, तसेच रामन परिणाम हा सी. व्ही. रामन यांच्या संशोधन कार्याविषयीचा लेख प्रेरणादायी वाटला. पैगंबर तांबोळी यांनी प्रसिद्ध वैज्ञानिक अरुण व सुमंगला देशपांडे यांच्या विज्ञान ग्रामच्या साहाय्याने बाल संशोधक निर्मितीचे उचललेले पाऊल फारच भावले. प्रत्येक महिन्याचा 'जीवन शिक्षण' अंक दर्जेदार असतो. त्याबद्दल प्रकाशन समिती सदस्य यांना खूप खूप धन्यवाद!

श्री. गोपाळराव आणि सौ. आरती होनमाने
मु. पो. देवराष्ट्रे, ता. कडेगाव, जि. सांगली.

'शब्दांनी लिहा चिमुकल्यांची कहाणी
शब्दांनी फोडा मूक ओठांची वाणी
लिहिते व्हावे सर्व सामान्य हातांनी
निवांत का बसावी लपून शब्दराणी'

या चारोळीप्रमाणे 'जीवन शिक्षण' जानेवारी २०२० या अंकातील लेख हे खरोखरच चिमुकल्यांच्या भावविश्वाशी जोडलेले वाटले. हा अंक वाचल्यानंतर खऱ्या शिक्षकाला खरोखरच प्रेरणा मिळते. 'Know Thyself' हा लेख खूपच आवडला. 'करून तर पहा' हा प्रयोग मजेशीर वाटला. वर्गात हा प्रयोग घेतल्यानंतर मुलांना आनंद वाटला. 'जीवन शिक्षण' अंकामुळे खूप काही नवीन शिकायला मिळाले.

सौ. स्वाती सुरेश शिंगण
जि. प. प्राथ. शाळा, कासारशिरंबे, ता. कराड, जि. सातारा.

माहे जानेवारी २०२० चा 'जीवन शिक्षण' अंक हाती आला. या अंकाचे वैशिष्ट्य सांगायचे तर प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने १९७५ पासून २०१२ पर्यंत प्रत्येक वर्षी उपस्थित असलेल्या प्रमुख पाहुण्यांची माहिती प्रत्येक पृष्ठाच्या खालील चौकटीत दिली आहे.

प्रत्येक शिक्षक आपल्या विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी वेगवेगळे उपक्रम राबवीत असतो. खेळातून, वेगवेगळ्या उपक्रमांतून आपल्या विद्यार्थ्यांचा विकास करणाऱ्या सुरेखा भामरे यांचा 'माझे उपक्रम आणि विद्यार्थी विकास' हा लेख खूप उपयुक्त वाटला. 'बालिका दिन' या लेखातून अनघा गोखले यांनी 'बालिका ही भारत मातेचे नाव उज्ज्वल करणारी मशाल आहे' अशी जाणीव करून देऊन माता-पालक व समाजाला जागृत करण्याचे काम केले आहे. 'विवेकानंदांच्या मनातला युवक', 'सहज करू या शिक्षण', 'अध्ययनाच्या नवीन वाटा' असे उपयुक्त लेखही वाचायला मिळाले. 'स्वत:ला ओळखा' हा खूप छान लेख आहे.

ज्ञानाचा खजिना असलेला 'जीवन शिक्षण' हा एकमेव अंक असा आहे, ज्यामुळे आम्हां शिक्षकांना प्रेरणा मिळते व आमच्या उपक्रमांना दिशा मिळते. अशा 'जीवन शिक्षण' अंकाला खूप खूप शुभेच्छा!

'हा अखंड नंदादीप, जळणार, सतत जळणार,
हा असाच तेवत जगती, निज प्रकाश नित देणार.'

श्री. संजय खुशाल पाटील
जि. प. प्राथ. शाळा, हिंगोणे खुर्द, ता. धरणगाव, जि.जळगाव.

प्राण्यांचे मुखवटे
(हत्तीचा मुखवटा तयार करणे.)

साहित्य :

टिंटेड पेपर किंवा जाड कार्डशीट पेपर, कात्री, फेविकॉल, इत्यादी.

कृती :

- पेपर घेऊन तो उभा धरून मधोमध घडी घालून घेणे.
- एका बाजूला हत्तीच्या चेहऱ्याचा आकार काढून तो कापून घेणे.
- आकार कापून झाल्यावर वरच्या बाजूस व सोंडेच्या खालच्या बाजूने कट घेणे.
- आकृतीत दाखविल्याप्रमाणे वरच्या बाजूचे कट व खालच्या बाजूचे कट एकमेकांवर चिटकवून घेणे म्हणजे मुखवट्यास खोली प्राप्त होते.
- सोंडेच्या आकारास पंख्याच्या घड्या घालून घेणे. तुम्हांला हवं असेल तर तुम्ही सोंडेचा आकार कागद चिकटवून वाढवू शकता.
- पांढऱ्या कागदावर हत्तीचे दात काढून घेऊन कापून घेणे व चिकटविणे तसेच मुखवट्यावर डोळ्यांचे आकार काढून घेणे आणि दोन्ही होल पासून दोरी बांधणे.

अशा प्रकारे हत्तीचा मुखवटा तयार झाला. तुम्ही त्याला मुकुट पण काढू शकता. अशा पद्धतीने तुम्ही प्राण्यांचे मुखवटे तयार करू शकता.







वृषाली मुकींदर बुर्डे
RKL कॉम्प्लेक्स फेज अलंकापुरम,
आळंदी रोड, वडमुखवाडी,
चऱ्होली, पुणे.
भ्रमणध्वनी : ८०८७८१३६३७.

'जीवन शिक्षण' हे मासिक मालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र यांच्यासाठी मुद्रक व प्रकाशक श्री. दिनकर पाटील यांनी रुना ग्राफिक्स, त्रिमूर्ती हॉस्पिटलमागे, वडगाव बु.।।, सिंहगड रोड, पुणे-४१ येथे छापून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र ७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले.

Date of Publication 3 April 2020
Jeevan Shikshan Magazine is posted
on 3rd and 4th of April 2020
at Pune PSO, G.P.O. Pin 411 001.

'Registered'

Reg. No. RNI - 14563/57
Post Registration No.: PCW/063/2018-2020
Licensed to post without prepayment postage No.: **WPP - 28**

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र

जीवन शिक्षण प्रकाशन विभाग

विक्रीसाठी प्रकाशने

अ. क्र.	पुस्तकाचे नाव	किंमत रुपये	पोस्टेज खर्च
१.	अधिकारी कर्मचारी मार्गदर्शिका	रु. १३०/-	३०/-
२.	माझा वेगळा उपक्रम	रु. ४०/-	३०/-
३.	आठवणीतील शाळा	रु. ७०/-	३०/-
४.	राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५	रु. ९०/-	३०/-
५.	टर्निंग पॉईंट	रु. ५०/-	२५/-
६.	प्रश्नमंजूषा	रु. ४०/-	३०/-
७.	गीतावली पुस्तक	रु. ७०/-	३०/-
८.	गीतावली सी. डी.	रु. ५०/-	--
९.	१ ते ८ अभ्यासक्रम सी. डी.	रु. ५०/-	--
१०.	हितगुज	रु. ४०/-	२५/-
११.	भाषिक खेळ	रु. १००/-	३०/-
१२.	आर. टी. ई. २००९	रु. ६०/-	३०/-
१३.	जागर जाणिवांचा	रु. ४०/-	२५/-

वरील पुस्तके प्रकाशन विभागाकडे उपलब्ध आहेत.

पत्रव्यवहाराचा पत्ता :
संपादक, जीवन शिक्षण
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र
७०८, सदाशिव पेठ, कुमठेकर मार्ग, पुणे ४११०३०.
दूरध्वनी : ०२०-२४४८८३८२
फॅक्स नं.: ०२०-२४४७७०९०.
ई मेल : jeevanshikshan@maa.ac.in

प्रति _____
_____
_____
_____